नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

( मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयांकरिता मान्य झालेलें )

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

# युगवाणी

## कथाकाव्य विशेषांक

कार्यकारी संपादक
मो. ल. व्यवहारे

किंमत एक रुपया

वर्ष १४ ] एप्रिल १९५९ [ अंक १



या अंकांत

# विदर्भ साहित्य संघ

## *वार्षिक साधारण सभेची सूचना*

घटना नियम १० प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचना देण्यांत येत आहे कीं विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दि. २६ एप्रिल १९५९ रोजीं दुपारीं ४–३० वाजतां नागपूर येथे केंद्रीय कार्यालयांत कै. गडकरी–स्मारक सभागृहामध्ये भरेल.

**सभेपुढील विषय—**

१. मागील सभेचा अहवाल.
२. गतवर्षीचें कार्यवृत्त
३. गतवर्षीचे हिशेबतपासनिसांनी तपासलेले हिशेब.
४. १९५९–६० चें अंदाजपत्रक.
५. १९५९–६० करितां अधिकृत हिशेब तपासनीसांची नेमणूक.
६. घटनेमध्ये ' मध्यप्रदेश ' शब्दाऐवजी ' विदर्भ व त्याच्याशी सलग असलेला प्रदेश ' अशी दुरुस्ती करणें.
७. घटना नियम १२ मध्ये श्री. दे. गो. लांडगे यांनी सुचविलेली दुरुस्ती.
८. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

गणपूर्तीच्या अभावीं सभा तहकूब झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशीं त्याच ठिकाणीं अर्ध्या तासाने भरविण्यांत येईल.

सभेंत मांडावयाचे ठराव किंवा सूचना सभेपूर्वी चार दिवस अगोदर केंद्रीय कार्यालयांत पोचावयास पाहिजेत.

साधारण सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावें ही विनंती.

नागपूर
दि. २–४–५९

**श्री. गो. काशीकर**
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

# युगवाणी

वर्ष १४ वें] एप्रिल १९५९ [अंक १

## संपादकीय

### कै. डॉ. मु. रा. जयकर

अखिल भारतीय कीर्तीचे कायदेपंडित, राजकारणी व शिक्षणशास्त्रज्ञ डॉ. जयकर यांचें गेल्या महिन्यांत निधन झालें हें सर्वश्रुत झालेंच आहे. त्यांनी आयुष्यभर सतत विधायक कार्य केलें आणि शेवटीं शेवटीं पुणें विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून केलेल्या कार्यानें त्यावर कळस चढविला. त्यांच्या निधनानें एक अत्यंत सुवुद्ध मार्गदर्शक नाहीसा झाला याचें दुःख फार होतें. 'युगवाणी' डॉ. जयकर यांच्या आत्म्याला आपली श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

### कै. श्री. ज. स. करंदीकर

'केसरी' चे एक विश्वस्त व संपादक श्री. ज. स. तथा तात्यासाहेव करंदीकर यांचेंहि निधन याच महिन्यांत झालें. श्री. तात्यासाहेवांची विद्वत्ता, चारित्र्य, कामाचा उरक आणि साधेपणा आदर्शवत् होता. त्यांच्या निधनानें महाराष्ट्राची विद्वत्ता कांही काळ तरी पोरकी झाली असें म्हणावयास हरकत नाही. विदर्भ संशोधन मंडळाच्या दोन उत्सवांस त्यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केलें होतें. 'युगवाणी' तात्यासाहेवांच्या आत्म्यास आपली श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

### कै. डॉ. वा. ग. शिगणापूरकर

विदर्भ साहित्य संघ व नागपूर शहर यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या डॉ. वा. ग. शिगणापूरकर यांचेंहि निधन याच महिन्यांत झालें. डॉ. शिगणापूरकर हे सेवानिवृत्त डॉक्टर असून अनेक विधायक कार्यांत भाग घेत असत. ते पक्के हिंदुत्वनिष्ठ होते व यासाठी भागानगर सत्याग्रहांत त्यांनी कारावासहि सोसला होता. विदर्भ साहित्य संघास त्यांनी पांचशे रुपये देणगी दिली असून त्याच्या व्याजांतून, त्यांच्या इच्छेप्रमाणे पारंगत परीक्षेंत यशस्वी झालेल्या पहिल्या क्रमांकाच्या विद्यार्थ्याला 'शिगणापूरकर सुवर्णपदक' वक्षिस देण्यांत येत असतें. त्यांच्या निधनानें एका प्रतिष्ठित नागरिकास आमचें शहर मुकलें आहे. कै. डॉ. शिगणापूरकरांच्या आत्म्यास 'युगवाणी' आपली श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

सुदैवानें वरील तीनहि गृहस्थांना त्यांतल्या त्यांत दीर्घायुष्य लाभलें होतें व पक्व अवस्थेंतच त्यांनी इहलोक सोडला.

### तळोधी येथील संमेलन

अपेक्षेप्रमाणे तळोधी येथील वि. सा. संघाचें संमेलन यशस्वी तर झालेंच. पण तें गाजलें, हें विशेष आहे. संमेलनाध्यक्ष प्रा. या. मु. पाठक यांच्या अध्यक्षीय भाषणावर अनुकूल प्रतिकूल अशी टीका पुष्कळच होत आहे. या विचारमंथनांतून कांही विधायक स्वरूपाचें अमृत बाहेर पडावें अशी आम्ही इच्छा व्यक्त करतों.

## श्री. श्री. के. क्षीरसागर

मिरज येथे लवकरच भरणाऱ्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं महाराष्ट्राचे ख्यातनाम टीकाकार श्री. श्री. के. क्षीरसागर यांची नियुक्ति झाली यास्तव श्री. क्षीरसागर यांचें आम्ही सहर्ष अभिनंदन करतों. एक समतोल टीकाकार व विधायक निरोगी प्रवृत्तीचे लेखक म्हणून श्री. क्षीरसागर महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. त्यांचें मार्गदर्शन नव्या पिढीला निश्चित उपयोगी होईल असा आम्ही विश्वास बाळगतों.

## श्री. टेकाडे आणि डॉ. य. खु. देशपांडे

नागपुरांतील एक जुने कवि श्री. आनंद कृष्णाजी टेकाडे व प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांना त्यांच्या गतकालीन वाङ्मयसेवेबद्दल मुंबई शासनाने अनुक्रमें २५०० व १००० रु. पुरस्कार दिला याबद्दल आम्ही या दोघाहि साहित्यिकांचें अभिनंदन करतों.

## प्रस्तुत अंकासंबंधी थोडेंसें

चालू अंक कथाकाव्य विशेषांक म्हणून काढणार असल्याचें व त्याचें संपादन प्रा. मा. ल. व्यवहारे करीत असल्याचें आम्ही गेल्या अंकांत जाहीर केलेंच होतें. मराठींतील गेल्या सहाशें वर्षांत झालेल्या अनेक प्रमुख कथाकाव्यांचा परिचय वाचकांस घडवून आणून नव्या अभ्यासकांची सोय करावी, हा या अंकाचा उद्देश आहे. या अंकाची कल्पना काढण्यापासून तों ती कार्यान्वित करण्यापर्यंतचे सर्व परिश्रम प्रा. व्यवहारे यांनीच केले असल्यामुळे या अंकाचें सर्व श्रेय त्यांजकडेच जातें. अनेकांकडून श्रमपूर्वक लेख मागवून सुमारें ६०।७० पृष्ठांचा मजकूर त्यांनी संपादित केला. परंतु संघाच्या योगक्षेमासाठी त्याच्या जमाखर्चावर करडी नजर ठेवणाऱ्या संघाधिकाऱ्यांकडून ही पृष्ठसंख्या निम्म्याहूनहि कमी करण्यासंबंधी आम्हांस आयत्या वेळीं आदेश आला. त्यामुळे कित्येक लेख आम्हाला बाजूला करावे लागले. ज्यांचे लेख आम्ही चालू अंकांत दिले नाहीत त्यांची क्षमायाचना करीत आहोंत. अर्थात् ते यापुढील अंकांतून देण्यासंबंधी आमच्या उत्तराधिकाऱ्यांना विनंती करीत आहोंत. ज्या ज्या लेखकांनी कार्यकारी संपादकांच्या विनंतीला मान देऊन आम्हांला लेखनसाहाय्य केलें त्यांचे त्यांचे आम्ही फार आभारी आहोंत. आलेल्या लेखांतून सर्वच कथाकाव्यांचा परामर्श घेतला गेला असें नाही. पण मर्यादित जागेंत याहून विशेष करण्यास अवकाशहि नव्हता. आमचे परिश्रम नेहमीच कमी करण्यास झटणारे प्रा. व्यवहारे यांच्याबद्दल या निमित्ताने कृतज्ञता व्यक्त करतों.

## आमचा रामराम घ्यावा

हा अंक निघाल्यावरोबर आम्ही अवभृतस्नानास मोकळे होत आहोंत. गेलीं तीन वर्षें सांभाळलेला हा 'युगवाणी 'चा न्यास आमचे उत्तराधिकारी प्रा. या. मु. पाठक यांच्या स्वाधीन करून आम्ही कृतार्थ झालों आहोंत. प्रा. या. मु. पाठक हे कवि, कृतकर्मे आणि साक्षेपी गृहस्थ आहेत. गेल्या निवडणुकींत त्यांना जास्तींत जास्त मतें देऊन व तळोधी संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मुकुट त्यांच्या डोक्यावर चढवून वि० सा० संघाने त्यांची योग्यता अगोदरच मान्य केली आहे. आमच्यापेक्षा अनेक दृष्टींनी व पटींनी पात्र असणाऱ्याच्या हातीं हें कार्य जात असल्यामुळे आम्हाला समाधान आहे. त्यांच्या कारकीर्दीत युगवाणी संबंधींच्या अनेकांच्या अनेक अपेक्षा पूर्ण होतील अशी आशा आहे. सुमारें १॥–२ अंक पुरेल इतका 'पसंत' मजकूर आम्ही आमचा वारसा म्हणून त्यांच्या स्वाधीन करीत आहोंत. ते अर्थात् तो मानतील यांत संशय नाही. या निमित्ताने "'युगवाणी 'चीं गेलीं तीन वर्षें" या शीर्षकाखाली संपादकाने आपलें व्यक्तिगत निवेदन याच अंकांत दिलें आहे. तें वाचकांनी वाचावें अशी विनंती आहे.

आमच्यावर लोभ व उपकार करणाऱ्या अनेकांच्या चरणीं प्रणिपात.

पां. कृ. सावळापूरकर

# 'कवि नरिंद्र'कृत : रुक्मिणी–स्वयंवर

## श्री. रामदास डांगे

रुक्मिणीस्वयंवरकथा ही प्राचीन मराठी कवींची एक अत्यंत आवडती कथा आहे. अनेक कवींनी या कथेवर आपल्या प्रतिभेचें लेणें चढविलें आहे. नरेंद्रकृत 'रुक्मिणी–स्वयंवर' हें ज्ञानेश्वरकालीन काव्य असून तें महानुभावीय 'साती ग्रंथांत' समाविष्ट झालेलें आहे, यावरून त्याची योग्यता कळून येईल. प्राचीन मराठी वाङ्मयांतील हा एक अमोलिक ठेवा आहे. प्रस्तुत काव्य वाचीत असतांना ज्ञानेश्वरांच्या शब्दसृष्टीची बरेचदा जाणीव होते. अशा या कथा-काव्याचें येथे संक्षिप्त समालोचन–मी केलेला अभ्यास म्हणून–सादर करीत आहें. आणि वाचकहि या 'रुक्मिणी-स्वयंवरा'च्या अभ्यासाकडे वळावा, एवढाच मर्यादित हेतु समालोचनाचा आहे.

कविचरित्राबद्दल लिहिण्याचें हें स्थळ नाही आणि दुर्दैवाने या कवीचें चरित्र फारच त्रोटक उपलब्ध असून तेंहि विवादास्पद आहे. आज जरी हें काव्य महानुभावीय गणलें जात आहे. तरी काव्यनिर्मितीच्या काळीं कवि महानुभावपंथीय होता किंवा नव्हता याबद्दल आज ठाम असें कांहीच सांगतां येत नाही. अशा तऱ्हेचे वाद तर आहेतच, पण अत्यंत खेदाची गोष्ट ही की, प्रस्तुत ग्रंथहि अपूर्ण आहे. नरेंद्राने तो संपूर्ण लिहिला असावा, पण आज कमींत कमी मूळ स्वरूपांत तरी उपलब्ध नाही. आपणांस शितावरून भाताची परीक्षा करूनच समाधान मानावें लागतें.

### नरेंद्राची काव्यकल्पना व त्याचा आत्मविश्वास

कोणत्याहि काव्याचें समालोचन करण्यापूर्वी त्या कवीची स्वतःची भूमिका व काव्याविषयी त्याची कल्पना पाहणें अत्यंत उद्बोधक ठरतें. कवि नरेंद्राने साहित्यशास्त्र चांगलेंच पचविलें असावें असें त्याच्या काव्यांतून निघालेल्या उद्‌गारांतून–अर्थात् अभावित-पणें–दिसून येतें. सौंदर्याचे प्रमुख गुण 'वेध लावणें' हा आहे, हें नरेंद्राने 'सौंदर्य देखौनि ऐतार : श्रीमूर्ती वेधले मुनीश्वर' (३३४) आणि देवाच्या रूपाच्या सौंदर्याचा 'वेधु नारीसि असे : तैसाचि मुनेश्वरां' (३३१) यावरून स्पष्ट केलें आहे. आणि काव्यांत हें सौंदर्य रसभावांमुळे येतें आणि अलंकारादि साहित्य-सामग्री काव्याच्या सौंदर्यात भर टाकते हेंच

> कविताकामिनीयेचा धरूनि हातु :
> भावो दोहीं आंगी मलपतु
> चाले साहित्यसाबरेयां आंतु
> रसु खेडकुळिये (२६)

या ओवींतून निदर्शनास येत नाही काय ? शब्दवेधी रसामुळेच कवितेला अमर देहसिद्धि प्राप्त होते असेंहि त्याने (१४) ओवींत स्पष्ट म्हटलें आहे.

> श्रीकृष्णाचां गुणीं जीविनला ।
> माझा जिउ श्रीचक्रधरा विनटला ।
> तो आंतुल आनंदु ओसंडला ।
> किवितेचेनि मिसें ॥ (३५)

या ओवींत 'Spontaneous overflow of powerful feelings' ही वर्डस्वर्थची व्याख्या किंवा मर्ढेकरांचें 'लेखकनिष्ठ वाङ्मयीन तादात्म्य' हें तत्त्वच निराळ्या भाषेंत सांगितलें नाही काय ? अशा तऱ्हेच्या अत्युत्कट अनुभूतींतून निर्माण झालेलें काव्य हें 'अमृतापासौनि वहुये रसाळ' (२७) असेल यांत शंका नाही. आणि अशा रसाळ 'कवितेची रेख' (१४) [ज्ञानेश्वरांची रेखा ?] आनंदसुख देते.

अर्थात् श्रीकृष्णकथा असल्यामुळे 'साहानुकेसी' (शांतिसह) आनंद होईल, हें निराळें सांगणें नको. (येथे 'साहित्य आणि शांति ! हे रेखा दिसे बोलती ।' या ज्ञानेश्वरीय प्रसिद्ध ओवीची आठवण झाल्याविना राहत नाही.)

वरील रूपरेखेंतून नरेंद्राने आत्मविश्वासपूर्वक आपलें लेखन केलें आहे, हें 'जो वाणितां रसाचा समुद्र : चढैल आठवा : तो प्रसंगें सांघेल कवि नरेंद्र (४८८) इ० ओव्यांवरून स्पष्ट होईल. मात्र आत्म-विश्वासांत अभिमानाची छटा नाही, उलट "मी कांही 'बियाळ' बोललों, तर रसिकांनी त्यांतील 'प्रेमगर्भ' भाव ओळखावा (३७) आणि आपल्या कथेमध्ये 'रससमुद्रां आगळें भरतें' (४१) चढण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावें" अशीच विनवणी नरेंद्राने केली आहे. मात्र किन्नराने ज्याप्रमाणे 'बोलीं रूप दाविलें। सुंदराचें' (३५०) त्याचप्रमाणे नरेंद्राने कवितेंत सौंदर्याचें रूप प्रगट केलें आहे.

## कल्पनाविलास

नरेंद्राची कवि म्हणून योग्यता अत्यंत उच्च दर्जाची आहे हें त्याच्या कल्पनाविलासावरून दिसून येईल. मुळांत नसलेलें कल्याणकीर्ति व किन्नर यांचें उपकथानक त्याच्या स्वतंत्र प्रतिभेंतून निर्माण होणें सहज शक्य आहे. पण कांही कांही ओवींतून तर एक निराळाच स्वतंत्र, मनोज्ञ कल्पनाविलास दृष्टोत्पत्तीस पडतो. रुक्मिणीच्या सख्यांचें वर्णन करितांना वापरलेल्या उपमा—

दीसती मुखचंद्र गोरे :
ते जैसे चंद्राचे भाऊ सावधारे (सावत्र)
किंवा
कास्मिराचिये करंडिये जैसे:
भीतरिल मूर्ति प्रकासे
पातळा लुगडेतूनि तैसेः
आवएव दीसतातीं (८३)

यांत कल्पनानावीन्य आहे, हें नाकबूल करतां येणार नाही. तसेंच रुक्मिणीचें रूप जणू कांही 'मन्मथाची जन्मपत्रिकाच' आहे (८८), आणि अशा रुक्मिणीचें मुख इतकें सुंदर आहे की तें पाहतां क्षणीं—'चंद्र लाजेने थंडाच व्हावा !' यांतील कल्पनेचें मनोहारित्व किती वर्णन करावें ? आणि आता व्याकरणावर आधार-लेली, जुनीच पण सुधारून वाढवलेली, पुढील ओवींतील

कैसे दीसताति अवयेव :
एकमेकां प्रमदा उपजेति भाव
मनां होत दादुलेपणाची हांव :
जऱ्हीं नपुंसक जालें (८४३)

ही कल्पना वाचकांना 'हताः पाणिनिना वयम्' असेंच म्हणावयास लावणार !

## भाषावैभव

नरेंद्राची भाषाशैलीहि चांगलीच कमावलेली आहे असें वरवर पाहतांहि प्रत्ययास येतें. शब्दनिष्ठ कल्पनांपासून तों अर्थनिष्ठ कल्पनांपर्यंत त्याची प्रतिभा सारखीच अप्रतिहत संचार करते. त्याने रुक्मिणीच्या सख्यांचीं ठेवलेलीं नांवें—कर्पुरिका, चंद्रिका, उचित-मालती, भावकळना, चारुरेखा—अर्थपूर्ण व भाववाहक आहेत. विरहिणी रुक्मिणीला नक्की काय झालें हें भावकळनेलाच 'कळिनलें चित्तीं' (४०९). भाव-कळनाच ती ! तसेंच दमयंतीच्या रूपापुढे 'देव–नळ तणासरिसें (१९६)' ठरलेत यांतील शब्दनिष्ठ श्लेष मोहक आहे तर

संकोचलीं कमळें : पक्षिये टाकिती अविसाळें
चक्रवाकें होति व्याकुळें : वीयोगें प्रियाचेनि (४७६).

यांतील संकोच, त्याग, व्याकुळता यांतील 'संवादी लय' दृश्य आहेत. आणि 'सायंकालीन अंधःकारा'शीं कवीची भावनात्मक समतानता प्रकर्षानें वाढल्यामुळे पांच ओव्यांत हृद्य अलंकारांची पखरण झाली आहे.

आपल्या शब्दसृष्टीद्वारां रेखाटलेलीं शब्दचित्रें मोहक स्वरूपांत वाचकाच्या मनश्चक्षूंसमोर उभीं राहतात. संध्याकाळ, सूर्यास्त, चंद्रोदय, उपवनें इत्यादि शब्दचित्रें स्पष्ट व सुंदर आहेत. 'धारा–दामोदरा'चें शब्दचित्र तर विस्तृत, स्पष्ट, आणि रेखीव उतरलें आहे. याचा रसिकांनी मुळांतूनच आस्वाद घ्यावा.

## भावात्मकता

कल्पना व भाषा यांच्या वैभवापेक्षाहि भावात्मकता उच्च प्रतीची असते. भावात्मक आणि रसोत्कट प्रसंग नरेंद्राच्या रुक्मिणी स्वयंवरांत बरेच आढळून येत असले तरी त्याचा ओढा कल्पकतेकडे जास्त आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

'लक्ष्मी चैंद्या देउं केली' असें ऐकतांच भावनेचा आवेग सहन न झाल्यामुळे रुक्मिणीला भवंडि (मूर्च्छा) आली. आणि

> कवाडें घालीनि अर्ध उघडीं :
> चोळी ढिळौनि आंग मोडी
> पालउ सरिसा करीनि तांबूळ सांडी :
> बहु आळोसु अंगी (३९४)

यांतील रुक्मिणीची अवस्था व सख्यांची व्यवस्था यांचें दृश्य वास्तवपूर्ण तसेंच भावगर्भ आहे. ही सख्यांची झालेली गर्दी पाहून रुक्मिणीला चीड येऊन ती म्हणते, 'तुम्हा रोग लागलें असोस : तरि जा वैद्यापासी (४०४) किती भावपूर्ण चित्र रेखाटलें आहे रुक्मिणीचें! नंतर

> डावा हात उसिसां घातला :
> उजवा हृदयावरि ठेवला
> जैसा जिवेंसीं देवो धरिला :
> निसटैल म्हणौनि (५७९).

या रुक्मिणीच्या क्रिया व उत्प्रेक्षेंतून दिसून येणारा तिच्या अंतरींचा 'भाव' अतिशय हृदयंगम आहे. ही विरहावस्था आणि थोड्याच वेळापूर्वीची

> सर्वांगीं सात्त्विक दाटले : रुक्मिणीचां (३४३)

ही अवस्था. हें चित्र पाहा की तें चित्र पाहा! दोन्हीहि तितकींच भावपूर्ण.

अशा तऱ्हेनें रुक्मिणीचें स्वभावचित्र सूक्ष्म व मार्मिक आहे. पण 'रुक्मिणीपत्रिकें'त मात्र हें चित्र डागळलें आहे. त्यांत कल्पनेची भरारी जरूर आहे, पण रुक्मिणीचें हृद्गत मात्र कमी आहे. उलट मुळांतील किंवा त्यावरून नाथांनी तयार केलेली 'रुक्मिणी-पत्रिका' अधिक उत्कट वाटतात. 'मी अमक्याची मुलगी असून तुझ्याशीं माझें लग्न लावतें' असें नरेंद्रांची रुक्मिणी केतकरीय 'ब्राह्मणकन्ये'च्या भाषेंत बोलते. उलट नाथांची रुक्मिणी "'तुझिया ठायीं (माझें) निर्लज्ज चित्त' (४-७) जडल्यामुळे मी ही पत्रिका लिहीत आहें." असें म्हणते आणि श्रीकृष्णाच्या भावनेला हात घालणारीं, आव्हान देणारीं वाक्येंहि तिच्या पत्रिकेंत आहेत. तसेंच 'मज दीनातें उद्धरायें' ही भक्तिमयताहि आहे. नरेंद्राने एक सुंदर रसोत्कट प्रसंग सोडला असेंच म्हणावें लागतें.

## औचित्य, संयम

ज्याप्रमाणे रुक्मिणीच्या सख्यांत भावकळने-बरोबर उचितचंद्रिका, उचितमालती यांचा समावेश होतो तद्वतच काव्ययशासाठी 'भावा'बरोबर 'औचित्या'चीहि आवश्यकता आहे. व हें नरेंद्रानेहि ठिकठिकाणीं सूचित केलें आहे. परंतु वर्णनाच्या ओघांत तो वाहवतो हेंहि कबूल केलें पाहिजे. रुक्मिणीचा एक एक अवयव इतका मनोहारी आहे की 'बोलतां विषयां होईल माजवण!' पण ती जगन्माता असल्यामुळे तसें करणें हें आईच्याच अवयवांचें वर्णन करण्याइतकें निंद्य आहे. म्हणून नरेंद्रहि त्या अवयवांचें वर्णन करीत नाही. कारण साधुलोक दूषण देतील (७३) ही त्यास भीति आहे. पण ही हौस त्याने 'रुक्मिणीच्या सख्यांच्या वर्णनां'त फेडून घेतली आहे.

> पातळा लुगडेयांतुनि तैसे : आवएव दीसताति (८३)

असें त्यांच्या अवयवाचें सूक्ष्म वर्णन केलें आहे. (सख्यांच्या अवयवांचें वर्णन असल्यामुळे साधुलोक खवळणार नाहीत अशी विचाऱ्या नरेंद्राची कल्पना दिसते!)

अतिशयोक्त वर्णनामुळेहि औचित्यभंग होतो. या कथेंत देवता, वनस्पती, पक्षी सर्वच बोलतात. आणि नरेंद्रानेच म्हटल्याप्रमाणे हें 'आख्यान : विचित्र असे' वाटतें. आणि लांबलांब वर्णनांमुळे तर आणखीच विरस होतो व कथाप्रवास कंटाळवाणा होतो. चंद्र-वर्णन ३० ओव्या, उपवनवर्णन १५० ओव्या, राजांचीं वर्णनें ८८ ओव्या, यांच्यांत मौज वाटत नाही.

'त्रैलोक्यांतील गायनप्रकारा'मुळे कवीचें संगीतज्ञान दिसून येतें; पण कथानक थांबतें. लांबलांब वर्णनांमुळे 'रसभंग' होतो हें स्वतः कवीच 'तरि रसभंगु होईल' (३१७) किंवा

बहु बोलतां अतिप्रसंगु ।
कथे होईल रसभंगु (५१७)

असें स्वत: कवीलाच तें वर्णन खटकल्यामुळे म्हणतो.

अर्थात् या दोषामागील कवीचा काळ व त्याची भूमिका लक्षांत घेतली पाहिजे. तत्कालीन काव्यांत सर्वत्रच अतिशयोक्ति आढळते, हा कालमहिमा होय. दीर्घवर्णनांचें कारण कवीची भूमिका फक्त कथाकाराची नसून महाकवीची आहे. त्यामुळे हीं वर्णनें महाकाव्याच्या धर्तीवर रचलीं आहेत, हें लक्षांत ठेवूनच या दोषांकडे पाहिलें पाहिजे.

नरेंद्राच्या या काव्यांत अनेक सुंदर अलंकार, भाषासौंदर्य, इ० अनेक गुण आढळतात. त्यांचा सविस्तर परामर्श घेणें स्थलाभावीं शक्य नाही. म्हणून अलंकारादि अंगें या समालोचनांत सूचित केलीं आहेत. नरेंद्राची स्वतःची काव्यविषयक भूमिका इतर कवींच्या मानानें स्पष्ट व निर्दोष असल्यामुळे शक्यतों त्याच आधारावर हें समालोचन केलें आहे. वरील समालोचनामुळे अभ्यासकास रुक्मिणीस्वयंवर मुळांतून वाचावयाची इच्छा झाली तरी पुरे.

---

# एकनाथप्रणीत : रुक्मिणी स्वयंवर

प्रा. पां. कृ. सावळापूरकर

रुक्मिणी विवाहाची कथा मराठींत अनेक कवींनी लिहिली असली तरी नाथांचें रुक्मिणी स्वयंवर त्या सर्वांत अनेक दृष्टींनी वैशिष्टचपूर्ण आहे. अशा पौराणिक कथांतून कवि बहुधा स्वकालीन सामाजिक स्थितीचें व स्वतःच्या कल्पनांचें क्वचित् बुद्धिपुरस्सर पण बहुधा अजाणता चित्रण करीत असतो. नाथहि त्यास अपवाद नाहीत. पण ज्या कथेच्या द्वारा इतर अनेक आख्यानक कवींनी शृंगाररसाची व कलात्मकतेची लयलूट करून सोडली; तीच कथा नाथांच्या हातून अत्यंत गंभीर उतरली आहे यांत नाथांच्या उन्नत मनोवृत्तीचा आपणाला प्रत्यय येतो. लग्न आणि तेंहि स्वयंवर हें खरोखर शृंगार व अद्भुत या दोन रसांचें माहेरघर; पण नाथांच्या या स्वयंवरांत शृंगार अभावानेच आढळावा हें आश्चर्य नव्हे काय ? रुक्मिणीने कृष्णाकडे पत्रिका लिहून ब्राह्मणाबरोबर पाठविली, तेव्हापासून तो ब्राह्मण द्वारकेवरून परत येईपर्यंतचा काळ हा विप्रलंभशृंगारवर्णनास अत्यंत अनुकूल. इतर अनेक कवींनी रुक्मिणीच्या या वेळच्या तळमळीची शृंगारपर खुमासदार वर्णनेंहि केलीं आहेत. पण नाथांनी या तळमळीचें भक्तींत पर्यवसान करून टाकलें आहे. 'मज नलगे विंझणवारा । तेणें अधिक होतसे उबारा' (५।७१) 'आंगीं न लावा गे चंदन । तेणे अधिकचि होतसे दीपन, (४।७२) असे कांही उल्लेख शृंगाराला साधक असल्यासारखे दिसले तरी त्यापूर्वीच 'अनावडी विषयाची' (५।६३), किंवा 'शरीरसुख विसरली' (५।६४) असे उल्लेख आले असल्यामुळे शृंगाराचें मूलकृन्तनच झालें आहे. अद्भुत रस देखील 'वस्तुनः संपत्' पेक्षाहि 'महतांचोपलक्षणम्' कडेच झुकता आहे. याचेंहि कारण हेंच होय.

नाथांनी आपला हा लहानसा ग्रंथ काशीक्षेत्रीं शके १४९३ मध्ये रामनवमीस संपविला अशी ग्रंथाच्या शेवटीं स्पष्ट नोंद आहे.

> वाराणसी महापुरी । मनकर्णिकेच्या तीरीं ।
> रामजयंती माझारीं । ग्रंथ निर्धारी संपविला ॥
> तै शके चवदाशे त्र्याण्णव । प्रजापति संवत्सराचें नांव ।
> चैत्र मासाचें वैभव । पर्व अभिनव रामनवमी ॥
> तें दिवशीं सार्थक अर्थी । रुक्मिणी स्वयंवर समाप्ति ।
> एका जनार्दन कृपास्थिति ।
> ग्रंथ वाराणसी प्रति संपला ॥
> (१८।८४, ८५, ८६)

वरील स्पष्ट उल्लेखामुळे संशोधकांना या बाबतींत कांही उद्योग करावयाचें नाथांनी ठेवलेंच नाही. रामनवमीस कृष्णकथांचें कीर्तन हा योगायोगहि नाथांच्या देवतैक्याच्या मनोवृत्तीवर प्रकाश पाडणारा आहे.

भागवत किंवा भावार्थ रामायण या नाथांच्या बृहद्ग्रंथांच्या मानाने प्रस्तुत रुक्मिणी स्वयंवर फारच लहान म्हणजे केवळ १६११ ओव्यांचें आहे. तें लहान लहान एकूण अठरा 'प्रसंगां'त त्यांनी विभागलें असून महाकाव्याच्या धर्तीप्रमाणे प्रत्येक प्रसंगास स्वतंत्र संज्ञाहि दिली आहे. आधारास भागवत आणि हरिवंशपुराण हें घेतलें असलें तरी त्यांनी रुक्मिणीस्वयंवराचा केलेला अर्थ त्यांचा खास स्वतःचा आहे. 'ये ग्रंथीचें निरूपण । जीवशिवा होतसे लग्न' (१८।७२) हा स्वयंवराचा त्यांनी अर्थ केला आहे व हेंच आध्यात्मिक रूपक सर्व ग्रंथभर खेळविलें आहे. हा अर्थ लक्षांत येण्यास वक्ता विवेकी आणि श्रोता सावधान पाहिजे असेंहि ते म्हणतात. आपण करीत असलेला हा स्वयं-

वराचा अर्थ कपोकल्पित आहे अशी शंका श्रोत्यांना येईल याची नाथांना कल्पना होतीच, म्हणून ते म्हणतात 'रुक्मिणीहरण वार्ता। जुनाट होय सर्वथा। परि पाणिग्रहण व्यवस्था। नवी कथा कवित्वाची ॥ ऐसा विकल्प मानाल क्षणी। जें बोलिलें श्री व्यासमुनी। तोचि अर्थ विस्तारुनी। प्रगट केला प्राकृतें ॥ (१८।६१, ६२) वटबीजाचा वृक्ष व्हावा तसा मी मुळाचा विस्तार केला आहे तेव्हा 'खोडी न ठेवावी चतुरी' (१८।६६) असें नाथ बजावतात. भागवतांत रुक्मिणीविवाहाचा लहानसा श्लोक पुढील प्रमाणे आहे:—

> भगवान् भीष्मकसुतामेवं निर्जित्य भूमिपान्
> पुरमानीय विधिवत् उपयेमे कुरुद्वह
> (भा. १०।५४।५३)

यांतील 'विधिवत्' या शब्दाचा भावार्थ नाथांनी आपल्या मनाप्रमाणे विस्तारला हें स्पष्ट आहे.

कोणताहि विषय असो, त्यांत शक्य तेथे आध्यात्मिक रूपकें आणावीं असा नाथांना विलक्षण ध्यास होता. तें त्यांच्या अवतारकृत्यास सुसंगतहि होतें. प्रस्तुत रुक्मिणी स्वयंवरांत अलंकाराच्या निमित्तानेहि हीं रूपकें ठायीं ठायीं आलीं आहेत. रुक्मिणीचा पिता हा 'जैसा विवेक' तिची आई ही 'श्रद्धापत्री'. रुक्मिणी ही 'चिच्छक्ति'. रुक्मिणी गर्भसंभूतीनंतरचे रुक्मिणीच्या आईचे नवमास म्हणजे 'नवविधा भक्ति'. लग्नप्रसंगीं काळ सावधान म्हणतो, सूर्य लग्नघटिका पाहतो, वियोग अंतःपट सोडतो आणि भावार्थ 'ओं पुण्य' म्हणतो (७।६६), 'जिवशिवा पाणिग्रहण' होतें असा हा एकंदर थाट आहे. भोजनासाठी केलेलीं पक्वान्नेंहि याला अपवादभूत नाहीत. विवेकाचे तिळवे केले, चर्वाकाचार फोडून निजबीजरूप चारोळी श्रद्धारूप साखरेंत आळवून त्याचे लाडू बांधले. (१५।४३)

वर वधूमंडपांत जावयास निघाला तो 'शुद्धसत्वाच्या श्वेतवारु'वर चढून. त्यावर निजबोधाचें आतपत्र आणि डोक्यावर तन्मयाचें छत्र होतें. अष्टमहासिद्धि या 'नाचणी' नाचत होत्या. शांति, क्षमा, दया, उन्मनी या सुवासिनी कृष्णाबरोबर होत्या. सोयऱ्यांपैकी कोणाला सलोकतेचा वारु दिला, तर कोणाला समीपता रथ दिला, तर दुसऱ्याला स्वरूपता कुंजरू दिला आणि विशेष मानकऱ्यांना सायुज्यता चवरडोलाचे अधिकारी केलें. (१५।९४–१११). सर्व ग्रंथभर वर्णनाची हीच तऱ्हा आहे. तेव्हा वर नमुने दिले तितके पुरे.

तशी मुख्य कथावस्तु अगदीच साधी आणि संक्षिप्त आहे. कीर्ति नामक ब्राम्हण भीमक राजाकडे येतो, आणि कृष्णाचें गुणगान करतो. लागलीच रुक्मिणी कृष्णावर अनुरक्त होते. तिच्या आईवडिलांचाहि तिला कृष्णार्पण करावयाचा निश्चय होतो. पण रुक्मिणीचा ज्येष्ठ बंधु रुक्मी याला कृष्ण आवडत नाही. तो बहिणीचें लग्न शिशुपालाशीं ठरवितो. रुक्मिणी कृष्णास पत्रिका पाठविते. पुढे कृष्ण येतो व ठरल्याप्रमाणे अंबालयांतून तिला घेऊन जातो. यापुढे युद्ध व पाणिग्रहणाचा विधि होतो हेंच सर्वमान्य व भागवतोक्त कथानक आहे. रुक्मिणीपत्रिका म्हणून भागवतांत जे सात प्रसिद्ध श्लोक आहेत ते रुक्मिणीच्या आर्त भक्तीचा नमुना म्हणून नाथांनी आपल्या ओवीबद्ध मराठी ग्रंथांत संपूर्ण उतरून घेतले असून त्यांतील प्रतिश्लोकावर टीका केली आहे. भागवतांत रुक्मिणीचा केवळ निरोप असतांना नरेन्द्रापासून नंतरच्या सर्वच मराठी कवींनी त्याची पत्रिका बनविली हें प्रसिद्धच आहे. नाथांनीहि तेंच केलें. ही मुख्य कथाच आध्यात्मिक रूपकात्मक आहे हें एकदा मान्य केल्यावर आंत अनेक उपरूपकें त्यास अनुसरून यावीं हें अगदी स्वाभाविक आहे.

अशा रीतीने या सर्व काव्याचा बनाव अतिशय गांभीर्यपूर्ण असल्यामुळे सर्वत्र भक्ति आणि शांत या रसांनाच मूर्धाभिषेक झाला आहे हें सांगणें नकोच. शांत रस आणि हास्य याचें सूत जरा कमीच आहे. पण नाथांनी कांही ठिकाणीं विनोदबुद्धि प्रगट करून आपली रसिकता प्रगट केली आहे. द्वारकेबाहेर वऱ्हाड निघून तें कुंडिनपुरास जावयास निघालें तेव्हा त्यांजबरोबर उंदरावर बसून ढेरपोटा गणपति निघाला. सिंहावर बसून दुर्गा निघाली. अष्टमातृका अशाच चमत्कारिक वाहनांवर बसून निघाल्या. त्या वऱ्हाडांत आताच्या प्रमाणेच कांही 'नेणती वऱ्हाडिणी चरबटा'

होत्या. त्या या चमत्कारिक सोंगांना पाहून त्यांची निंदा करूं लागल्या. अशा सोंगांमुळे हें 'फजीतीचें वऱ्हाड' होतें (म्हणजे यामुळे आमची 'पोझिशन' जाते!) असें त्या बायांचें उघड मत पडलें. यामुळे गणेश आणि अष्टमातृका कोपल्या. मग काय विचारतां? ठायीं ठायीं गाडे मोडूं लागले; रथाचे घोडे पांगळू लागले. वऱ्हाडांत शीतज्वर आणि विषूचिका (कॉलरा) या रोगांचा प्रादुर्भाव होऊन 'हगिओकी सूटली'! कृष्णाकडे फिर्याद गेली. त्याने कारण जाणलें आणि

कृष्णें स्तविला विनायक। दिधले साखरेचे मोदक
सुखिया जाला गणनायक। विघ्नें देख तियारितीं.

हा एकंदर प्रसंगच विनोदास साधक असा उतरला आहे (१४।५६-७०). गद जरासंध संवादांत 'गद' शब्दावरील कोटीहि विनोदी आहे (११।३६).

नाथांची वर्णनशैली संथ आहे. लालित्याच्या भरीस ते आपण होऊन पडले नाहीत. सहज ओघांत एखादी सुंदर उत्प्रेक्षा ते करून जातात. सातव्या प्रसंगांत रुक्मिणीच्या शरीराचें वर्णन करण्यांत अशा कांही उत्प्रेक्षा आल्या आहेत. उदा०—

चंद्र क्षीण कृष्णपक्षीं। म्हणे हा पूर्वील माझा वंधु की
म्हणूनी कळवळली भीमकी।
तो निजमुखी धरियेला ७।१०

त्यापूर्वी द्वारकेस पत्र घेऊन जाणाऱ्या ब्राह्मणासंबंधी अशीच सुंदर उत्प्रेक्षा आली आहे—

तो ब्राह्मण नव्हेचि निश्चित।
मूर्तिमंत भीमकीचा भावार्थ
भावे नेला कृष्णनाथ।
एकाएकी एकला। ५।३६.

नाथांच्या वर्णनांत पूर्वकवीच्या वर्णनांची छटाहि कांही ठिकाणीं दिसते. एका वर्णनांत—

बाबर झोटिया केसाळ। तेचि नदीमाजी शेवाळ
मगर सुसरी महाविशाळ। शिरें विक्राळ वीराची १०।८१

ही ओवी कालिदासीय कल्पनेची आठवण करून देणारी आहे.

कृष्णविवाहाचा सोहळा मात्र क्षत्रियाच्या लग्नाचा नसून एकनाथकालीन ब्राह्मविवाहपद्धतीचा आहे. तेलवाण, रुखवत, गौरीहरपूजा, घेंडा नाचविणें इत्यादि सर्व विधि त्यांतील आहेत. पक्वान्नें हीं एकनाथकालीन सुबत्ता व कौशल्य हीं दोन्ही दाखविणारीं आहेत.

एकनाथ तसे फार साक्षेपी कवि आहेत. आपल्या हातून सहसा चूक होऊं नये यासाठी ते फार जपतात. आध्यात्मिक रूपकांत त्यांनी हा काटेकोरपणा निश्चितच पाळला आहे. पण एका ठिकाणीं अनवधानाने त्यांच्या हातूनहि कालविपर्यासाचा दोष घडलाच. दुसऱ्या प्रसंगांत 'रुक्मिया' श्रीकृष्णाची निंदा करतो असा प्रसंग आहे. ती निंदा अशा रीतीने केली की त्यांतूनहि श्रीकृष्णाचें देवत्वच प्रगट व्हावें. या संदर्भात एक दोन उल्लेख पुढीलप्रमाणे आहेत—

कृष्णाशी नाही देहाभिमान।
कदा नेणे तो मानापमान।
तयाचें गाठी कैचें धन।
भाजीचें पान खातसे ॥ २।२२
'उच्छिष्टें काढी धर्माघरीं' २।२६

यांतील घटना या श्रीकृष्णविवाहानंतर घडलेल्या आहेत तरी त्यांचा उल्लेख अगोदर आलेला आहे. पण एकंदर मराठी कवींचें ऐतिहासिक क्रमाकडील दुर्लक्ष लक्षांत घेतां एकनाथांना फारसा दोष द्यावासा वाटत नाही.

कुमारिकांनी रोज निष्ठेने नाथकृत रुक्मिणी स्वयंवर वाचलें की त्यांना अभिमत वर प्राप्त होतो अशी समजूत माझ्या लहानपणापर्यंत रूढ होती व त्याप्रमाणे घरोघरीं हा ग्रंथ कुमारिका वाचत.

सारांश, उत्तम अध्यात्मपर ग्रंथ कथाकाव्याच्या मिषाने नाथांनी आम्हांला दिला आहे हे त्यांचे महदुपकार आहेत.

अनुक्रमणिका

# सामराजाचें रुक्मिणी–हरण

## श्री. मधुकर केचे

विदर्भांतलें एक मानवाईक घराणें, त्यांतली एक सुस्वरूप, सुविद्य व सुशील कुमारी. एकाहि माणसानें जिच्या विशुद्ध चारित्र्यावर शिंतोडा उडवूं नये अशी. पण घडतें काय की ती सुशील मुलगी एका पर प्रांतांतल्या तरुण पुरुषाचें गुणवर्णन ऐकते. तिचें तात्काळ त्याच्यावर मन बसतें. त्याच्या आठवणीविना तिला कांहीहि सुचेनासें होतें. मनाची ही अस्वस्था शरीरावरहि उमटूं लागते–तिला ज्वर येऊं लागतो. हा कामज्वर तिच्या भोळ्या आईस कळत नाही.

ही मुलगी शेवटीं एक निश्चय करते. उपवर झाल्यामुळे चार चौघांसारखें तिचें लग्न करावें असें वाटून एका तरुण व मानपान लाभलेल्या पुरुषांशीं तिची सोयरिकहि ठरते. मुलीला मात्र तो वर नापसंत असतो. ती सरळ सरळ एक पत्र लिहिते. प्रेमपत्र ! आणि वागणूक अत्यंत सभ्य असणारा एक ब्राह्मण तिच्या या कटांत सामील होतो. तो त्या तरुणाची भेट घेऊन तें प्रेमपत्र त्याला देतो. आणि एकदम चक्रें फिरूं लागून सर्व घटनांची वीण इष्ट परिणाम गुंफूं लागते.

कोणत्याहि कादंबरीचें कथानक हें किंवा बऱ्याच प्रमाणांत असें असूं शकतें. पण इथे महत्त्व थोडें वेगळें आहे. कादंबरींतल्या व्यक्ति येऊन जाऊन काल्पनिक असतात. कादंबरी खाली ठेवली की त्या सर्व घटनांमधला व व्यक्तींचा वाङ्मयीन सत्याभास ओसरतो. म्हणून एरव्ही आपण डोळेझाक करतों. वर दिलेलें कथानक जर ऐतिहासिक असेल तर झालें गेलें विसरावें अशा वृत्तीनें आपणास त्या वर्तनांतली निषिद्धता बोचत नाही. पण येथे तर त्याहूनहि वेगळें आहे. ती मुलगी वाङ्मयीन असली तरी ती कोणालाच काल्पनिक वाटत नाही. ती प्रत्येकाला आपल्या घरची मुलगी वाटते. तिच्या अशा कुमारीपणास न शोभणाऱ्या कृत्यामुळेहि तिच्याविषयी वाटणारी आपुलकी नष्ट होत नाही. उलट ती असें जगावेगळें धाडस करणारी मुलगी तुम्हाआम्हाला आदर्श वाटते. ती व तिचें असें अद्‌भुत प्रेमाराधन घडायला मोठमोठ्यांच्या अंदाजानुसार दोन अडीच हजारावर वर्षें होऊन गेलीं. पण ती पोरगी, तिचा पराक्रम हे जणूं काल घडले असे ताजे आहेत.

नवल आहे तें येथेच. पण हें भाग्य म्हणजे अशी धाडसी वागणूक व त्यामुळे होणारें कौतुक कांही प्रत्येक पोरीच्या वाट्याला येणार नाही. अशा वागण्यामुळे आईवडिलांच्या कुळाला कलंक लागत असतो. पोरगी मेली कां नाही असें आप्तमंडळीस वाटत असतें. "अहो, थोरामोठ्यांच्याविषयी असं बोलूं नये आम्ही गरिबांनी; पण तुम्हीच सांगा. असा अंधार त्यांना शोभतो का ?" असे प्रश्न झडतात.

पण वर सांगितलेल्या पोरीच्या वाट्याला हा चिखल आला नाही. या नवलाचें श्रेय दोन प्रवृत्तींना जातें. त्या मुलीचा–रुक्मिणी तिचें नांव–द्वारकेचा अधिपती श्रीकृष्ण याच्याशीं झालेला पत्रव्यवहार, तिचें लग्न हा व्यापार आम्हाला इतका आवडतो, याचें कारण आमचीं धार्मिक मनें. ही धार्मिक प्रवृत्ति आमच्यांत आहे म्हणून प्रस्तुत कथानकाच्या नायक–नायिकांभोवती एक पावित्र्याचें वलय फिरूं लागतें व त्या वलयामुळे तेथली प्रत्येक घटना मंगल स्वरूपांतच दिसते. याचेंच श्रेय दुसऱ्याहि प्रवृत्तीला जातें. ती प्रवृत्ति म्हणजे काव्याची आवड. देव कोणी निर्माण केला हा एक विवाद्य विषय आहे. पण तो कवींनी सुंदर रूपडें चढवून सजविला व संतांनी तो टिकविला हें मात्र

खरें. म्हणूनच संतांनी टिकविलेलें कृष्ण-रुक्मिणीचें देवतापण व कवींनी त्या अतीव पावन कल्पनेभोवती नाद, रंग, गंधांनी घडविलेली रमणीयता आजहि जशीच्या तशीच आहे.

संत आणि कवि या दोघांचा ज्यांच्यामध्ये संगम झाला आहे, अशा माणसानें जर हें कथानक हाताळलें तर जीवनाचा पाया ठरणारें पावित्र्य व कला हीं दोन्हीहि कथेच्या कणाकणांतून ओसंडेल. म्हणूनच सामराजाचा अधिकार मोठा मानावा लागतो.

हें कथानक प्रेमविषयक; पण रति हा देवविषयक म्हणून आपोआपच त्याचें स्वरूप श्रृंगारापेक्षा भक्तीचें प्राधान्य अंगीकारील. त्यांतला विरह हा नल-दमयंती स्वयंवराख्यानांतल्या मानवी नायक नायिकांसारखा श्रृंगार व करुण रसाचा द्योतक ठरणार नाही. म्हणूनच रघुनाथपंडिताच्या प्रतिपाद्य विषयाप्रमाणे ही कथाधारा श्रृंगारा करुणरसा थारा होणार नाही. हा अर्थातच रचयित्याच्या दृष्टीचा परिणाम. कृष्णासारखा नल हा देव नाही. म्हणून कृष्णाचा रति हा देवविषयक म्हणून सामोपचारी साहित्यशास्त्रकारांना ह्याचा समावेश भक्तिरसांत करावासा वाटतो. तसा नळाच्या रतीचा मान नाही. सामराज भक्तीची कल्पना याहिपुढे नेतो. देवविषयक रति म्हणजे भक्ति वे तिच्याच जोडीला वारंवार कृष्णस्तवन, दर्शनोत्कण्ठा ही रुक्मिणीच्याच नव्हे तर सुदेव, रुक्मिणीचा बाप इत्यादींच्यामध्ये दाखवून त्याने ही देवविषयक श्रृंगारिक कथावस्तु भक्तींत डुबवून निर्मळ केली. सामान्यपणें मधुराभक्ति सोडली तर भक्तीचे इतर प्रकार हे श्रृंगाराच्या संदर्भात 'अस्वाद' ठरतात. खाण्यापिण्याचें अस्वाद व्रत गांधीजींनी जसें शुद्धस्वादावर आणलें तसेंच सामराजानेहि शृंगाराला आगर ठरणारें प्रस्तुत कथानक भक्तिमय करीत असतांना त्याला मधुरपणाचा अभाव बाधूं दिला नाही. शुद्ध रति व रुचकर भक्ति असें हें शुद्ध व आस्वाद्य प्रकरण झालें.

तथापि बांधेन कथा विचित्रा! आपला कथाबंध हा विचित्र (विविधरसांनी युक्त) असा बांधत असतांना 'पदोपदीं पावन जें पवित्रा' असा रोख कायम राखण्याचा निर्धार हेंच स्पष्ट करतो. म्हणजे प्रत्येक रसांत भक्तिरसाची धारा घालून ते रस पवित्र करण्याची कल्पना व आजची मंगलामंगलास शुद्ध दृष्टीने पाहून त्यांचें चित्रण संयमपूर्ण व सहानुभूतीने करण्याची कल्पना या परस्परांशीं जुळणाऱ्या आहेत. कथानक बांधणाऱ्याला एक जीवितविषयक दृष्टिकोण असतो. त्या तत्त्वज्ञानाच्या बैठकीवरच त्याने अत्यंत अलिप्त राहून बांधलेला कथेचा डोलारा उभा असतो. हें आजचें कथातंत्रधनाचें तंत्र व 'तुझ्या कृपेचा परि ईस पाया' हे (ईस-कथेस) व कृपेचा पाया (पवित्र बैठक) जुळतात.

महाकाव्य लिहिणाऱ्यास अत्यंत आधारभूत असलेल्या या गोष्टी सामराजाजवळ किती आहेत त्याची साक्ष रुक्मिणीहरणाच्या कथातंत्रामध्ये प्रत्ययाला येते. त्याने आपल्या कथानकाची रचना आठ सर्गांमध्ये केली. पण सर्गांत कथानक विभागत असतांना विभाजनाचा आधार हा घटनांवर ठेवला नाही. सर्गामुळे घटनांना संगति आली. कालक्रम साधला. स्थल व व्यक्ति यांचीं चित्रणें व परिचय साधले. हें सर्व कथानिवेदनांतील नैपुण्य दाखवितें हें खरें. पण या सर्गरचनेमुळे कथामांडणीचा जो मुख्य उद्देश म्हणजे घटनांची गतिमान घडण व एका विशिष्ट उत्कण्ठेमुळे एकींतून दुसऱ्या घटनेचा आकर्षक जन्म हें मात्र साधत नाही. एक सर्ग वाचल्यावर दुसरा सर्ग वाचण्याची उत्कण्ठा उत्पन्न करणें, घटनांची गुंफण वाचकाला आवश्यक वाटावी अशी (कथानकाच्या संदर्भात अटळ वाटणारी) करणें व अद्भुत वातावरणांतून कथेला घुमविणें इकडे सामराजाचा फारसा कल नाही. मध्यवर्ती रस जो भक्ति त्याच्याभोवतीं सर्व घटना फिरत्या ठेवायच्या, त्यांना गति आलीच तर ती निवेदनचातुर्याने नसून भक्तीमुळे यावी, हाच उद्देश या कथारचनेंत अथवा सर्गविभाजनांत दिसून येतो. विशेष घाई नसलेला रसिक प्रवासी हा मुक्कामावर पोचण्यासाठी अधीर न होतां त्याच्या रस्त्यावरील सर्व माधुर्य पाहात पाहात जातो. कधी वाटलें तर चाल जलद करतो, कुठे एखादें रमणीय दृश्य आढळलें तर

पुढे चालायचें विसरून क्षणभर तेथे रमून जातो. मुक्कामावर मिळणारा आनंद, शांति व रमणीयता ही रस्त्यांतहि पसरली आहे हा त्याला विश्वास असतो. म्हणूनच तो घाईने रस्ता पार करून, अधीरपणा, मुक्कामाविषयी उत्कण्ठा इ० चें स्तोम माजवून रस्त्यावरची रमणूक गमावीत नाही. सामराजाचेंहि असेंच आहे. 'जनरंजनाचें अगत्य मला नाहीं' असें तो म्हणतो. त्यामुळे तंत्र, उत्कण्ठा, आकर्षकता इ०चें स्तोम गेलें. 'लागे तुझें ध्यान निरंजनाचें' हें त्या अगत्याच्या जाण्याचें कारण. त्यामुळे भक्तीचा विलास साधण्याकडे सर्गरचनेचा प्रयत्न ओढ घेतो.

पण भक्ति व शृंगार यांचा संगम करून भक्ति ही रुचिर व शृंगार हा शुद्ध स्वादाचा करण्याची किमया सामराजास साधली असें म्हणत असतांना त्याने कथारचनेकडे बिलकूलच दुर्लक्ष केलें असें विधान करतां येणार नाही. शृंगाराला भक्तीचें अधिष्ठान व कलेला नीतीची बैठक असें हें समीकरण त्याने राखलेलें आढळतें. म्हणूनच नीति रुक्ष न राहतां कलापूर्ण झाली व कला नीतिमुळे शुद्ध झाली. कथानकाच्या घटनाहि भक्तिरसाला पोसणाऱ्या व शृंगाराला संयमित करणाऱ्या ठरून शिवाय रुचिर वाटतात त्या यामुळेच. त्यांची गुंफण वर सांगितलेल्या रसिक वाटसरूच्या वाटचालीसारखी आहे. ती मेलेल्या गतीची नाही. तशीच पाठीमागे भूत लागल्याप्रमाणे कला—मूल्याची ओरड करीत व तंत्राचा बोझा डोक्यावर सांभाळीत धावणारीहि नाही. संथ चालींतहि आनंदानुभूति घेणारी ती कथागति आहे. असो.

सामराजाचें निवेदनशैथिल्य डॉ. केतकरांच्या कथनप्रणालीशीं बरेंचसें जुळतें. नवलाईने परिपूर्ण असलेली घटना घेऊन तिला समाजशास्त्राच्या तत्त्वज्ञानांतून वाट काढायला लावणारी संथगति शैली डॉ.च्या ब्राह्मणकन्येंत आढळते. सामराजाने सर्वसुपरिचित व नवलपूर्ण कृष्णरुक्मिणीची प्रणयकथा अशीच भक्तिविस्तारांतून रमतगमत पुढे नेली. भक्तीची रमणूक वाढविणारें स्थळ दिसलें की कथावस्तूचा ओघ तेथे वळसा घेतो, तुंबतोहि. केतकरांची समाजचर्चा अशीच कथेच्या प्रवाहास थांबविते. कलेच्या रूढ संकेतांना त्यामुळे बाध येत असला तरी कृष्णस्तवनाचा उजाळा तिला उत्तरोत्तर मिळत जातो.

म्हणूनच पहिला सर्ग नमनांत खर्ची पडूनहि वाचकाची तक्रार उरत नाही. पुढचे सर्गहि कथेपेक्षा व्यक्ति चितारण्यासाठी व विशेषतः त्यांचीं भक्तिपूर्ण अंतःकरणें रंगविण्यासाठी उपयुक्त झाले. रुक्मिणीचा जन्म देवी लक्ष्मीच्या कृपादानाने होतो, या अद्भुततेंतहि भक्ति आहे. मुलीचें चंद्रकलेप्रमाणे वाढणारें देहसौंदर्य हें तिच्या शुद्ध अंतःकरणापासून वेगळें काढतां येत नाही. तिचा कृष्णविषयक प्रणय, अंतर्बाह्य दाह हेहि भक्तिपूर्णच, व दुष्टबुद्धि भाऊ जेव्हा कृष्णनिंदा करतो तिचाहि एक अर्थ हा कृष्णस्तवनाचाच असतो.

सुदेव ब्राह्मण हा दूत. नलदमयंती आख्यानांतला हंस हा चतुर व मानवी वाटतो. तशाच दूतपणाचें कार्य सुदेवाकडे आहे. त्याच्याहि अंगीं चातुर्य आहेच. परंतु नुसत्या चातुर्यावर त्याचें चित्रण थांबत नाही. तो अग्निपूजक असा पवित्र ब्राह्मण भगवान श्रीकृष्णाचा परमभक्त असतो. म्हणूनच रुक्मिणीसाठी करावें लागणारें दूतपण हें त्याला स्वतःच्याच जिव्हाळ्याचें कार्य वाटतें. नळाला दिलेलें वचन पाळण्यासाठी नाइलाजाने दूत झालेला हंस अथवा कांही नातेंगोतें नसतां केवळ स्तुतिवर्षाव करून यक्षाने पत्नीकडे पाठविलेला मेघ यांपेक्षा भिन्न पण प्रबळ नातें सुदेव व रुक्मिणी यांचें असतें. कृष्णाचा मोकळा वेळ पाहूनच तिचें पत्र त्याला देण्याचा सूज्ञपणा त्याच्या ठायीं आहेच. शिवाय वाटचालींत तो भारताचा भूगोल न शिकतां कृष्णस्तवन करीत काळ कंठतो. कालिदासाच्या मेघासारखें त्याला रस्त्याच्या रमणीय देखाव्यांचें प्रलोभन नसतें, हंसाला नळाकडून मिळालेलें स्वातंत्र्यहि त्याच्या (सुदेवाच्या) वाटचालीचा हेतु नसतो. केवळ श्रीकृष्णभक्ति!

आवडत्या माणसाचें सारेंच आवडतें, हा प्रेमसिद्धान्त सामराजालाहि लागू आहे. भक्तिपूर्ण कथनांत रुचिरता व इतरहि कलामूल्यें आणायला तो सिद्धांत बराच उपयुक्त ठरला आहे. उदा. रुक्मिणीचें देहवर्णन, कृष्णाचें वर्णन; द्वारका वर्णन, तो रुक्मिणीच्या

अनुक्रमणिका

नगरांत रस्त्याने चालत असतांना त्याचा रुबाब व नागरिकाचा आनंद इ. तद्वतच नायिकेच्या मनःस्थितीस संवादी असें सकाळचें वर्णन हेंहि कलेचा उल्हासच आहे. कवीनें तिची मनःस्थिति चितारण्यासाठी स्वप्नरंजनाची (क्षणभरि तिस लागे जागृतीमाजि डोळा) युक्ति वापरून वर पुन्हा त्यांतच श्रीकृष्ण-रेखा रंगविली.

बहुश्रुतपणाचा प्रत्यय यांत येतो. मुलीस (रुक्मिणीस) केलेला उपदेश हा त्याच्या समाजाभिमुखतेचा पुरावाच. 'हें सर्व कांही करणें मला जमणार नाही. केवळ तुझ्या कृपेमुळेच तें साधेल' असें नम्रपणें सामराजाने म्हटलें आहे. तें कशामुळेहि का होईना पण त्याला उत्तम साधलेलें आढळतें. कथा उसनी घेऊन कलाकृति उभारल्याने शेक्सपियरला जसा उसनवारीचा दोष लागूं नये तसाच सामराजालाहि मूळ पुराणकथा घेऊन त्यावर स्वप्रतिभा व भक्ति यांचे मळे फुलवितांना मायांतरकार म्हणूं नये.

त्याचे अलंकार, शब्दरचना, वृत्तयोजना इ. ची चर्चा इथे अप्रस्तुत ठरेल. त्यावर वेळोवेळीं विद्वानांनी वाचकांना ऋणी केलेंच आहे. व्यक्तिदर्शनावर त्याने कथेच्या मांडणीच्या मानाने दिलेला भर व विशेषतः सुदेवाच्या वायकोच्या निमित्तानें सामाजिक प्रतिनिधि रंगविणारें सामर्थ्य यांचा उल्लेख मात्र आवश्यक आहे.

जातां जातां एक शंका उरते–तो रुक्मिणीहरण काव्यास 'कथा हे कृष्णाची...' असें संबोधतो! म्हणजे हें कृष्णाला दिलेलें (रुक्मिणीपेक्षा) प्राधान्य की ही कथा त्याने विचित्र (विविध रसांची) करण्यासाठी पुढेहि लिहून ठेवली आहे? तसें असेल तर तो भक्तीचा अदृश्य ओघ शोधायला हवा.

---

# कथाकवि मोरोपंत

प्रा. श्री. मा. कुळकर्णी

मयूरकाव्यविवेचन आजवर पुष्कळच झालेलें आहे. तथापि कालागणिक व व्यक्तिगणिक कांही जुन्या मूल्यवान वाङ्मयाचें, नवें नसलें तरी निराळें दर्शन शक्य आहे. शिवाय मोरोपंतांच्या वाङ्मयाचें सर्वसामान्य विवेचन झालेलें असलें तरी त्यांच्याकडे 'कथाकवि' म्हणून पाहण्याच्या दृष्टीने त्यांच्यांतील गुण शोधण्याचा जाणीवपूर्वक व स्वतंत्र असा प्रयत्न अद्याप फारसा झाला नाही. प्रस्तुत लेखांत असा एक प्रयत्न करण्याचें योजिलें आहे. मात्र हा प्रयत्न मर्यादित स्वरूपाचाच राहणार आहे. कारण स्थलकालाच्या अल्प मर्यादेंत या व्यापक विषयाला बसवावयाचें आहे.

मोरोपंतांचें बहुतेक वाङ्मय कथात्मकच आहे. व तें विपुल आहे. त्या सर्वांचा ओझरता देखील परिचय येथे करून देणें शक्य नाही. परिचय तर राहोच, त्या सर्व वाङ्मयाचा विचारहि, प्रस्तुत लेख लिहितांना, मनाशीं देखील बाळगतां येणार नाही. मोरोपंतांच्या कथावाङ्मयाचा परिचय करून देणें हा या लेखाचा उद्देशहि नाही. 'कथा कवि' या नात्याने मोरोपंतांचें ओझरतें दर्शन घडविणें हेंच येथे उद्दिष्ट आहे व तेवढेंच शक्य आहे.

पंतांना परमेश्वराच्या व परमेश्वरभक्तांच्या **कथा** अत्यंत प्रिय होत्या. 'कथा सुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती'; 'कथा भुवनमोहिनी अशि न मोहिनी होय ती' यासारख्या केकावलींतील ओळीं-वरून सुद्धा पंतांची ही आवड लक्षांत येण्यासारखी आहे. ही वरवरची नव्हती. पंतांचें हृदय या कथांनी सदैव रंगलेलें होतें. आजन्म त्या कथा गाऊनहि त्यांचें मन त्या कथांना विटलें नाही. उलट अधिकाधिकच तें त्यांत रंगत गेलें. त्या कथांमध्ये 'पंतांना प्रतिक्षण नवीच रुचि' आढळत होती व ज्याला या कथांचा मोह पडत नाही त्याला ते 'अरसिक' व 'अधन्य' समजत होते.* उलट तिच्यांत रमणाऱ्याला ते 'महारसिक' मानीत होते.‡ अशा या 'महारसिका'ने असंख्य 'कथा सुरभींचें' दोहन केलेलें आहे व तें 'अमृत' महाराष्ट्र भाषेच्या भांडारांत श्लोकांच्या कुसरी कुंभांतून वा आर्यांच्या घाटदार घटांतून साठवून ठेवलें आहे.

या कथा आळविण्याच्या मागची पंतांची भूमिका व त्या मागचें त्यांचें अंतरंग व व्यक्तिमत्व समजून घेणें आवश्यक आहे. त्या 'अमृताची चवी' आपणाला कळणार नाही.

संत कवींत जसे एकनाथ तसे पंत कवींत मोरोपंत होत. दोघांनीहि आपापल्या सामर्थ्यानुसार प्रपंच व परमार्थ दोन्ही साध्य केलें. दोघेहि प्रेमळ कुटुंबवत्सल; सांसारिक कर्तव्यें जबाबदारीने दोघांनीहि पार पाडलीं; दोघांनीहि प्रचंड वाङ्मयनिर्मिति केली. हें साम्य इथे संपेलहि आणि मलाहि ही तुलना वाढवावयाची नाही. तात्पर्य इतकेंच की एकनाथांच्या नंतर त्यांच्या तोडीचें नसलें तरी जोडीचें, पंक्तीचें नसलें तरी जातीचें व्यक्तिमत्व मोरोपंतांचें होतें.

---

* प्रतिक्षण नवीच दे रुचि शुकाहि संन्यासिया;
न मोहिति भवत्कथा अरसिका अधन्यासि या
—श्लो. के. १००

‡ कथा श्रवणचत्वरीं जरि पुनःपुन्हा ये, रते
महारसिक तद्रसीं; विटति ऐकतां येर ते;
—श्लो. के. १०१

पंत हे मोठे कुटुंबवत्सल गृहस्थ होते. जात्याच प्रेमळ व कृतज्ञ. त्यांत अनुकूल परिस्थितीची भर पडल्यामुळे या व इतर सद्गुणांचा त्यांच्या ठिकाणीं चांगला विकास झाला व त्या गुणांच्या योगाने त्यांचा गृहस्थाश्रम त्यांना व इतर संबंधितांना सुखावह झाला. हे गुण व या सुखोर्मि त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणीं प्रत्ययाला येतात. पंतांची सहानुभूति आप्तस्त्रकीयांची सीमा ओलांडून गेलेली होती. प्रेमळ भक्त अशी त्यांची त्यांच्या काळींच ख्याति झाली होती. व ती यथार्थ होती. त्यांचें अंतःकरण हरियशोगानांत सदैव रंगलेलें होतें.

'पंतांच्या ठिकाणीं कवित्व व त्याला अनुरूप असें रसिकत्वहि होतें. त्यांनी कवित्वाला व्यासंगाची व रसिकत्वाला सुसंस्काराची जोड दिली, त्यामुळे त्यांचें कवित्व जसें भरदार व प्रौढ झालें तसेंच त्यांचें रसिकत्वहि सात्त्विक व सुजाण झालें.'

पंतांचें हें व्यक्तिमत्व ध्यानांत घेऊनच त्यांच्या काव्यलेखनविषयक भूमिकेकडे पाहिलें पाहिजे. हें गुणगान त्यांनी मुख्यतः आत्मोद्धारासाठी केलें असलें तरी इतरांचें हित साधण्याचाहि त्यांचा हेतु होता. केकावलीसारख्या भावकाव्याच्या मुळाशींच नव्हे तर महाभारतासारख्या कथाकाव्याच्या मुळाशींहि पंतांचा हेतु 'आपण तरावयाचा' होता. 'सुदाम चरित्रा' सारख्या लहान कथाकाव्याच्या प्रारंभीं देखील पंत म्हणतात—

द्विज निजसख देवें तारिला त्या चरित्रा,
क्षणभरि तरि गाऊं, हो स्ववाचा पवित्रा

तेव्हा लहानमोठ्या अशा सर्वच काव्याच्या मुळाशीं स्वतःचें पापनिवारण, पावित्र्यलाभ व परमेश्वरप्राप्ति असा पंतांचा हेतु दिसतो. थोडक्यांत, आत्मोद्धार हा एक हेतु पंतकाव्याचा दिसतो. या प्रधान हेतुबरोबरच इतरांना सन्मार्गदर्शन करणें हाहि एक हेतु पंतांचा होता हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. ठिकठिकाणीं पंतांनी जो उपदेश केला आहे, जें हिताहित कथन केलें आहे व सुभाषितांची जी पेरणी केली आहे त्या सर्वांवरून हा हेतु लक्षांत येण्यासारखा आहे. मुख्य आत्मोद्धार व त्याबरोबर स्वतःच्या अधिकारानुरूप इतरांना सन्मार्गदर्शन असा दुहेरी हेतु पंतांनी ठेवला होता. ते भगवद्भक्त होते याच्याशीं हें सुसंगत झालें.

परंतु पंत हे जसे भगवद्भक्त होते तसेच ते रसिक कवीहि होते. कवित्वशक्ति यांच्या ठिकाणीं नैसर्गिकच होती व तिला व्यासंगाची जोड देऊन त्यांनी तिचा विकासहि केला होता. 'आमरण ग्रंथ रचण्याची' त्यांची मनीषा होती. ठिकठिकाणीं त्यांनी स्वतःचा उल्लेख 'कवि' असा केलेला आढळतो. महाभारत रचनेने तर त्यांना धन्यता वाटली व त्या धन्योद्गारांत आपल्या मातेला 'सत्यवतीची आली' म्हणून स्वतःला 'व्यासाचा सखा' असें मोठ्या खुबीने त्यांनी सुचविलें. कृष्णविजयांतील 'सुभद्राहरण' आख्यानाच्या शेवटीं 'रसिककर्णतर्णकशत' तर्पायासि या कथा कामधेनु आहेत असें पंत सुचवितात. या व इतर अनेक उल्लेखांवरून व पंतांच्या रचनेंत प्रगट झालेल्या काव्यगुणांवरून त्यांच्या या 'कवि' भूमिकेचीहि कल्पना निश्चितपणें करतां येते.

पंतांचें व्यक्तिमत्व, त्याच्याशीं सुसंगत असा त्यांचा काव्यरचनेचा हेतु व त्यांची भक्ताची व कवीची अशी उभयविध भूमिका ध्यानांत ठेवून त्यांच्या कथाकाव्यांकडे आपण पाहूं लागलों तर त्यांत कांही निराळीच गोडी असल्याचा आपणांला प्रत्यय येईल.

मोरोपंत किंवा इतरहि पंडित कवि—हे नुसते भाषांतरे आहेत हें म्हणणें वरवरचें, स्थूल दृष्टीचें झालें. त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणीं प्रतिभेचा स्वतंत्र विलास आढळतो एवढ्याचसाठी मी हें म्हणत नाही. मला येथे निराळाच मुद्दा सुचवावयाचा आहे. स्वतंत्र कल्पनाशक्ति नाही म्हणून पौराणिक कथांचा आधार पंतांनी घेतला असें नसून त्या कथांत ते रंगले होते, त्यांत त्यांना अवीट गोडी होती, आत्मोद्धाराचा व सन्मार्गदर्शनाचा तो एक मार्ग त्यांना दिसत होता, वाटत होता व पटत होता म्हणून त्यांनी त्या कथा गाइल्या आहेत. १०८ वेळां रामायणाची कथा पंतांनी गाइली ती काय स्वतंत्र कथा कल्पितां येत नव्हती म्हणून ? असें समजणें म्हणजे त्यांच्या काळाविषयीं, भूमिकेविषयीं व काव्यहेतूविषयीं अज्ञान प्रगट करणें

होय. पण हा मुद्दा येथेच सोडून देऊं. आपल्या दृष्टीने प्रस्तुत, व महत्त्वाचा मुद्दा इतकाच की या सर्व **कथांशीं कथाकार 'तन्मय' झालेला आहे.** आणि कथाकाराची कथावस्तूशीं तन्मयता हा जर एक आवश्यक व महत्त्वाचा वाङ्मयगुण मानला, तर तो पंतांच्या या कथाकाव्यांत् प्रामुख्यानें दिसून येणारा आहे. आणि यामुळेच पंत हे केवळ 'भाषांतऱ्ये' ठरत नाहीत.

भारत, रामायण व भागवत यांच्यांतील कथा महाराष्ट्रवाणीने गातांना पंतांनी एक विशिष्ट धोरण सांभाळलेलें दिसून येतें आणि तें म्हणजे होतां होईल तों वेदांत, तत्त्वोपदेश, स्तवन, नीतिकथन या मुळांतल्या भागांना फाटा देऊन नुसती कथा तेवढी घ्यायची आणि तिला कल्पनांनी खुलवून, फुलवून व अलंकारांनी नटवून, सजवून मांडावयाची. 'मदालसा चरित्र' हें मार्कंडेयपुराणांतून पंतांनी घेतलें. पण तें वर्णितांना सरळ कथा तेवढी वर्णिली, मधला उपदेश गाळून टाकला. महाभारत स्वल्पांतच आणतांनाहि कणिकनीति, विदुरनीति, भगवद्गीता, शांतिपर्वांतील उपदेश इ० भाग टाळले आहेत. [ही नीतिशिक्षणाची उणीव ठिकठिकठिकाणीं सुभाषितांची पेरणी करून व दृष्टांत अर्थांतरन्यासादि अलंकारांची योजना करून पंतांनी भरून काढली आहे.] अशा उपदेशपर व चर्चास्वरूप भागाप्रमाणेच पंतांनी अन्य दृष्टींनी अनावश्यक वाटणारा भागहि गाळला आहे. उदाहरणार्थ, उद्योगपर्वांतील गरुडगर्वपरिहाराची ९ अध्यायांत वर्णिलेली कथा पंतांनी अवघ्या २८ आर्यांत आटोपली आहे. याचें कारण पांडवांच्या चरित्राशीं या कथेचा कांही संबंध नाही. तसेंच त्याच पर्वांतील १७ अध्यायांत वर्णिलेला गालवांचा इतिहास पंतांनी २२ आर्यांत गुंडाळला आहे. याचेंहि कारण हेंच. याच्या उलट कृष्णविजयांत—जेथे श्रीकृष्णाच्या कथाच मुख्यत: वर्णावयाच्या होत्या तेथें—पंतांनी फारसा संक्षेप केला नाही. कांही ठिकाणीं विस्तारच केलेला आहे. मात्र येथेंहि दशमस्कंधांतील १४ व्या अध्यायांतील सविस्तर ब्रह्मस्तुति पंतांनी थोडक्यांत आटोपली आहे व पुढे ८७ व्या अध्यायांतील वेदस्तुति संपूर्णतः गाळली आहे. अशीं संक्षेप-विस्ताराचीं अनेक ठिकाणें बारकाईनें पाहिलीं म्हणज कांही गोष्टी ध्यानांत येतात. पंतांचें लक्ष मुख्यतः कथाभागावर खिळलेलें असे. वर्ण्य कथेखेरीज इतर कथांनाहि पंत टाळीत असत. कथांत अडथळे उत्पन्न करणारे व कंटाळवाणे वाटणारे भाग ते गाळीत असत. त्यामुळे पंतांच्या कथा रेखीव, आटोपशीर व चटकदार झाल्या आहेत.

पंतांची भूमिका भगवद्भक्ताची व कवीची अशी दुहेरी होती हें आपण पाहिलेंच आहे. त्यांचें कथाकथनाचें धोरण या भूमिकेला धरूनच आहे. रसिकांना आकर्षित करतील अशा तऱ्हेनेच कथा वर्णावयाच्या असल्यामुळे त्यांनी रसानुकूल भागाचा विस्तार व रसापकर्षक भागाचा संक्षेप केला आहे. पण त्या कथा त्यांना तरावयासाठी गावयाच्या असल्यामुळे त्यांनी मूळ कथांत बदल मात्र केला नाही. सारांश, मूळ कथासूत्र न सोडतां व त्यांत बहुधा फेरफार न करतां अनावश्यक अवांतर कथांचा संक्षेप करून व कथेवाला बाधक भाग गाळून आणि स्वतःच्या कल्पनांची व अलंकारांची त्यांत भर घालून व आपल्या कथा रसिकांना संतोषविणाऱ्या व स्वतःला किंवा इतर भाविक मुमुक्षूंना परमार्थसाधक ठरणाऱ्या व्हाव्यात अशा धोरणाने पंतांनी या कथा गाइल्या आहेत.

या सर्व कथा रामायण—महाभारत—भागवतादि ग्रंथांतून पंतांनी घेतलेल्या आहेत, तेव्हा कथावस्तूच्या कल्पनेचें श्रेय पंतांचें नाही ही गोष्ट उघड आहे. पण या मौलिकतेची उणीव वरीचशी तन्मयतेने भरून निघाली आहे. शिवाय मूळ कथावस्तु पंतांनी दुसरीकडून घेतली तरी त्या कथावस्तूला आकर्षक स्वरूपांत मांडण्यांत त्यांनी आपल्या प्रतिभेचा विलास दाखविला आहे. त्या प्रतिभाविलासाचेंच अवलोकन यापुढे करावयाचें आहे.

कोणतीहि कथा गातांना तिचें मर्म पंतांनी ओळखलेलें असतें. तिचीं अंगोपांगें त्यांनी ध्यानांत घेतलेलीं असतात, तिच्यांतील आकर्षणें त्यांनी हेरलेलीं असतात व तिच्यांतील भावाशीं ते समरस झालेले असतात. इतकेंच नव्हे तर त्या कथेच्या परिणामाची त्यांना कल्पना असते व कधी कधी मूळ

कथेचा परिणाम आपल्याला पाहिजे तसा होणारा नाही असें त्यांना वाटलें तर इष्ट परिणाम घडविण्यासाठी मूळ कथेंत ते थोडाबहुत बदलहि करतात.

या दृष्टीने कृष्णविजयांतील सुदामचरित्राचें उदाहरण देतां येईल. सुदामचरित्राची मूळ कथावस्तु साधीच आहे. पण तिच्यांत कांही आकर्षणें आहेत. हीं आकर्षणें ओळखून व एकंदर कथेचें रहस्य जाणूनच पंतांनी ही कथा गाइली आहे कथेंतील प्रमुख पात्रांविषयी सहानुभूति वाटणें, कथेशीं समरस होण्याच्या दृष्टीने आवश्यक असतें. सुदामा व त्याची पत्नी यांच्या शीलसंपन्नतेंत व दारिद्र्यांत या सहानुभूतीचें मूळ आहे हें हेरून पंतांनी या पति–पत्नीच्या सत्पवृत्त स्वाभिमानी जीवनाचें व करुणास्पद दारिद्र्याचें अत्यंत उठावदार चित्रण केलें आहे.

ब्रह्मज्ञ ब्राह्मण तो साधु गृहस्थाश्रमी समीचीन
श्री न प्रेक्षी, परि जो भी न स्वांतां, घरीं नसे दीन
वर्ते दैवोपनतें, मन तें वश, इंद्रियें सदैव नतें,
न मितें अनाढ्य, अमितें आत्मधनें जो कुबेर सन्नमितें

या प्रकारचें सुदाम्याचें व

'दुष्कर साध्वी करि तप,
तत्तनु न स्वार्थ लोरवि प्रतनु'
'हतरुचि वसनें मलिनें.........'
'साध्वी करि धृतिरक्षण,
न क्षणही भावि ताप लोकांचें'

असें सुदामपत्नीचें वर्णन पंतांनी केलें आहे. तें वाचून या पति-पत्नीविषयी कोणाच्याहि मनांत आदर व करुणा उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही. कृष्ण–सुदामा भेट, सुदामाचें कृष्णाला पोहे अर्पण करणें, निरोप देऊन परत फिरणें, इ० सर्व महत्त्वाचे प्रसंग व कथेंतील प्रमुख आकर्षणें पंतांनी जाणीवपूर्वक चित्रिली आहेत. व तीं मुळांतल्या पेक्षाहि सविस्तर व उठावदार झालीं आहेत. निरोप देतांनाचा करुण प्रसंग तर पंतांनी स्वतंत्रपणें व फार बहारीने वर्णिला आहे. परत फिरतांना व वाटेंत त्याच्या मनांत जी खळबळ उडाली व आनंद, खेद, शंका इ० भावांनी जी गर्दी उसळली त्याचें वर्णनहि पंतांनी मुळापेक्षा फार सविस्तर केलें आहे.

या कथेचा शेवट मुळांतल्यापेक्षा किंचित् वेगळा करण्यांत कथाकार या नात्याने पंतांचा निराळेपणा प्रगट झाला आहे. मूळ भागवतांत सुदामा, कृष्ण–भक्तीचा संकल्प करून, पत्नीसह त्या ऐश्वर्याचा उपयोग घेऊं लागला असें सांगितलें आहे व कथेच्या श्रवणाची फलश्रुति सांगितली आहे. पंतांनी हा शेवटचा भाग गाळला आहे. सुदामा कृष्णाला उद्देशून म्हणतो, 'पद या मनांत राहों दे' व भार्येला सांगतो, 'व्हावें वस्तु अनश्वर तरि हे गोब्राह्मणासि दे भावें!' इथेच पंत थांबतात. भागवतकारांच्या जुन्या कहाणीवजा शेवटापेक्षा पंतांचा हा कथेला अनुरूप शेवट अधिक कलात्मक वाटतो.

आपणास इष्ट तोच कथेचा परिणाम वाचकावर व्हावा याची काळजी पंत कशी घेत असत व त्यासाठी मुळांत बदल देखील कसा करीत याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे कृष्णविजयांतीलच वृकासुराख्यानाचें होय. भागवतकारांनी हें आख्यान शंकरापेक्षा विष्णूचें श्रेष्ठत्व वर्णावयासाठी सांगितलें आहे. पंतांचा भर हरिहरैक्यावर असल्यामुळे भागवतकारांचा प्रस्तुत कथा–कथनाचा हेतु त्यांना मान्य नाही. म्हणून भागवतकारांचा हा हेतु ज्यांत प्रगट झाला आहे तो आरंभींचा १२ श्लोकांचा शुक-परीक्षिति संवादाचा भाग पंतांनी गाळला आहे. व कथेंतहि सुद्धा हरिहरैक्याचा ठसा उमटेल अशी काळजी घेतली आहे. इतकेंच नव्हे तर या आख्यानाच्या शेवटीं भागवतकारांनी त्याला दिलेलें 'रुद्रमोक्षण' हें जें नांव तेंहि पंतांनी बदललें आहे. व 'हरिहरचरित' असें नवें नांव दिलें आहे. पाहिजे तोच परिणाम घडविण्यासाठी पंत कशी व किती दक्षता घेत असत. हें यावरून दिसून येईल. कोणता तरी संस्कार वाचकांच्या मनावर करण्यासाठी कथाकार कथा लिहितो ही आधुनिक कल्पना पंतांच्या कथाकाव्यांतहि दिसून येते ही नवलाची गोष्ट होय.

कथेच्या इतर अंगांकडेहि पंतांनी जाणीवपूर्वक लक्ष पुरविलेलें दिसतें. पात्रांचें स्वभावरेखाटन हें

एक असें प्रमुख अंग होय. महाभारतांत श्रीकृष्ण, धर्म, भीष्म, द्रौपदी कर्ण इत्यादींचें पंतांनी फार सुंदर चित्रण केलें आहे. त्याचा परिचय येथे करून देणें अशक्य आहे. थोडक्यांत पण उठावदार व्यक्तिचित्रण करण्यांत पंतांनी कित्येक ठिकाणीं मुक्तेश्वरावर ताण केली आहे. विराट पर्वांतील द्रौपदीचें चित्र या दोघा कवींनी कसें काढलें आहे तें पाहिलें तरी याची साक्ष पटतें. 'हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा तुमची; जरी ईस सोडितां पाणी। 'धर्म च.र्थ च' असें वदलां कां ? प्रथम जोडितां पाणी' असें म्हणणारी पंतांची द्रौपदी अधिक तेजस्वी असून व्यासांच्या द्रौपदीला ती अधिक जवळची आहे. मात्र व्यासांनी केलेलें द्रौपदीच्या सौंदर्याचें वर्णन पंतांनी गाळलें आहे व त्यामुळे व्यक्तिदर्शनांत थोडीशी उणीव उत्पन्न झाली आहे.

प्रदीर्घ कथांतलीं हीं व्यक्तिचित्रणें सोडून लहान लहान कथाकाव्यांतलीं व्यक्तिचित्रें पाहिलीं तरी पंतांचें व्यक्तिदर्शनकौशल्य लक्षांत येण्यासारखें आहे. पंतांचें 'सुभद्राहरण' हें लहानसें आख्यान जरी विचारांत घेतलें तरी पुरे आहे. यांत तापट, उतावळा व बलवान असा जो बलराम पंतांनी रंगविला आहे, त्याला मूळ भागवतांत आधार नाही. 'कोठे रथ ? मुसळ पुरे, कवच कशाला ? धनुष्य राहों द्या' यांत बलरामाच्या कोपाचें व धांदलीचें उत्कृष्ट वर्णन झालें आहे. तसेंच हा कोप शांत झाल्याबरोबर अर्जुनाला आणून त्याला सुभद्रा देण्याची घाई झाली ती पंतांनी अशी वर्णिली आहे. 'जा जा, उठा, मुलीला पाहूं वाहूं, वरा घरा आणा'. एकूण बलरामाचें चित्र फारच हृदयंगम व उठावदार असें पंतांनी चित्रिलें आहे.

'संवाद' हा कथेंतील फार महत्त्वाचा घटक. संवादरचनेंत तर पंतांचा हात धरील असा प्राचीन कवींत कोणी सापडणार नाही. साधे, सरळ, स्वाभाविक, पात्रानुरूप, प्रसंगानुकूल, विचार-विकारांनी रंगलेले, चटकदार व जिवंत असे संवाद पंतांच्या कथा-काव्यांतून सर्वत्र विखुरलेले आहेत. बलरामाच्या तोंडच्या उपरोक्त वाक्यांतून त्याचें अंतरंग कसें व्यक्त झालें आहे तें पहा. विराट पर्वांत उत्तरगोग्रहणप्रसंगीं कर्णानें बढाया मारलेल्या ऐकून कृपाचार्य त्याला म्हणतात—

'त्यासि कृप म्हणे, 'कर्णा ! सुज्ञांहीं ऐकतांचि डोलावें,
ऐसेंचि बोलणें जरि, तरी पुरुषानें दहांत बोलावें.
तूं भंगिसील कैसा ?
आला बांधोनि काय हात रणीं ?

× × ×

सर्वहि मिळोनि भांडूं, कर्णा !
व्हावें न साहसा मान्य,
यत्नें नृपयश रक्षूं आजि,
नव्हे श्वेतवाह सामान्य.'

यांत कृपाचार्यांनी कर्णाचा थोडासा उपहास केला असला तरी त्यालाहि सांभाळून घेण्याकडेच त्यांचा कल आहे व तो त्यांच्या वडीलकीला व प्रसंगाला अनुरूपच आहे. पण त्याच प्रसंगीं अश्वत्थाम्यानें केलेलें हें भाषण पाहा—

'द्रौणि म्हणे, "एकाकी तूंचि
क्षम जिष्णुवारणा, सूत !
बहुधा वद्ध करीलचि
लूतेचें जिष्णुवारणा सूत".

यांतील उपरोध व उपहास तीव्र असून अश्वत्थाम्यासारख्या तरुण योद्धयाला साजेल असेंच तें भाषण आहे.

याच विराट पर्वांतील भीम व द्रौपदी यांच्यांतील हा संवाद पाहा. कीचकाकडून त्रस्त झाल्यामुळे संतप्त होऊन द्रौपदी भीमाकडे आली आहे. ती उपरोधानें त्याला म्हणते—

मी काय ? भली निद्रा सुखरात्री !
काय हा महान सखा !
गमलें वपुचि यशोधिक,
तरि अन्नचि, धरूनि हें महानस खा.
निजलां काय मृतापरि ?
व्हा जागे, सिंहसे उठा राहो
निद्रा, कीर्ति वरा, हो !
ह्रीप्रद हा बाहु भृगुकुठारा हो"



अनुक्रमणिका

हें ऐकून भीम 'गडबडोनि' उठतो व तिला मांडीवरच बसवून घेऊन तिचें सांत्वन करतांना तो म्हणतो—

दयिते ! कां आलीस ?
प्रमदे ! हा आर्द्र कां पदर ? जाये !
म्यालीस भीरु ! भय कां ?
भेटे त्यालाचि कांप, दर ज्या ये.

तूं काय भार ? भामिनि !
उतरसि मांडीवरूनि कां ? बस, ये,
झालें काय ? वद सुदति !
सुमुखि ! सति ! रडूं नकोचि थांब सये ।

यांतील भावपूर्णता, नाटचात्मकता व अभिनयानुकूलता लक्षांत घेण्यासारखी आहे. उत्तर जेव्हा बृहन्नेडेला सारथी करून रणांत गेला तेव्हा कौरवांचें सैन्य पाहून फार गडबडला. त्या प्रसंगीं त्याने बृहन्नडेला उद्देशून जें भाषण केलें आहे, त्यांत त्याचा वालिश स्वभाव, त्याची भीरुता, रण सोडून जाण्याला त्याने दिलेल्या इतर कारणांत दिसणारी भीरुता लपविण्याची त्याची धडपड इ० भाव फार सुन्दर रीतीने प्रकट झाले आहेत. अधिक उदाहरणें देण्याचा मोह आवरतों. तात्पर्य, इतकेंच की पंत पात्र, प्रसंग व निवेदनभाव यांना अनुरूप संवाद रचण्यांत फार कुशल आहेत. विशेष हा की, हे सवाद रचतांना कुठेहि ओढाताण झालेली दिसत नाही.

पंतांच्या कथा भावपूर्ण आहेत. परमेश्वराच्या व परमेश्वरभक्ताच्याच कथा पंतांनी गाइल्या असल्यामुळे त्यांत सर्वत्र भक्तिभाव तर आहेच; पण प्रसंगोपात्त शृंगार, वीर, हास्य, करुण इ० रसांच्या छटा त्यांत पंत मिसळून देतात. महाभारतासारख्या ग्रंथांत जेथे अवसर बराच असतो तेथे पंतांनी उपरोक्त रसहि चांगल्या प्रकारें निर्माण केले आहेत.

विविध कल्पनांनी व नाना अलंकारांनी पंतांनी आपल्या कथा सजविल्या आहेत. त्यांतहि त्यांच्या प्रतिभेचा स्वतंत्र विलास पाहावयास सापडतो. त्याचा परिचय वाचकांनी मुळांतूनच करून घ्यावा.

शेवटीं मला एवढेंच म्हणावयाचें आहे की प्राचीन कवींत मोरोपंत हे एक उत्कृष्ट कथाकवि होऊन गेले. त्यांनी मुख्यतः तरावयासाठी कथा गाइल्या असल्या तरी रसिकांचा संतोष हाहि उद्देश त्यांच्या पुढे होता. कथांचे प्रारंभ-शेवट, कथानिवेदन, पात्रचित्रण, संवादरचना, भावपूर्णता, परिणामकारकता संयम व सूचकता इ. अंगोपांगांच्या रचनेंत व गुणांच्या निर्मितींत पंतांनी चांगलेंच कौशल्य प्रगट केलें आहे व तें जाणीवपूर्वक केलें आहे. कथाकवि या दृष्टीने त्यांच्याकडे पाहून त्यांच्या कथाकाव्यांचें सविस्तर व रसिक समालोचन होण्याची आवश्यकता आहे.

---

# व न वा सी फू ल

## कविभूषण प्राध्यापक बळवंत गणेश खापर्डे

रेव्हरंड नारायण वामन टिळक हे मराठींतील एक ख्यातनाम कवि आहेत. 'वनवासी फूल' ही त्यांची एक प्रख्यातपैकी कविता आहे. त्यामुळे ह्या कवितेला मराठींत एक विशिष्ट स्थान आहे. ह्या कवितेंत एका कवीचा आणि अरण्यांतील एका फुलाचा संवाद वर्णन केला असल्यामुळे, आणि त्या कवितेचा प्रारंभ आणि शेवट ह्यांच्यामुळे, ही कविता कथानकपर कवितांत सहज मोडण्याजोगी आहे.

पण हिचें कथानक पूर्णपणें काल्पनिक आणि केवळ निमित्तमात्र आहे. कवि सहज फिरत फिरत वनांत जातो काय, त्याला एक अगदी नवें अशा प्रकारचें फार सुंदर फूल दिसतें काय, त्या फुलाशीं तो तन्मय होतो काय, त्या फुलाला तो वनांतील निवास सोडून आपल्याबरोबर जनांत येऊन राहण्याची वारंवार आग्रहपूर्वक विनंती करतो काय, आणि तें फूल मनुष्य-वाणीनें बोलून निश्चयपूर्वक ती विनंती नाकारतें काय,— साराच या कथानकाचा असा पंचतंत्राच्या गोष्टीसारखा प्रकार आहे. पण त्या कथानकाला ह्या कवितेंत महत्त्वच नाही. हाच संवाद दुसरा कोणीहि 'वनवासी' आणि 'जनवासी' अशा दोन व्यक्तींत, किंवा वस्तूंतहि, झाल्याचें इतक्याच उचिततेनें वर्णन करतां आलें असतें. या संवादांत जो **युक्तिवाद** ह्या दोन्ही पक्षांनी आपआपल्या बाजूनें पुढे मांडला आहे, त्यांत ह्या कवितेचें सर्व स्वारस्य आहे.

ह्या संवादाचा प्रकार थोडासा श्रीमद्भगवद्गीते-सारखाच झाला आहे. मी त्या अलौकिक ग्रंथाची आणि ह्या सुंदर कवितेची बरोबरी करूं पाहात आहे, असा चुकीचा समज कोणीहि करून घेऊं नये. मी फक्त त्यांच्यांतील जुजबी सादृश्य तेवढें जातां जातां दाखवीत आहें. गीतेचा विषय 'युद्ध करावें की नाही', हा आहे, तर या कवितेचा विषय 'वनांत राहावें की जनांत राहावें,' हा आहे. मूळ अर्थ एकच. तो म्हणजे विहित काय. 'कर्मयोग' की 'संन्यासयोग'. जनाचा संपर्क सोडून वनांत जाऊन राहिलें तरच देवाची खरी भक्ति करतां येते कारण जन 'स्वार्थी' आहेत हा फुलाचा पक्ष; आणि जनांत राहून निष्कामवृत्तीनें 'परोपकार' करणें हीच भक्ति, व हेंच मानवाचें जन्मसाफल्य, हा कवीचा पक्ष; असा हा संवाद आहे, असा सूत्ररूपानें त्याचा सारांश सांगतां येईल. ईश्वरभक्ति किंवा ईश्वरप्राप्ति हेंच अंतिम ध्येय दोघांचेंहि. प्रश्न एवढाच की, त्याचा अधिक श्रेष्ठतर कोणता ?

आणि भगवद्गीतेनें ह्याचा जो निर्णय सर्व विचारांतीं अखेर दिला आहे, तोच ह्याहि कवितेंत दिला आहे असें थोडासा सूक्ष्म विचार करतांच दिसून येईल कारण, लोक तुझ्या सामर्थ्याची निंदा करतील, 'भ्याला' म्हणून तुला म्हणतील, वगैरे श्रीकृष्णाचा सगळा सामान्य आणि व्यावहारिक युक्तिवाद जसा अर्जुनाच्या बाबतींत वाया गेला, त्याचप्रमाणे, स्त्रियांचा कोप तुझ्यामुळे जाईल, तुला देशभक्तांना वाहतील, सज्जनांचा सन्मान तुझ्यायोगें करतील, कवींचा तर तूं जीव की प्राण आहेस, तेव्हा त्यांच्या तर तूं फारच उपयोगी पडशील, तुझा जगांत मोठा सन्मान होईल, हा ह्या कवितेंतल्या 'कवी'चा सारा सामान्य आणि व्यावहारिक युक्तिवाद ह्या कवितेंतल्या फुलाच्या बाबतींतहि निष्फळ ठरला आहे. 'परोपकार' आणि 'मोघ' जन्माचें साफल्य ह्या उदात्त ध्येयांनीहि त्याचें मन पालटलें नाही पण अखेर कवीनें शिकस्तीनें जिंकली ती 'अनुरागा'च्या, प्रेमाच्या, युक्तिवादानें ! "वनभूमीवर जगं न तरुं हा (प्रेमाचा, 'अनुरागा'चा), जनभूमीवर जगतो" हा 'कवी'चा युक्तिवाद

जितका गोड आहे तितकाच बिनतोड आहे. फूल त्यावर काय उत्तर देणार? जेथे कोणी नाहीच तेथे, वनांत, प्रेम कोणावर करणार? आणि प्रेम नको कोणाला? फुलाला, आणि तेंहि 'फुलाला' काय प्रेम नको होतें? कसें शक्य आहे? तेव्हा तें फूल या युक्तिवादाने नुसतें निरुत्तरच झालें नाही, तर त्याचें मनहि डळमळलें. कवीने जातांना जेव्हा ह्या युक्तिवादानंतर अखेरचा सवाल टाकला, आणि माझ्याबरोबर जगांत चल म्हटलें, तेव्हा त्याला 'हो' म्हणावें की 'नाही' म्हणावें हें फुलाला कळेना!! म्हणून "हो नाही हें नच कळवी सुम; परि संदेहा कळवी", "दिसे दिसेना अशा रीतिने किंचित् निज शिर चळवी"! हें पाहून आणि आशा उत्पन्न होऊनच की काय, फुलावर अधिकच जोराचा भडिमार करण्यासाठी त्या 'कवी'च्या तोंडीं येथे रे. टिळकांनी प्रेमाचें एक अप्रतिम स्तोत्रच ह्या कवितेंत पुढे घातलें आहे, म्हटलें तरी चालेल. ह्यावर त्या फुलाने जें उत्तर दिलें आहे की, "प्रेम कशाचें? उन्मद हा भयकारी!" तें तर त्याचा युक्तिवाद संपून, पूर्वग्रहदूषित, आणि हार कबूल करण्याच्या आड येणारी फक्त 'भीति'च फुलाच्या पोटांत आता शेवटीं उरली आहे, ह्याचेंच दर्शक आहे. आणि ह्या कवितेचा शेवट कसा झाला आहे? तें फूल मग कवीबरोबर जनांत गेलें की वनांतच राहिलें? रे. टिळकांनी हें शब्दांत स्पष्ट न सांगतां, ह्या कवितेचा शेवट असा केला आहे. कवि निघून गेला, पण जातांना त्याच्या डोळ्यांतून अश्रु (फुलाविषयी प्रेम! व करुणा!) गळाले. ते भूमीवर पडलेले कवीचे अश्रु त्या लतेने शोषण केले. ते तिच्या अंगांत 'भिनले'. मग त्या फुलाच्या 'वृत्ति' 'पहिल्या' कोठून राहणार? त्या फुलाचें 'चित्त' सर्वथा 'कविमय' झालें! त्याला कवीचें वेड लागलें! "मागे, पुढती वरी, खालती, कवीच अवघा नाचे!" अशी त्याची स्थिति झाली म्हणण्याचा अर्थ,—कवीवर त्याचें प्रेम बसलें! अर्थात् कवि यशस्वी झाला! कारण कवि शेवटीं प्रेमतत्त्व प्रतिपादून आणि प्रेमस्तोत्र गाऊनच फुलाला सोडून गेला होता. 'प्रेमवृत्ति'च मुळी फुलांत स्वतःत तीव्रतेने उद्भवल्यावर आता कार्यविवादांत प्रेमतत्त्व मान्य करण्याचा वेगळा प्रश्नच काय उरला? आणि ह्याच्याहि पुढे गंमत झाली. थोड्या वेळाने कवि त्याच वाटेने परत आला. पण फुलाची आशा त्याने सोडलीच होती. म्हणून तो कांही फुलाशीं बोलला नाही. पण फुलाच्या मनाला तें लागलें!—ह्याचाहि अर्थ हाच की फुलाच्या मनांत कवीविषयीं 'प्रेम' उत्पन्न झालें होतें! म्हणजे कवि जिंकला. आणि मग काय झालें? फूल मग अखेर जनांत गेलें की नाही? की वनांतच राहिलें? हें रे. टिळक या कवितेच्या शेवटीं सांगतात.—"तथापि फुल तें तसेंच तुटुनी त्याच्या (कवीच्या) हृदयीं शिरलें। गळलें म्हणती परि तें खोटें, कविहृदयीं तें रमलें॥ अजून आहे फुललेलें तें त्या रसिकाच्या हृदयीं" म्हणजे फूल कवीबरोबर, प्रेमामुळे, पण वन सोडून जनांत आलें. अर्थात् या कवितेंत 'कवी'च यशस्वी झाला आहे, आणि फूल हरलें आहे, असेंच म्हटलें पाहिजे. आणखी एक गोष्ट या कवितेंत पाहण्याजोगी आहे. रे. टिळकांनी या कवितेंत जनाचा त्याग करून हरिभजनाकरितां वनांत राहाणें, आणि जनांत राहून जनांतच हरि पाहून आणि त्याची सेवा करून हरिप्राप्ति करून घेणें, ह्या दोन्ही पक्षांविषयीं अनुक्रमें फूल आणि कवि यांच्या तोंडीं आपआपला युक्तिवाद रे. टिळकांनी जास्त संयुक्तिक, जोरदार आणि स्पष्ट मांडला आहे, किंवा त्यांना मांडतां आला आहे, आणि कोणाचा युक्तिवाद थोडा कच्चा, कल्पनांच्या निराधार भराऱ्यासारखा आणि कमजोर मांडला गेला आहे, हें जर आपण ही कविता वारंवार वाचून जरी बारकाईने पाहिलें, तर आपल्याला आढळून येईल की, 'कवी'चाच युक्तिवाद संयुक्तिक, जोरदार, स्पष्ट आणि मनाला पटणारा, मनाची खातरी पटविणारा आहे, आणि फुलाचा युक्तिवाद कच्चा, बहुतांशीं निव्वळ कल्पनेवर उभारलेला, कमजोर आणि मनाची खातरी नीट न पटविणारा आहे. रे. टिळकांनी हें मुद्दाम केलें असो, असें त्यांच्याकडून झालें असो; दोन्ही परिस्थितींत निष्कर्ष एकच निघतो. आणि तो हा की, फूल आणि कवि यांचा संवाद लिहितांना स्वतः रे. टिळक मनांतून 'कवी'च्या बाजूचे आहेत; 'फुला'च्या बाजूचे नाहीत. म्हणजे जनांत राहून

लोकांनी परस्परांवर प्रेम करणें, परोपकार दृष्टया एकमेकांच्या उपयोगी पडणें, ईश्वर म्हणून जनसेवा करणें, व त्या द्वारा ईश्वरप्राप्ति करून घेणें हें,— म्हणजे गीतेंतील कर्मयोगाचें,—जीवनच रे. टिळकांना मान्य व विहित वाटत होतें; 'वनां'तील व 'संन्यासा'चें जीवन नव्हे. श्रीगीतेनें हा निष्कर्ष कर्तव्यबुद्धीवर आधारून 'कर्मयोग' ह्या नांवानें सांगितला, तर रे. टिळकांनी तो प्रेमभावनेवर उभारून 'परोपकार' व 'जनसेवा' ह्या नांवानें सांगितला. अन्ततः पाहूं जातां दोहोंचाहि अर्थ, ध्येय व प्राप्तव्य एकच. मार्ग तेवढे वरवर दिसण्यास भिन्न. पण जास्त खोल विचार केल्यास, हे दोन्ही मार्गहि अन्ततः आणि वस्तुतः भिन्न नसून एकच आहेत, असेंच आढळून येतें. आणि हा निर्णय बरोबर नाही असें कोण म्हणेल ?

---



अनुक्रमणिका

# कथाकाव्यांतील एक कमल : 'बी' कवींची 'कमळा'

## प्रा. हिंमत चव्हाण

मराठी कथा—काव्यांत 'कमळा' या कथाकाव्याचें अव्वल दर्जाचें स्थान आहे. भावकाव्याच्या या काळांत प्रदीर्घ कथाकाव्यालाच ओहोटी लागली असें नव्हे, तर छोट्या कथाकाव्यालाहि उतरती कळा लागली. लघुकथेच्या बहराच्या काळांत वास्तविक लघुकथा-काव्याची वाढ होण्यास अनुकूलता नव्हती, असें नाही. मात्र मराठी प्रतिभावंत कवींनी या काव्यप्रकाराकडे द्यावें तेवढें लक्ष दिलेलें दिसत नाही. आत्यंतिक श्रम-विभागणीच्या या युगांत वाङ्मयांतहि कथेच्या श्रमाचें वेगळेंच क्षेत्र झालें आणि कवितेंतून कथेची हकालपट्टी होण्याची वेळ आली. आधुनिक मराठी कवितेंत कथा-काव्याचा वाहणारा अत्यंत रोडका झरा याची साक्ष आहे. पण या कथाकाव्याच्या रोडक्या झऱ्याकाठीहि 'बी' कवींनी फुलविलेलें कथाकाव्याचें एक कमल अतिशय नयनमनोहर आहे, यांत शंका नाही.

* * *

'कमला' या काव्याचें कथानक एका ऐति-हासिक घटनेच्या पार्श्वभूमीवर आधारलेलें आहे. थोरात नांवाच्या मराठे सरदाराची कमला नांवाची रूपगुणवती कन्या शूर, दिलदार पण व्यसनी व विषया-सक्त युवराज संभाजीने शिवनेरी किल्ल्यांत आणून ठेवल्यावर आपली फसगत होऊन आपल्या नशिबीं आलेलें अप्रतिष्ठित जीवन जगण्यापेक्षा मरणें वरें, या विचाराने तिने किल्ल्याच्या बुरुजावरून उडी टाकून जीव दिला. या एवढ्याच पण हृदयभेदक कथानकावर 'बी' कवींनी लिहिलेली शैलीदार आणि सौष्ठवपूर्ण काव्यकथा फार रसाळ आहे. उदात्त वातावरणाच्या पार्श्वभूमीवरील कारुण्य या कथेंत ओथंबून वाहतें. सौंदर्यवादी लघुकथेची शैली आणि स्वप्नरंजनवादी काव्यांतील सचित्र भाव यांची कलात्मक एकात्मता 'कमळा' काव्यांत वठलेली आहे

* * *

केवळ एकशें चवतीस ओळींच्या या कथा-काव्यांत काव्यपूर्ण सौंदर्यचित्रांचें जणूं विशाल प्रदर्शनच कवीने भरविलें आहे. संपूर्ण काव्य कथेच्या शैलीने सहा विभागांत विभागलेलें आहे. प्रत्येक विभागाचें वेगळें अस्तित्व आहे. एक विभाग संपून दुसरा सुरू होतो तेव्हा कवितेचा प्रवाह वेगळें वळण घेत आहे, हें स्पष्ट कळतें.

पहिल्या विभागांत ३० ओळींत शिवनेरी किल्ल्यावरून दिसणाऱ्या चढत्या चंद्रकलेंतील नैसर्गिक पार्श्वभूमीचें उदास सौंदर्यपूर्ण चित्र रेखाटून त्या सौंदर्याशीं स्पर्धा करणाऱ्या कमलेच्या सुमधुर सौंदर्याचें वर्णन केलें आहे.

" नभ:शिलेवर कोर चमकते चढत्या चंद्राची
निकषावरची जशी ठळकशी रेषा सोन्याची ! "

सुरुवातीची ही 'चढत्या चंद्राची कोर' गतिमान, स्वप्नरंजनात्मक आणि उदात्त वातावरण एकदम निर्माण करण्यास समर्थ आहे.

"निसर्गदुर्गम सह्याद्रीच्या प्राकारांवरुन
शशिकिरणें गिरिदरींत घसरतां होतीं संपूर्ण ! "

गिरिदरींत घसरून सपूर्ण होणारीं चंद्रकिरणें कमलेच्या पुढील भवितव्याची चिंताकुल जाणीवच सूचकतेने करून देतात. अशा या चंद्रप्रकाशांत निस-र्गातला धडधडता प्राण निश्चल झालेला आहे, सगळें रान निश्चल झालें आहे, सगळ्या निसर्गाचें चित्त

एकाच दृश्यावर खिळलें आहे, किल्ल्यावरील प्रासादाच्या खिडकीचें दार उघडें असून तेथे--

" कोमल आहे कोणी श्यामा चिंताकुल बसली
लावण्याची किशोरगंगा वाट काय चुकली ! "

वाट चुकलेल्या किशोरगंगेचें सौंदर्य सुन्दर उत्प्रेक्षेने सांगूनहि भागण्यासारखें नव्हतें. म्हणून पुढील दहा ओळींत कवीने कमलेचें शब्दचित्र फारच आकर्षक रंगविलें आहे.

"मुसावला नीलिमा तोच ही नीलदेह रमणी
निळ्या सारणीमध्ये वाहतें मोत्याचें पाणी ! "

गूढता, सुंदरता आणि भावसंपन्नता यांचें द्योतक असलेला नीलवर्ण कमलेला लाभलेला असून तिचीं सारीं गात्रें निर्दोष आहेत. त्यांनी तिच्या नित्य वदलणाऱ्या सौंदर्यास आकृतीत वसविलें आहे.

* * *

'कमला' काव्याच्या तीस ओळींच्या प्रास्ताविक विभागांत ऐश्वर्यात्मक सौंदर्याची उदात्तरम्यता ओथंबून भरली आहे. 'बी'च्या शब्दचित्रांत रंगसौंदर्य असून ध्वनि भरपूर आहे याची साक्ष येथे मिळते. कुशल चित्रकाराने पार्श्वभूमि चितारावी, प्रथितयश संगीत दिग्दर्शकाने ध्वनिसंगीत द्यावें आणि तज्ज्ञ छायाचित्रकाराने आपल्या छायायंत्राने मुख्य दृश्याचें चित्रण करावें—तसें येथे झालें आहे. 'बी' कवीचें 'कमला' हें कथाकाव्य यशस्वी असण्याचें कारण त्यांत चित्रांचा पट आहे आणि त्याला ध्वनीचें संगीत लाभलें आहे.

* * *

काव्याच्या दुसऱ्या विभागांतील चोवीस ओळींत ही श्रीमंत थोर सरदाराची कुलवान, निष्कपट, मराठमोळी लेक कपटी संभाजीने गणगोतांतून येथे आणून ठेवली. तिच्या तन्वंगा चंदनवृक्षाला जहरी सर्पाचा लपेटा पडावा तसा अधम संभाजीचा विळखा पडला, हें सांगून तिसऱ्या विभागाच्या वीस ओळींत कमलेच्या नजरेसमोर पूर्वीच्या त्या घातक पण मोहक दृश्यांचा चित्रपट कसा झळकला हें वर्णिलेलें आहे.

गावाच्या बाहेर ती एकदा निशासौंदर्य पाहात असतां शिकारी वेषांतील देखणा संभाजी शबलख घोड्यावर तेथे आला.

" गौर तनूवर नूर विराजे खुले वीर वृत्ति
क्षणांत टाकुनि उडी खालती मज धरलें हातीं "

"हिरवे पिवळे लाल गुलाली, रजनीचें अंग
पटपट बदलुनि, निवळुनि झालें नितळ तिचें अंग."

कमलेच्या प्रणयप्रसंगाच्या या आत्मनिवेदनांत शृंगाराचा गोड ध्वनि आहे. रजनीचे रंग पटपट बदलून तिचें अंग नितळ झालें, यांत 'बी' कवि ध्वनीच्या सहाय्याने नाजुक शृंगार कसा चित्रित करीत, याचें दर्शन घडतें.

* * *

कवितेच्या चवथ्या विभागांतील तीस ओळींत कमलेला झालेला पश्चात्ताप चितारला आहे. त्यांत संवेदनेच्या तीव्रतेचें मनोहर लेखन आहे.

"ज्ञान मनाला अंधाराच्या रूपाचें नव्हतें,
इच्छेविण तें जिवंत झालें साक्षात्कारातें.

अशी तिची स्थिति झाली. देवाधर्माची आण वाहूनहि तो खलपुरुष बेइमान झाला. त्याने आपल्याला केवळ अपकीर्तीची जोड करून दिली, याचें तिला अतिशय दुःख होतें. आपल्या पवित्र कुळाच्या प्रतिष्ठेचें तिला स्मरण होतें. पांचव्या विभागांतील तीस ओळींत कमलेच्या मनांतील दुःखद शल्याचें दारुण चित्र आहे.

"थोराताच्या पाक कुळीं जो जन्माला आली
राख म्हणुनि घ्यायाचें आलें आज तिच्या भाळीं!"

याची तिला जाणीव होतांच तिला जीवनांत अर्थ वाटत नाही. जरी कौमार्यव्रत भंग झालें नाही, तरीहि ज्या आरोपाचें काहुर आपल्या नशिवीं आलें, त्याचें परिमार्जन आता शुद्ध रक्त वाहविल्याशिवाय होणें शक्य नाही, या विचाराने तिने आपला देह खाली फेकून देण्याचा कृतनिश्चय केला. कारण—

'भावी ललना वदोत नच की कमलेने लपुन
चित्तशुद्धिच्या ढालेखाली वाचविले प्राण ! "

चरित्र्याच्या अपकीर्तीपेक्षा मरण पत्करलें या निर्धाराच्या कमलेची ही कथा स्त्रियांच्या आत्मसन्मानाची कथा नसून पवित्र मनाच्या, मृत्यूलाहि भीक न घालणाऱ्या धैर्याची व शौर्याची ती शोकान्तिका आहे, हें येथे स्पष्ट होतें. यामुळेच 'कमला' या काव्याचा आशय प्रगतिशील ठरतो.

काव्याचा सहा ओळींचा शेवटचा विभाग कथेच्या अखेरीचा आहे. कथेची अखेरी विस्मयाचा धक्का देणारी असावी, हें तंत्र 'बी' कवींने येथे सहजपणें पाळलें आहे

"क्षणैक हलली शरच्चंद्रिका पुनश्च महितवन
क्षिप्र अनन्तीं नितान्त विश्वप्राण होय लीन."

कमलेच्या भेसूर अन्ताचें दृश्य चितारतांना निसर्गचित्रांच्या ध्वनीचें सहाय्य घेऊन कवीने शोकान्तिकेचीं अर्थवलयें वाचकाच्या मनावर प्रदीर्घ काळपर्यंत तरंगत ठेवावीं, यांतच श्रेष्ठ प्रतिभेचें अम्लान सौंदर्य नाही काय ?

बी कवींच्या कमला कथाकाव्यांत एक सुन्दर लघुकथा आहे, भावपूर्ण व्यक्तिरेखा आहे, काव्यांतील अर्थसौंदर्याच्या लयतरंगांत ही हृदयस्पर्शी कथा सौष्ठवपूर्णतेने वसविली असून तिच्या कलेची आकृति अतिरिक्त सौंदर्यगुणांनी परिपूर्ण आहे. ही मराठी कवितेच्या क्षितिजावरील चंद्राची, नित्यनवीन सौंदर्याची, चढती कोर आहे ! 'कमला' ही आधुनिक मराठी कवितेंत वाट चुकून आलेली कथाकवितेची किशोरगंगा आहे.

---

# यशवंतांचीं कथाकाव्यें

## प्रा. म. ना. अदवंत

कवि यशवंत हे प्रामुख्याने भावगीत कवि आहेत. त्यांच्या स्फुट अशा भावगीतांनी मराठी रसिकांचें मन आजवर आकृष्ट केलें आहे आणि हीं सर्व भावगीतें त्यांच्या आत्मनिष्ठ वृत्तींतून स्फुरलीं आहेत. आख्यानक काव्याच्या वस्तुनिष्ठ क्षेत्रांत मात्र त्यांना म्हणावें तसें यश मिळालें नाही. वस्तुनिष्ठ निरूपणात्मक कथनशैली त्यांच्या आत्मनिष्ठ वृत्तीला तितकीशी मानवत नाही. त्यामुळेच प्रदीर्घ कथनात्मक खंडकाव्यें त्यांनी फारशीं लिहिलीं नाहीत. खंडकाव्याच्या क्षेत्रांत ते निरूपणात्मक कथनशैलीचा जेथे जेथे आश्रय घेतात तेथे तेथे त्यांचें खंडकाव्य सामान्यतेच्या पातळीवर जातें. मात्र या क्षेत्रांत अनेकदा ते भावगीतांचा आश्रय घेऊन उतरतात. छोट्या छोट्या भावगीतांची वा सुनीतांची गुंफण करून कथा रंगविण्याचा ते ज्या वेळीं प्रयत्न करतात त्या वेळीं कथनशैली त्यांच्या वृत्तीला अनुकूल असल्याने त्यांना त्या क्षेत्रांत चांगलें यश मिळतें. निरूपणात्मक कथनशैलीचा आश्रय घेऊन लिहिलेली 'बंदीशाळा' व भावगीतात्मक रचनेचा आधार घेऊन रचलेली 'जयमंगला' या विधानाची निश्चितच साक्ष पटवतील.

'जयमंगला' हें त्यांचें पहिलें खंडकाव्य. बिल्हणाच्या 'चौरपंचाशिका' या काव्याची कल्पना आधारभूत घेऊन त्यांनी या खंडकाव्याची रचना केली आहे. कथा जुनी आहे पण रचना मात्र वैशिष्टचपूर्ण आहे. अनेक भावगीतांची साखळी गुंफून या काव्याची रचना केली आहे. त्यांतील सर्व भावगीतें नायकाच्या तोंडीं घातलेलीं आहेत. निरनिराळ्या प्रसंगाला अनुलक्षून नायकाने हीं कवनें म्हटलीं असल्याने त्याच्या भावनात्मक जीवनाचा हा जणू आलेखच आहे. प्रत्येक गीत निराळ्या वृत्तांत वा छंदांत असल्याने त्यांत ज्याप्रमाणे वृत्तवैचित्र्य आलें आहे त्याप्रमाणे एकाच व्यक्तीच्या तोंडीं हीं सर्व गीतें घातल्याने कथानकाला भावनाविष्काराच्या दृष्टीने सलगता आली आहे.

यांतील कथानक अगदी साधें आहे. नायक हा एक बहुश्रुत विद्वान् पंडित आहे. एकाकी जीवनाला कंटाळलेला असा हा पंडित हिंडत हिंडत एका राजदरबारीं येतो आणि तेथेच राजकन्येला शिकविण्याचें काम तो पत्करतो. त्या दोघांचें परस्परावर प्रेम बसतें–प्रीतिसंगमापर्यंत ते येतात. पण तेवढ्यांत राजाला त्यांच्या प्रेमाची बातमी लागून तो त्या पंडिताला कैद करतो व त्याला सुळीं देण्याची शिक्षा फर्मावितो. अगदी शेवटच्या क्षणीं राजदूत दौडत येतो व त्याच्या सुटकेचा हुकूम व राजाने विवाहाला संमति दिल्याचा संदेश त्याला देतो व कथानक संपतें. कथानक अगदी सरळ व साधें आहे. पण त्या साधेपणांतच कथानकाचें सर्व सौंदर्य व्यक्त झालें आहे. निरनिराळ्या भावगीतांतून रंगविलेलीं नायकाच्या भावनांचीं व आशानिराशेचीं आंदोलनें तर मोठीं रम्य वाटतातच व त्यामधून व्यक्त होणारें नायकाचें व राजकन्येचें भावसौंदर्य मन मोहून टाकतात. राजकन्येच्या प्रथम दर्शनाने त्यांच्या मनांत निर्माण झालेली प्रीतीची भावना, तिचा हळूहळू झालेला विकास, त्या काळांत मनांत उठलेलीं निरनिराळीं शंकाकुशंकांचीं आंदोलनें, प्रीतिसंगमावर आल्यानंतर वाटणारी सफलता, त्यानंतर विरह व त्यांतून कायमच्या ताटातुटीचा ओढवलेला प्रसंग व त्याप्रसंगीं व्यक्त झालेली नायकाची प्रेमावरील निष्ठा या सर्व भावनांचें मोठें मनोज्ञ दर्शन या विविध कवनांतून घडतें. त्यांपैकी पुष्कळच गीतांतून प्रगट होणारी भावनांची उत्कटता मनाला ओढ लावते. नायकाच्या भावजीवनाचीं विविध टप्प्यावर रंगविलेलीं हीं चित्रें अतिशय आकर्षक वाटतात.

पण केवळ नायकाच्याच भावजीवनाचें चित्रण यांत झालें आहे असें नाही तर राजकन्येचें भावजीवनहि तितक्याच उत्कटतेने यांत रंगविलें गेलेलें आहे. पण या सर्वांचें दर्शन होतें नायकाच्या उद्‌गारांतून अप्रत्यक्षपणें. नायकाने शिकविण्याचा नकार दिला त्यावेळीं खिन्न झालेल्या व साश्रुनयना राजकन्येचें दर्शन प्रथम आपणाला होतें, त्यानंतर नायकाच्या गुणरूपावर लुब्ध झालेल्या राजकन्येच्या अनुनयाचें दर्शन तिच्या अनेक कृतींतून आपणाला दिसूं लागतें, आणि हें सर्व नायकाच्या उद्‌गाराच्या द्वारें सूचित होत असल्यामुळे राजकन्येच्या प्रेमाविष्कारांत अधिकच सौंदर्य प्रतीत होऊं लागतें. राजकन्या प्रत्यक्ष कुठेच भावना व्यक्त करीत नाही किंवा तिच्या मुखांत कोणतेंच गीत घातलें नाही. पण नायक स्वतःच प्रीतीने इतका प्रियतमेशी एकरूप झाला आहे की त्याच्या शब्दाशब्दांतून राजकन्येचें मोहक व्यक्तिमत्व प्रगट होऊं लागतें. तिचें सौंदर्य, तिची बुद्धिमत्ता, ललितकलेमधील तिचें प्रावीण्य, तिचा लाडिक स्वभाव तिचे ललितरम्य विभ्रम व तिची उत्कट प्रीति या सर्वांचें दर्शन नायकाच्या उद्‌गारांतून इतकें स्पष्ट होतें की त्यामुळें राजकन्या आपणापुढे प्रत्यक्ष साकार झाली आहे असें वाटूं लागतें. 'पाहतों तुजकडे पुन्हा पुन्हा', 'दिपवुं पाहशी मज ऐसें बुद्धिवैभवाने' 'का वाद ऐसा मांडिसी' इत्यादि कवनांतून प्रगट होणारें राजकन्येचें व्यक्तिमत्व नायकाच्या व्यक्तित्वाइतकेंच—किंबहुना त्याहूनहि अधिक—विलोभनीय वाटतें. नायिकेच्या या अप्रत्यक्ष चित्रणांत सौंदर्याच्या सर्व छटा उजळून निघाल्यासारख्या वाटतात.

रचनादृष्टचा या खंडकाव्याचें वैशिष्टच असें की यांतील प्रत्येक गीत ज्याप्रमाणे कथानकाच्या साखळींतील दुवा आहे त्याचप्रमाणे तें स्वतंत्रपणें आस्वाद्य आहे. थोडीशी पार्श्वभूमि समजून घेतली की यांतील प्रत्येक कवन स्वयंपूर्ण भावगीत होऊं शकेल. भावगीतरचनेचें सर्व कौशल्य यामधील प्रत्येक गीतांत कवि यशवंतांनी प्रगट केलें आहे. त्यांच्या प्रतिभेचा तो सहज आविष्कार आहे. शिवाय महत्वाच्या प्रसंगांचीं गीतांसाठी निवड करून इतर कथाभाग सूचित केल्याने काव्याचें सौंदर्यहि वाढलें आहे. नायकनायिकेच्या प्रेमभावनेच्या विकासालाच अधिक प्राधान्य देऊन कवीने इतर रूक्ष तपशील टाळला आहे—आणि प्रेमभावनेच्या आविष्कारांतहि कवि विठ्ठलाप्रमाणे उत्तान शारीरिक प्रेमावर भर न देतां प्रेमभावनेचा विकास व मानसिक आंदोलनें यावर कवीने अधिक भर दिल्यामुळे काव्याची पातळी अधिक उदात्त झाली आहे. निवेदनाचें माध्यम आपल्या प्रतिभेला अतिशय अनुकूल असें निवडल्याने यशवंतांचें हें खंडकाव्य सर्वांगसुंदर असें झालें आहे.

पण हें त्यांच्या 'बंदीशाळा' या खंडकाव्याबद्दल म्हणतां येईल असें वाटत नाही. वास्तविक हा विषय यशवंतांच्या अगदी जिव्हाळ्याचा. यशवंत स्वतः रेफॉर्मेटरी स्कूलमध्ये पूर्ववयामध्ये नोकरी करीत होते. बालगुन्हेगारांचें जीवन त्यांनी अगदी जवळून पाहिलें आहे आणि त्यांच्या जीवनांतील विविध समस्यांचाहि त्यांनी अतिशय जिव्हाळ्याने विचार केला आहे. बाल गुन्हेगारांना समाज कसें वागवितो, प्रामाणिकपणे जीवन जगणें समाजांत त्यांना कसें अशक्य होतें याहि गोष्टी त्यांना फार जवळून दिसल्या आहेत. खंडकाव्याचा विषय तसें म्हटलें तर त्यांच्या अनुभूतींतून निघाला आहे. त्या दृष्टीने त्याचा आविष्कार उत्कट व कलात्मक रीतीने झालेला असावा अशी 'बंदीशाळा' वाचावयास घेतांना सहजच अपेक्षा निर्माण होते. पण प्रत्यक्ष खंडकाव्य वाचल्यानंतर मात्र तितकेसें समाधान वाटत नाही. कुठे तरी कांही तरी कमी असल्याची जाणीव मनांत राहते व कांहीशा अपेक्षाभंगाने वाचक 'बंदीशाळा' खाली ठेवतो.

चुकून कुमार्गाला लागलेल्या बाल गुन्हेगारासंबंधी ही कथा असावी, असा 'प्रस्तावने'वरून सहजच भास होतो. "अल्पवयांत बिघडणारीं मुलें, त्यांच्यासाठी काढलेल्या सन्मार्गप्रवर्तक शाळा, आणि त्यांमधून सज्ञानावस्थेत बाहेर पडणाऱ्या भावी नागरिकासंबंधीची समाजावरील जबाबदारी हा प्रश्न इतक्या व्यापक स्वरूपाचा आणि गहन विचाराचा आहे की पुढे करण्यांत येत असलेलें हें काव्य म्हणजे त्या विषयाचें केवळ उष्टावण आहे." असा सुरवातीलाच प्रस्तावनेंत

कवीने निर्वाळा दिला आहे. पण हें उष्टावणहि धडपणें केलें गेलें नाही असें काव्य वाचून म्हणावेसें वाटतें. बालगुन्हेगाराच्या जीवनविषयक समस्यांना कवीने अगदी दुय्यम स्थान दिलेलें दिसतें. खंडकाव्याचा पूर्वार्ध गुणिलेच्या कथानकाने व्यापला आहे. अनाथ व निराश्रित तरुण विधवेला कोणत्या हालअपेष्टांना तोंड द्यावें लागतें व वृकोदरासारख्या संभावित बदमाषाच्या कुटिल कारस्थानाला तिला कसें बळी पडावें लागतें यांतच जवळ जवळ पहिलीं दहा प्रकरणें खर्ची पडलीं आहेत. कथानकाच्या निम्म्या भागापर्यंत आपलें लक्ष गुणिलेच्या जीवनावर—व त्या अनुषंगाने समाजांत निराश्रित विधवांना ज्या प्रकारचें जीवन जगावें लागतें त्या जीवनावर—केन्द्रित केलें आहे. गुणिलेच्या बाबतींत आपला दुष्ट हेतु साध्य व्हावा म्हणून संजीवावर चोरीचा खोटा आळ आणून त्याचा काटा आपल्या मार्गांतून काढून टाकावयाचा हा बाल गुन्हेगाराच्या प्रश्नाला जोडणारा दुवा तेथून संजीवाचें कथानक सुरू होतें. तें कथानक खरें म्हणजे बालगुन्हेगाराचें कथानक नव्हे—तर एका कुटिल पुरुषाच्या कारस्थानाला बळी पडलेल्या निष्पाप जीवाचें कथानक. त्या कथानकाच्या अनुषंगाने पण काव्यांत रेफॉर्मेटरी स्कूलचें वर्णन येतें, बालपणा मुलें कां बिघडतात याची कारणमीमांसा येते, या सन्मार्गप्रवर्तक शाळांतून सद्वर्तनाचा दाखला घेऊन बाहेर पडलेल्या बालगुन्हेगाराची समाज कशी संभावना करतो याचें वर्णन येतें, आणि शेवटीं समाजांत प्रामाणिकपणें जगणें अशक्य झाल्यामुळे सैन्यामध्ये दाखल होऊन मरणाच्या मार्गाला जाणें बालगुन्हेगाराला कसे भाग पडतें याचेंहि वर्णन येतें. हीं सर्व वर्णनें कवीच्या अनुभूतींतून निघालीं आहेत व त्यांत बालगुन्हेगाराच्या प्रश्नाबद्दल कवीला किती जिव्हाळा व तळमळ वाटते हें दिसून येतें. पण दुर्दैवाने हीं वर्णनें कथानकाशीं तितकींशी एकजीव झालीं नाहीत. कवीमधील भाष्यकार त्यामध्ये अनेकदा जागा होतो व कळकळीने तो बालगुन्हेगाराच्या जीवनाबद्दल व समाजाच्या त्याच्याकडे पाहण्याच्या दृष्टीबद्दल भाष्य करूं लागतो. कथानकामध्ये कवीने मध्येच भाष्य करण्यासाठी वारंवार केलेला प्रवेश कलादृष्टया विघातक ठरतो. शिवाय संजीवाचें जीवनचित्रण ही बाल गुन्हेगाराच्या जीवनाची प्रातिनिधिक कथा आहे काय? लहानपणी तसा तो थोडाफार आडदांड असेल—पण तो गुन्हेगार नाही. कवीने तर त्याच्या निष्पाप वृत्तीवर व कारावासांतील त्याच्या आदर्श वर्तणुकीवर अधिक भर दिला आहे. अल्पवयांत बिघडणाऱ्या व चुकून कुमार्गाला जाणाऱ्या बालगुन्हेगाराच्या जीवनाचें यांत कुठे चित्रण नाही. समाजांतील कुटिल व दुष्ट पुरुषाच्या कारस्थानाला बळी पडलेल्या एका निराश्रित विधवेची व एका निष्पाप मुलाची ही कहाणी आहे. त्यामुळे काव्यांतील मध्यवर्ति समस्येचा परिणामकारक उठाव कथानकांत कुठेच झाला नाही असें नाइलाजाने म्हणावेसें वाटतें.

या काव्यांत तसें रचनाचातुर्यहि फारसें दिसत नाही. पूर्वार्धामध्ये गुणिलेचें कथानक व उत्तरार्धांत संजीवाचें कथानक अशीं दोन निरनिराळीं कथानकें त्यांत आल्याने काव्यांत कलात्मक एकता साधली नाही गुणिलेच्या कथानकांत वृकोदराला बाजवीपेक्षा जास्त प्राधान्य मिळालें आहे. उत्तरार्धांत गुणिला जी लुप्त होते तें कथानकाच्या अगदी शेवटीं तिचें दर्शन घडतें. उत्तरार्धांतील संजीवाच्या कथानकांतहि असाच विस्कळितपणा आहे त्याच्या कारावासांतील जीवनाचें किंवा सुटकेनंतर त्याला आलेल्या कटु अनुभवांचें उत्कट दर्शन कुठेच घडत नाही. उलट मुलें बिघडण्याचीं कारणें, रेफॉर्मेटरी स्कूल, बालगुन्हेगाराकडे पाहण्याची समाजाची दृष्टि यावरील कवीचें भाष्यच अनेक ठिकाणीं येतें व कथानकांतील एकतानता बिघडवितें. वस्तुनिष्ठ काव्यांत आवश्यक असें ताटस्थ्य कवीला या भागांत साधलें नाही. कदाचित् बालगुन्हेगाराचा प्रश्न त्यांच्या अतिशय जिव्हाळ्याचा असल्याने कथानकांत मधून मधून डोकावण्याचा मोह कवीला होत असावा. मध्यवर्ति समस्येकडे दुर्लक्ष झाल्यामुळे काव्यांतील व्यक्तिरेखाहि प्रत्ययकारी उमटल्या नाहीत पूर्वार्धांत गुणिलेचें चित्रण कांहीसें परिणामकारक झालें आहे; वृकोदर हा खलपुरुषहि बरा रंगविला गेला आहे. पण या दोन्ही स्वभावरेखांना तसा उठाव येत नाही. उत्तरार्धांतील संजीवाचें स्वभावचित्र तर कांही प्रमाणांत

अवास्तव वाटतें. व ज्या मध्यवर्ती समस्येचें तें प्रतीक आहे त्याच्याशीं तर कांही प्रमाणांत तें विसगत झालें आहे.

दोन निरनिराळीं कथानकें एकत्र गुंफण्याचा प्रयत्न व मध्यवर्ति समस्येकडे झालेलें दुर्लक्ष यांमुळे 'वंदीशाळा' हें खंडकाव्य 'जयमंगले' सारखें यशस्वी होऊं शकलें नाही. अर्थात् यशवंतांसारख्या श्रेष्ठ कवीच्या लेखणींतून तें बाहेर पडलें असल्याने त्यांत अनेक चांगल्या गोष्टी आहेत हें लक्षांत ठेवावयास हवें. यांत मधून मधून विखुरलेलीं भावगीतें सुंदर आहेत; गुणिलेच्या किंवा संजीवच्या भावनांचें त्यांनी रेखाटलेलें चित्र करुणरम्य व मनाची पकड घेणारें आहे; त्याचप्रमाणें संजीवची समाजाने केलेली अवहेलनाहि कवीन परिणामकारक रीत्या रंगविली आहे. सुंदर सुंदर कल्पनांचा शिडकावा तर मधून मधून सर्वत्र आहे. पण हे निरनिराळे सुंदर तुकडे आहेत. ते एकत्र करून त्याचें सलग सुंदर चित्र होत नाही. वस्तुनिष्ठ दृष्टि कवीच्या प्रतिभेला फारशी मानवत नाही याची साक्ष 'वंदिशाळा' वाचतांना पटते.

यशवंतांनी लिहिलेलीं हीं दोन महत्त्वाची खंडकाव्यें. याशिवाय त्यांनी प्रदीर्घ कथाकाव्येंहि बरींच लिहिलीं आहेत. विशेषतः त्यांच्या 'यशोधन' या पहिल्याच काव्यसंग्रहांत 'चमेलीचे झेले', 'एका वर्षानंतर'. 'प्रीतिसगम', 'कलंकिता' व 'एक कहाणी' अशीं पांच कथाकाव्यें आलीं आहेत. त्यांपैकी 'कलंकिता' हें कथाकाव्य सोडलें तर बाकीचीं सर्व प्रेमकाव्येंच आहेत व त्या काव्यांतून यशवंतांनी 'जयमंगला'चें यशस्वी तंत्रच हाताळलें असल्याने पुष्कळ प्रमाणांत तीं काव्यें सरस वठलीं आहेत. हीं सर्व काव्यें पात्रमुखी आहेत. त्यामुळे नायकांच्या मनांतील भावनांचीं आंदोलनें या सर्व कवितांतून फार चांगलीं रंगविलीं आहेत. 'चमेलीचे झेले' हें एक लहानसेंच पण मनाला चटका लावणारें कथाकाव्य आहे. नायक आणि नायिका यांच्या प्रेमाचें रम्य चित्र पहिल्या सुनीतवजा काव्यांत येतें—त्यांच्यावर पाळत ठेवून त्यांच्या प्रेमाला ग्रहण लावणारा राहू दुसऱ्या खंडांत येतो—व तिसऱ्या खंडांत प्रेमभंगाच्या व्यथांचें मनोज्ञ चित्रण आहे. या लहानशाच कथाकाव्यांत प्रसंगाचें रेखन व भावनांचें चित्रण अतिशय चांगलें साधलें आहे. 'एका वर्षानंतर' या कथाकाव्यांत प्रेमभंग झालेल्या नायकाच्या आठवणी सुनीतवजा दहा पद्यखंडांतून चित्रित केल्या आहेत. एका दृष्टीने 'चमेलीचे झेले' या कथाकाव्याचाच हा उत्तरार्ध आहे. गतकाळाच्या स्मृति व त्यामुळे हृदयाला होणाऱ्या व्यथा यांचें उत्कट चित्र या सर्व काव्यांत आपणाला दिसतें. निराश प्रेमाच्या व्यथांचें दर्शन घडविणारें तिसरें कथाकाव्य म्हणजे 'एक कहाणी'. बारा सुनीतांतून रंगविलेली ही प्रेमभंगाची करुणकथा वरील दोन कथाकाव्यांप्रमाणेच मनाला चटका लावणारी आहे. प्रथम दर्शन—प्रेमाचा विकास—प्रेमभंग—त्यानंतर नायकाच्या मनोव्यथा—पत्रिकाहवन आणि शेवटीं प्रियतमेचा दुःखद अंत या सर्व घटना निरनिराळ्या सुनीतांतून नायकाच्या मुखांतून कवीने फार चांगल्या रंगविल्या आहेत. निराश प्रेमाची ही कहाणी वाचत असतांना नायकाचें उदास व्यक्तिमत्व आपल्या कल्पनेसमोर तरळत राहातें. 'पत्रिकाहवना'चा प्रसग तर अतिशयच भावनापूर्ण वाटतो 'यशोधन'मधील या कथाकाव्यांतून किंवा 'शिलालेख', 'फिरस्त्याचें गाणें' अशासारख्या नाट्यगीतांतून प्रेमभंगाचे निःश्वासच अधिक ऐकूं येतात. त्या मानाने 'प्रीतिसंगम' हें एकच लहानसें कथाकाव्य निराळेपणाने उठून दिसतें. प्रेमाचें साफल्य दाखविणारें हें कथाकाव्य आठ सुनीतवजा पद्यखंडांत विभागलेलें आहे व त्यांत प्रीतीच्या विविध छटा मोठ्या मार्मिकपणाने चित्रित केल्या आहेत. नायक नोकरीवर जातांना व नायिका शाळेंत जात असतांना दररोज त्यांचें एकमेकांना होणारें दर्शन——त्यांतून एकमेकांच्या मनांत उदित झालेले प्रेमभाव——त्याचें त्यांच्या विविध विभ्रमांतून होणारें मार्मिक दर्शन——एक दिवस दर्शन घडलें नाही म्हणून वाटणारी हुरहूर——आणि शेवटीं दोघांचें झालेलें मीलन—या सर्व प्रसंगांचें चित्रण मोठें मोहक वाटतें. 'यशोधनां'त प्रीतीचें साफल्य रंगविणारी ही एकच कविता म्हणून तिचें अधिक महत्त्व आहे. एरव्ही प्रेमभंगाचे निःश्वा-

सच 'यशोधनां'त जागोजाग ऐकूं येतात. 'कलंकिता' या कथाकाव्याची पार्श्वभूमि सामाजिक आहे. कलंकित झालेल्या स्त्रीशी विवाह केलेल्या पुरुषाची भूमिका या काव्यांतून यशवंतांनी अतिशय चांगल्या रीतीनें रंगविली आहे. कथेपेक्षा त्यांत समर्थनाची भूमिका अधिक असली तरी त्यामागे असणारी भावना उत्कट आहे. याशिवाय 'भावमंथन', 'न विझणारी मशाल' 'दिवंगताचें स्मारक' अशासारखीं प्रदीर्घ कथाकाव्यें कवीनें बरींच लिहिलीं आहेत व थोडचा फार प्रमाणांत त्यांत त्यांना यशहि मिळालें आहे. पण त्यांतल्या त्यांत विशेष उल्लेखनीय अशी त्यांचीं प्रदीर्घ कथाकाव्यें 'यशोधनां'तच आलीं आहेत व आपल्या आत्मनिष्ठ मनोवृत्तीला अनुकूल अशाच तंत्राचा आश्रय घेऊन तीं त्यांनी उत्कटतेनें रंगविलीं आहेत.

यशवंतांच्या खंडकाव्यांचा किंवा प्रदीर्घ कथाकाव्यांचा विचार करतांना यशवंत हे प्रामुख्यानें भावगीत कवि आहेत हें सत्य पुन्हा एकदा मनांत ठसतें. भावगीतरचनेचा आश्रय घेऊन जीं खंडकाव्यें किंवा प्रदीर्घ कथाकाव्यें त्यांनी लिहिलीं आहेत त्यांत त्यांच्या प्रतिभेचा व आत्मनिष्ठ वृत्तीचा सहज आविष्कार असल्यानें तीं यशस्वी ठरलीं आहेत. वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून व निरूपणात्मक कथाशैलीचा आश्रय घेऊन खंडकाव्य लिहिणें त्यांच्या प्रतिभेला व मनोवृत्तीला फारसें मानवलें नाही. त्यामुळे त्या क्षेत्रांत त्यांना तेवढें यश मिळूं शकलें नाही. कवि यशवंतांच्या प्रतिभेला किंवा त्यांच्या काव्याला त्यामुळे कोणतें वैगुण्य येतें असें समजण्याचें बिलकूल कारण नाही. प्रत्येक कवीची भावनाविष्काराची स्वतंत्र अशी शैली असते–प्रत्येक कवीच्या प्रतिभेला मर्यादाहि असतात. हें सर्व विचारांत घेऊन कवीच्या काव्याचें मूल्यमापन करावयास हवें. भावगीताच्या क्षेत्रांत यशवंतांनी असामान्य यश मिळविलें. त्यांची प्रतिभा आत्मनिष्ठ काव्यांत विशेष रमली. वस्तुनिष्ठ काव्यांत ती तितकी रमूं शकली नाही. पण यामुळे त्यांच्या काव्याचें मोल कमी होत नाही. गेलीं तीस–पस्तीस वर्षे यशवंतांच्या काव्याचें सतत कौतुक करून मराठी रसिकांनी हाच कौल दिला नाही काय ?

---



## साभार पोच

(१) प्रतिभा—बहुरूपी प्रकाशन, मुंबई.
(२) साहित्य—मराठी साहित्य संघ, मुंबई १९५७
(३) विश्वदर्शन अथवा नासदीय सूक्त–नीराजन—नागपूर प्रकाशन, नागपूर.
(४) विज्ञान शोभा—पाप्युलर बुक डेपो, मुंबई ७.
(५) शिल्पकार—वोरा आणि कंपनी, मुंबई.
(६) मराठीची माया—डॉ. नांदापूरकर, हैद्रावाद.
(७) हिरवी शाई—वसंतानंद प्रकाशन, गोंदिया.
(८) धुवांधार—कांटिनेंटल प्रकाशन, पुणें.
(९) सूर्योपासना—डॉ. र. कृ. गर्दे, पुणें.
(१०) पोहण्याचा छंद—डॉ. र. कृ. गर्दे, पुणें.
(११) आरोग्यासनें—डॉ. र. कृ. गर्दे, पुणें.
(१२) शाकाहार की मांसाहार—मराठी थिऑसफीकल फेडरेशन, पुणें.
(१३) पुनर्जन्माचा सिद्धान्त—मराठी थिऑसफीकल फेडरेशन, पुणें,
(१४) कालिदासरहस्यम्—श्री. भा. वर्णेकर.
(१५) देवनागरी टंकलेखक—म. ना. गोगटे, मुंबई.
(१६) वाङ्मयत्रिवेणी } डॉ. रा. चिं. श्रीखंडे, कोल्हापूर.
(१७) सुश्लोक दोहावलि }
(१९) जीवनलीला—काका कालेलकर.
(२०) यति सुब्रह्मण्य तीर्थ—दे. ना. दलाल.
(२१) रातराणीची फुलें } नागपूर प्रकाशन
(२२) शुक्राचें चांदणें }

यांपैकी निवडक पुस्तकांचा परामर्श घेण्यांत येईल.

---

# ' युगवाणी 'चीं गेलीं तीन वर्षे

## (संपादकाचें व्यक्तिगत निवेदन)

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने मे १९५६ ते एप्रिल १९५९ च्या तीन वर्षांच्या काळांत 'युगवाणी'च्या मुख्य संपादकत्वाची धुरा माझ्या खांद्यावर दिली होती. माझे खांदे सदरहू रथ वाहून नेण्याइतके पुरेसे बलिष्ठ असतील अशी अपेक्षा त्यावेळीं बाळगण्यांत आली होती. तथापि माझ्या मर्यादित सामर्थ्याची जाणीव मी त्याच वेळीं दिली असूनहि माझें कोणी ऐकलेंच नाही. सेवाबुद्धि आणि आपलें अज्ञान कमी करण्याची संधि यांमुळेच या कामाचा मी पत्कर घेतला व स्वतःचें मर्यादित सामर्थ्य आणि भोवतालीं उपलब्ध असणारीं साधनें यांच्या बळावर मल॰ जी सेवा करतां आली ती केली. विदर्भ साहित्य संघास.रख्या प्रातिनिधिक साहित्य संस्थेचें मुखपत्र कसें असावें ा संबंधीं माझ्या कांही कल्पना होत्या व त्या मी माझ्या कारकिर्दीतील पहिल्याच (मे १९५६) संपादकीय निवेदनांत निःसंदिग्ध रीतीने मांडल्या होत्या. "'युगवाणी'चें स्वरूप चिल्लर आणि थिल्लर असूं नये व तें जड असलें तरी निरुपयोगी असूं नये व त्याचा कांही एक सांस्कृतिक दर्जा असावा" असें मी त्या वेळीं लिहिलें होतें. माझी ही कल्पना मी पूर्णांशाने फलद्रूप करूं शकलों नाही. कारण अपेक्षित लेखनसाहाय्य कांही केवळ इच्छाबळाने मिळण्यासारखें नव्हतें. तथापि झालें हेंहि कार्य उपेक्षिण्यासारखें असेल असें म्हणवत नाही.

माझ्या पूर्वीच्या संपादकांकडून कै. डॉ. दप्तरी यांची उपनिषद्विषयक लेखमाला आणि चिल्लर कवितांचा भला मोठा गठ्ठा असा वारसा घेऊन मी कामास आरंभ केला. कांही अंकांतून हे उपनिषद्-विषयक लेख दिले. पुढे कै. डॉ. दप्तरींचें एतद्विषयक पुस्तक प्रसिद्ध होण्याची योजना झाली असल्यामुळे ही लेखमाला 'युगवाणीं'तून बंद केली. हातीं असलेल्या कवितांचें परीक्षण केलें असतां या मजकुराने 'युगवाणी'ची जागा अडविणें हितावह नाही असें मला वाटलें. आश्चर्य असें की गंभीर लेख पाठ-विण्याचें आवाहन वारंवार करूनहि रोज ४।५ चिमुकल्या कविता मात्र येऊन पडूं लागल्या. त्या दुरुस्त करणें व त्यासंबंधी पत्रव्यवहार करणें ही मोठीच कित्तकट बाब असल्यामुळे आत्मसंरक्षणार्थ कवितांची दखल घ्यायचीच नाही असें मी ठरवून टाकलें व हें धोरण आमच्या स्वास्थ्यास फार उप-योगी ठरलें. असें करण्यामध्ये कांही चांगल्या कविता जगापुढे येऊं न देण्याचें पाप माझ्या हातून झालें असेल पण त्याला इलाज नव्हता. 'युगवाणी'त कविता कां येत नाहीत अशी तक्रार फक्त कांही कवींनीच केली. एकाहि वाचकाने ती केली नाही ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. याचा अर्थ कवितांच्या प्रसिद्धीची गरज फक्त कवीस असते वाचकास मुळींच असत नाही असा करावा की काय तें ठरविलें पाहिजे.

ललित साहित्याच्या बाबतींत देखील हीच दृष्टि ठेवावी लागली. ललित साहित्य प्रसिद्ध कर-णारीं नियतकालिकें अनेक आहेत. त्यामुळे 'युग-वाणी'ने त्यांत पडलेंच पाहिजे असें मला वाटेना. सरकारी अनुदानाच्या आश्रयाने चालणाऱ्या 'स्वायत्त' नियतकालिकांनी गंभीर वाङ्मयाची दखल घेऊं नये तर कोणी घ्यावी? एका अर्थाने गंभीर वाङ्मय आणि त्याचे लेखक हा वाङ्मयक्षेत्रांतील आज गरीब बिचारा आणि अल्पसंख्य वर्ग आहे. त्याचे ग्राहक कमी. तेव्हा त्याला आपण हातभार लावावा

हें उचित आहे अशी माझी भावना होती. यांत दयाबुद्धि नसून आनृण्याची भावना आहे. दुसरें असें की ख्यातनाम लेखकांचें ललित साहित्य मोबदल्या-शिवाय मिळण्याची शक्यता नव्हती. शब्द त्यांचे व अर्थ आपला हा विनिमय, एरव्ही कितीहि चांगला असला तरी तो, 'युगवाणी'स परवडण्यासारखा नव्हता. उलट विवेचक लेखक बिनामोबदल्यानेंहि लेख देतो ही बाब उघड होती. अशा अवस्थेंत ललित साहित्य द्यावयाचें तर 'होतकरू लेखकास उत्तेजन देणें' वगैरे प्रकारचें ढोंग करावें लागलें असतें. तें हि बरें वाटेना. विवेचक लेख मिळविणेंहि तसें सोपें नव्हतें. आलेले व 'युगवाणीं'त प्रसिद्ध झालेले कांही लेख दुसऱ्या तिसऱ्या दर्जाचे असण्याचा संभव आहे याची मला जाणीव आहे; पण प्राप्त परिस्थितींत त्यावाचून निर्वाह करावयाला साधनहि नव्हतें. येत्या अंकासाठी लेखरूप अन्न घरांत नाही अशी परिस्थिति जेव्हा जेव्हा उत्पन्न होई तेव्हा तेव्हा विदर्भ संशोधन मंडळाच्या कांही ऋषींच्या हातापाया पडून चार घ लेखांची माधुकरी मी मिळवीत असे. मला अशा रीतीनें संकटमुक्त केलेल्या अनेक थोर लेखकांचें ऋण माझ्या शिरावर आहे.

ललित साहित्याची अगदीच उपेक्षा होऊं नये म्हणून मार्च १९५७ चा अंक ललित साहित्य विशेषांक म्हणून काढला. त्यांत कथा व कविता यांचा अर्थातच परामर्श घेण्यांत आला व अलिकडील कांही अंकांतहि एक दोन कथा दिल्या.

पुस्तकपरीक्षणें कटाक्षानें येत राहावीं असें मला वाटलें व त्या बाबतींत आलेल्या ग्रंथांचा साक्षेपानें परामर्श घेण्याचा मी प्रयत्न केला. अनेक अभिप्राय-लेखकांकडे पुस्तकें देऊन अनुनयपूर्वक मी त्यांजकडून काम करून घेतलें आहे व त्यांनी लिहिलेले अभिप्राय नामोल्लेखपूर्वक 'युगवाणीं'त प्रसिद्ध केले आहेत. कित्येक पुस्तकांवरील अभिप्रायांना फार उशीर होत गेला व चिल्लर पुस्तकांवरील अभिप्राय मोठा व मोठ्या ग्रंथावरील अभिप्राय लहान असाहि विपर्यय क्वचित झाला याबद्दल क्षमा मागणें माझें कर्तव्य आहे. कांहींचीं परीक्षणें तर स्वतंत्र लेखाचाहि विषय झाली. एकंदर हें सदर अनेकांना आवडलें. अजूनहि पंचरावीस पुस्तकांवरील अभिप्राय लिहून तयार आहेत. ते अन्य लेखांबरोबर यथावकाश प्रसिद्ध करण्यासबंधी आम्ही उत्तराधिकाऱ्यांना विनंती करीत आहोंत. या सर्व अभिप्रायलेखकांचा मी फार फार आभारी आहें. सर्व अभिप्रायित पुस्तकें वि. सा. संघाच्या ग्रंथालयांत प्रामाणिकपणें दाखल केलीं आहेत.

गेल्या तीन वर्षांत १४७ गंभीर लेख व १५१ पुस्तकांवरील परीक्षणें प्रसिद्ध झालीं असून सर्व अंकांची मिळून पृष्ठसंख्या १३९४ होते. 'युगवाणी' ने एकूण पांच विशेषांक या काळांत पुढीलप्रमाणे प्रसिद्ध केले:—

१. आगस्ट १९५६ टिळक आगरकर जन्म-शताब्दी विशेषांक.

२. मार्च १९५७ ललित साहित्य विशेषांक.

३. एप्रिल १९५७ संस्कृति विशेषांक.

४. नोव्हेंबर व डिसेंबर १९५८ नाट्यमहोत्सव विशेषांक.

५ एप्रिल १९५९ कथाकाव्य विशेषांक.

यांपैकी क्रमांक २ व ५ चें संपादन प्रा. मा. ल. व्यवहारे, क्रमांक ३ चें संपादन श्री. प्र. दे. कोठे व क्रमांक ४ चें संपादन प्रा. माणिक के. बैतुले यांनी केलें. अर्थात् त्या त्या अंकाचें सर्व श्रेय त्यांजकडे जातें. कांहीं दुःश्रेय असलेंच तर तें माझें आहे. मजवरील जबाबदारीचें ओझें या अंकांपुरतें वरील मंडळींनी कमी केलें याचेंहि मला उतराई होणें जमणार नाही. संमेलन उत्सवादि नित्यनैमित्तिक बातम्या त्या त्या वेळीं योग्य तो परामर्श घेण्यांत आला.

नव्या पिढींतील पदवीधर लेखकांपैकीहि कित्ये-कांची भाषा चांगली, विचारधाराहि बरी, पण शुद्ध-लेखन मात्र फार निष्काळजीपणाचें, असा मला त्यांचीं हस्तलिखितें पाहून अनुभव आला. 'शुद्ध'लेखन ही कोणत्याहि लेखाची प्रारंभिक अट असली पाहिजे असें मला वाटतें.

प्रत्येक अंकाच्या प्रारंभीं संपादकानें कांही निवेदन करावें अशी अलिकडे पद्धति पडल्यामुळे मी

त्या अंगाचा अवलंब केला. एरव्ही त्याची गरज होती असं नाही. हा मजकूर अगदीं संक्षिप्त, स्फुट स्वरूपाचा व शक्यतों पक्षभेदातीत विषयांवर राहील अशी मी काळजी घेत गेलों. कोणत्या तरी मतभेदाच्या मुद्यावर आपण लिहावें व 'हें संघाचें अधिकृत मत नव्हे' असा अधिकाऱ्यांकडून ठपका यावा हें त्याच संघाच्या मुख-पत्राच्या संपादकास परवडण्यासारखें नव्हतें-मतभेद असण्याचें प्रयोजनहि नव्हतें. राजकीय बाबीहि मी टाळीत गेलों. आपण एका जबाबदार साहित्य संस्थेचे प्रतिनिधि म्हणून लिहीत आहोंत याची जाणीव मी कधीहि दूर होऊं दिली नाही. कांही संपादकीयांतून मी आपलीं निश्चित मतेंहि प्रगट केलीं हें सूक्ष्म वाचकांच्या लक्षांत आल्यावाचून राहिलें नसेल. संपादक आपलेच लेख दडपून देतो असा ठपका येऊं नये म्हणून मी माझे तीन चारच स्वतंत्र लेख कार्यकारी संपादकांच्या आग्रहावरून अपरिहार्य म्हणून दिले.

पहिलीं दोन वर्षें सात जणांचें व तिसऱ्या वर्षी तीन जणांचें असें संपादक मंडळ माझ्या सहायार्थ दिलें होतें. हे सर्व सज्जन अत्यंत विद्वान व लायक होते व त्यांच्या सहाय्याचा व प्रसंगविशेषीं मार्गदर्शनाचाहि मला फार उपयोग झाला. पण त्यांपैकी कित्येक बाहेरगावीं राहणारे होते, त्यांच्या सततच्या साहाय्यास मात्र मी मुकलों. नैमित्तिक गाठीभेटी व पत्रव्यवहार यांमुळे काय विचारविनिमय होई तेवढाच. स्थानिक गृहस्थांना मात्र मी थोडाबहुत त्रास दिला. या सर्व सज्जन सहायकांचा मी फार ऋणी आहें. त्यांतहि प्रा. मा. ल. व्यवहारे, श्री. ना. रा. शेंडे आणि प्रा. माणिक के. बैतुले यांच्या साहाय्याचा विशेष उल्लेख केल्यावाचून मला राहवत नाही. वि० सा० सं० चें कार्यकारी मंडळ--विशेषत: अध्यक्ष व चिटणीस--यांनी मला सतत प्रोत्साहन दिलें याबद्दल तेहि धन्यवादास पात्र आहेत.

अंदाजपत्रक तयार करण्याच्या वेळेच्या परिस्थितींत फरक पडल्यामुळे 'युगवाणी'चा जमाखर्च कित्येकदा आवाक्याबाहेर जात असे. त्यावेळीं आम्हांला पृष्ठसंख्येवर नियंत्रण घालावें लागे. अशा अवस्थेंत 'युगवाणी'स बाहेरून थोडें साहाय्य झाल्यास बरें म्हणून जाहिराती घेण्याचा उपक्रम सुरू केला. हें खातें सर्वस्वी प्रा. बैतुले यांनी सांभाळलें होतें.

'युगवाणी' नेमल्या तारखेस काढण्याची आमची प्रतिज्ञा पहिले कांही महिने यशस्वी झाली. पण पुढे प्रत्येकवेळीं दोनचार दिवसांचा तरी फरक पडूं लागला. छापखान्याच्या सोईवर आम्हांला अवलंबून राहावें लागे त्याला इलाज नव्हता. तथापि नारायण मुद्रणालयाचे चालक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी 'युगवाणी'चें मुद्रण मोठ्या आत्मीयतेने सुबक व निर्दोष केलें आणि आम्हाला सर्वतोपरि साहाय्य दिलें याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें.

'युगवाणी'च्या या कार्याबद्दल प्रशस्तिपर व उत्तेजनपर अभिप्राय अनेक थोरांकडून आले ही समाधान वाटण्यासारखी परिस्थिति असली तरी त्यांत प्रेममूलक अतिशयोक्ति असण्याचा संभव होता हें उघड आहे. रोषपत्रें गेल्या तीन वर्षांत फक्त दोनच आलीं व तींहि दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून आलीं होतीं ! आणि तें स्वाभाविकहि आहे.

गतवर्षीच्या साधारण सभेंत 'युगवाणी' संबंधी कांही चर्चा झाली होती. तेव्हा 'सामान्य वाचकां'च्या बाजूने कांही तक्रारी कांही सज्जनांनी केल्या होत्या. त्यांस अनुलक्षून "**सामान्य वाचकाचें सगुण स्वरूप**" हा लेख 'सामान्यान्वेषी' या टोपण नांवाने मी लिहिला. (जून १९५८, पृ. १५) मात्र 'युगवाणी' संबंधी तक्रार करणाऱ्या एकाहि सज्जनाने स्वत:च्या कल्पना साकार करणारा एका ओळीचाहि मजकूर लिहून पाठविण्याचे परिश्रम घेतले नाहीत हें नमूद करावेंसें वाटतें.

आणखी एक अनुभव सांगण्यासारखा आहे. स्वत:च्या अखत्यारींत नियतकालिकें चालविणें आणि एखाद्या संस्थेचा प्रतिनिधि म्हणून चालविणें यांत फार अंतर असतें असें मला वाटतें. पहिल्या प्रकारांत आपण जें देऊं तें वाचक घेतात. दुसऱ्या प्रकारांत, त्या संस्थेच्या कांही वर्गणीदारांच्या मनांत तरी आपण या

नियतकालिकाचे अंशभूत मालक आहोंत अशी कोठे तरी सूक्ष्म जाणीव असल्यामुळे आपली अभिरुचि व ज्ञानकक्षा याला न जमणारें संपादकानें कांही केलें की आपण कृपा करून नेमलेल्या या माणसाने असा अतिप्रसंग करावा म्हणजे काय, अशा कल्पनेनें ते त्यावर रुष्ट होतात ! संपादकाने आपली 'फर्माइश' मानावी असें त्यांना स्वाभाविकच वाटतें. पण या बाबतींत 'नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम्' असें असल्यामुळे आत्मतुष्टि हेंच प्रमाण शेवटीं संपादकाला मानणे प्राप्त होतें.

'युगवाणी' साठी मला माझा वेळ बराच द्यावा लागला, धावपळहि पुष्कळ करावी लागली, प्रसंगीं पदरमोडीचेहि प्रसंग येत. 'युगवाणी'चा सारा पत्रव्यवहार मी जातीनें करीत असें. लेखांसाठी 'ॐभवति' पक्षाची कास कितीदा धरावी लागली. पण मी हें सारें स्वेच्छेनेच केलें असल्यामुळे मला ह्यांत आनंदच वाटला. या कामीं मी मृत्यूच्या तीन वर्षें अधिक समीप आलों याचेंहि भान मला राहिलें नाही. मला यापूर्वी मासिकें काढणें आणि तीं चालविणें (किंवा बुडविणें ! ) याचा साक्षात् अनुभव नव्हता. योगायोगाने माझ्या आयुःप्रवासांत संपादकीय कार्याचेंहि एक विश्रामस्थान कांही काळ लाभलें व गतकालीन घटनांची स्मृति जेव्हा जेव्हा होईल तेव्हा या बाबतींत 'भुक्तोज्झित एष विषयः' असें, तुच्छतेनें नव्हे पण समाधानानें, म्हणण्याची सोय झाली हा लाभ कांही लहान नाही.

मात्र या कामीं मला माझ्या अपात्रतेची जेवढी जाणीव होती तेवढी इतरांस क्वचितच असेल. परंतु माझी ही समजूत तीवर बहुमताचें (किंवा असें हुकमी बहुमत मिळविण्याची कांही यंत्रणा असेल तर--व सध्याच्या निवडणुकीच्या प्रकारांत अशी यंत्रणा सहज शक्य आहे—त्या यंत्रणेचें) शिक्कामोर्तब होऊन अधिकृत रीतीनें सिद्ध झाल्याखेरीज माझें कल्याण नाही अशा तळमळीनेच जणू काय माझ्या कांही हितैषी मित्रांनी मला उगाच निवडणुकीच्या धकाधकींत 'पाडलें !' एरव्ही माझी मनोवृत्ति निवडणुकीच्या राजकारणाला अनुकूल नाही. बहुमताचा कौल अर्थात् मला शिरसामान्य आहे. 'आपरितोषाद्विदुषां' हा कालिदासकालीन दंडक होता. आता लोकशाहींत त्याऐवजी 'आपरितोषादवहूनां' असा नवा दंडक घालणें प्राप्त आहे. "'युगवाणी' मासिकावरील अनेकांचा आजवरचा रोष नाहीसा करण्यासाठी" (मराठा १३-३-५९) बदल आवश्यक असल्याचा निर्वाळा एका मित्राने दिलाहि आहे. कालौघांत असे अदलबदल होतच जाणार.

'युगवाणी'ची व वि० सा० संघाची इतउत्तर योग्य मार्गानें भरभराट होत राहो हीच प्रार्थना. अनेकांच्या कृपेचें ऋण अगोदरच मजवर पुष्कळ झालें आहे. तें तसेंच कायमचें भूषण म्हणून शिरीं वागवून व अधिक उण्या वर्तनाची क्षमा मागून तुष्ट चित्तानें मी आपला निरोप घेत आहें.

फाल्गुन शु. १५ }
२४ । ३ । ५९ } पां. कृ. सावळापुरकर





अनुक्रमणिका

# तळोधी येथील २१ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचा अहवाल

प्रा. श्री. गो. काशीकर

२१ वें विदर्भ साहित्य संमेलन दि. १५ व १६ मार्च १९५९ ला तळोधी (बाळापूर) जिल्हा चांदा येथे अत्यंत उत्साहाने व यशस्वीपणें पार पडलें. संमेलनाकरितां विदर्भाच्या निरनिराळ्या भागांतून ७५ च्यावर प्रतिनिधि आले होते व स्वागतमंडळाचे सदस्य मिळून संख्या जवळजवळ २०० होती. तळोधी येथील मराठी माध्यमिक शाळेंत प्रतिनिधींच्या निवासाची व्यवस्था करण्यांत आली असून कोषाध्यक्ष श्री. यादवराव पोशट्टीवार यांच्या कारखान्यांत भोजनाची व त्याला लागूनच असलेल्या सुंदर शामियान्यांत कार्यक्रमाची व्यवस्था केली होती.

शनिवार दि. १४-३-५९ ला रात्री ९ वाजतां केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा झाली. ह्या सभेंत प्रामुख्याने संमेलनांतील ठरावांचा विचार करण्यांत आला.

रविवार दि. १५-३-५९ ला सकाळीं ९ वा. अधिवेशनास सुरवात झाली. प्रथम कु. सुमन पाकमोडे, कु. अंजनी मेश्राम व कु. बेबी अट्टलवार यांनी स्वागतगीत म्हटल्यानंतर कु. दुर्गा कानगो यांनी महाराष्ट्रगीत म्हटलें. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. गोविंदराव मेश्राम यांनीं स्वागतपर भाषण केलें. (हें भाषण याच अंकांत स्वतंत्रपणें दिलें आहे.) त्यानंतर वि. सा. सं.चे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी संमेलनाकरितां आलले शुभसंदेश वाचून दाखविले. आलेल्या संदेशांत उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन्, पंजाबचे राज्यपाल ना. न. वि. गाडगीळ, ओरिसाचे राज्यपाल ना. सुखटणकर, नागपूर विद्यापीठाचे उपकुलगुरु न्या. मू. बडकस, डॉ. पंजाबराव देशमुख, ना. बाळासाहेब तिरपुडे, श्री. डोंगरकेरी, रॅं. र. पु. परांजपे, श्री. मेहता, श्री. वि. स. खांडेकर, श्री. आ. रा. देशपांडे, इ. चे संदेश प्रमुख होते. नंतर संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी प्रा. या. मु. पाठक यांना संमेलनाध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. तिला चांदा जिल्ह्यातर्फे तु. ना. काटकर, अमरावती जिल्ह्यातर्फे प्रा. मा. ल. व्यवहारे, बुलडाणा जिल्ह्यातर्फे प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, यवतमाळ जिल्ह्यातर्फे श्री. गो. स. देहाडराय, वर्धा जिल्ह्यातर्फे प्रा. भा. श्री. परांजपे, अकोला जिल्ह्यातर्फे श्री. य. गो. मालोदे आणि नागपूर जिल्ह्यातर्फे श्री. र. वि. कुळकर्णी यांनी दुजोरा दिला. नंतर संमेलनाध्यक्ष प्रा. या. मु. पाठक टाळयांच्या गजरांत स्थानापन्न झाल्यावर स्वागतमंडळातर्फे त्यांचें आणि संघाध्यक्ष श्री. ढवळे व नवनिर्वाचित संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचें पुष्पहारांनी स्वागत करण्यांत आलें. नंतर विदर्भांतील सुमारें २० संस्थांतर्फे संमेलनाध्यक्षांचा हार घालून सत्कार करण्यांत आला.

यानंतर संमेलनाध्यक्ष प्रा. या. मु. पाठक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाचें सुरस वाचन केलें. (हें भाषण याच अंकांत अन्यत्र दिलें आहे.) भाषणांतील राजकीय व शासनविषयक मतें हीं आपलीं वैयक्तिक मतें असून विदर्भ साहित्यसंघ या संस्थेचा त्या मतांशीं संबंध नाही असा तोंडी खुलासाहि या वेळीं त्यांनी केला. शेवटीं कु. शोभा कानडे यांनी 'वंदेमातरम्' म्हटल्यावर हा सकाळचा कार्यक्रम संपला.

दुपारीं १॥ वाजतां प्रथम विषयनियामक समितीची व नंतर साधारणसभेची बैठक प्रतिनिधि निवासांत झाली. त्यांत संमेलनांतील ठरावांचा विचार करण्यांत आला. संमेलनाध्यक्षांनी अध्यक्षीय भाषणांत जीं राजकीय स्वरूपाचीं व शासनविषवक विधानें केलीं

तें विदर्भ साहित्य संघाचें अधिकृत मत नाही असा ठरावहि साधारण सभेंत एकमताने मंजूर करण्यांत आला. हा ठराव प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांनी मांडला व त्याला श्री. वसंत खेर्डीकर आणि श्री. र. वि. कुळकर्णी यांनी अनुमोदन दिलें.

दुपारीं ३–३० वाजतां प्रा. या. मु. पाठक यांच्या हस्तें संशोधनात्मक व साहित्यिक प्रदर्शनाचें उद्घाटन करण्यांत आलें. या प्रसंगीं श्री. दे. गो. लांडगे, श्री. कृ. मु. उजळंबकर व प्रा. श्री. गो. काशीकर यांचीं प्रदर्शनांतील सामुग्रीचा परिचय करून देणारीं भाषणें झालीं. या प्रदर्शनाकरितां विदर्भ साहित्य संघ, विदर्भ संशोधन मंडळ, शारदाश्रम–यवतमाळ, केंद्रीय ग्रंथालय –नागपूर व मुंबई शासनाचा माहिती विभाग यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सामुग्री जमविली होती. हें प्रदर्शन अत्यंत उद्बोधक व आकर्षक होतें.

नंतर सायंकाळीं ५ वाजतां शामियान्यामध्ये ग्रंथप्रकाशनाचा कार्यक्रम सुरू झाला. कै. किसन फागोजी बन्सोड लिखित 'प्रदीप' या काव्यसंग्रहाचें प्रथम प्रकाशन करण्यांत आलें. या ग्रंथासंबंधी श्री. ग. त्र्यं माडखोलकर व श्री. ना. रा. शेंडे यांचीं भाषणें झालीं. शेवटीं कै. किसन फागोजी यांचे चिरंजीव श्री. शामराव बन्सोड यांनी आभार मानले.

त्यानंतर विदर्भ साहित्य संघातर्फे छापण्यांत आलेल्या नागपूर विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु कै. डॉ. तु. ज. केदार यांच्या 'दि वेदस्थान ॲंड दि एन्शन्ट होम ऑफ दि इन्डोआर्यन्स' या संशोधनात्मक प्रबंधाचा प्रकाशनसमारंभ करण्यांत आला. या वेळीं श्री. बाळासाहेब ढवळे व डॉ. वि. वा. करंबेळकर व श्रीमती माईसाहेब केदार यांचीं भाषणें झालीं ग्रंथाचें उत्कृष्टपणें संपादन केल्यावद्दल व विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहिल्यावद्दल डॉ. वि. वा. करंबेळकर यांचें व आर्थिक साहाय्य व हस्तलिखित दिल्यावद्दल श्रीमती माईसाहेब केदार यांचे या वेळीं आभार मानण्यांत आले.

सायंकाळीं ५–३० वाजतां 'आधुनिक मराठी कविता' या विषयावर परिसंवाद झाला. या परिसंवादांत प्रा. रामडोके, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे व प्रा. भ. प्र. मोहरीर यांचीं व्यासंगपूर्ण भाषणें झालीं.

रात्रीं ९ वाजतां गोंदा प्रशिक्षण महाविद्यालयांतील कलाकारांनी गायन व माडिया नृत्याचा कार्यक्रम सादर केला. या विभागांतील आदिवासी जीवनाचा परिचय करून देणारें माडियानृत्य अत्यंत आकर्षक झालें.

रात्रीं ९–३० वाजतां संमेलनांत अत्यंत गाजलेल्या कविसंमेलनास सुरवात झाली. या संमेलनांत प्रा. या. मु. पाठक, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, प्रा. राम डोके, श्री. वा रा. कान्त, श्री. कृ. मु. उजळंबकर, श्री. तु ना. काटकर, सौ. उषा लिमये, सौ. प्रमिला भागवत, श्री. वसू भगत, श्री वसंत सबनीस, श्री. तुळशीराम काजे, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, प्रा. पद्माकर डावरे, श्री. बाळ पुट्टेवार, श्री. दे. गो. लांडगे श्री. गंगाधर पानतावणे, श्री. रामानंद, श्री. निमजे, श्री. ना. गं. वझे, कु. दुर्गा कानगो, श्री वामन पाठक, तळोधी येथील श्री. करमरकर व चांदमिया, श्री. पारळकर, प्रा. बोरसे, श्री. कृष्णाजी दिवाणजी, वसंत खेर्डीकर, ह्यांनी भाग घेतला. ह्या कार्यक्रमांत तीन तास श्रोत्यांना नानाविध काव्यगुणांची भरपूर मेजवानी मिळाली. ह्या कार्यक्रमाला इतकी गर्दी लोटली होती की अखेरीस शामियान्याचे पडदे वर उचलून घ्यावे लागले. तळोधीसारख्या लहान गावांतहि उत्तम कवींची तसेंच रसिकांची उणीव नाही, हें ह्या कविसंमेलनाने दाखविलें.

सोमवार दि. १६–३–५९ ला कार्यक्रमांना सकाळीं ९ वाजतां 'आधुनिक मराठी नाटक' ह्या परिसंवादाने सुरवात झाली. ह्या परिसंवादांत खाडिलकरपूर्वकालीन नाटकांवर प्रा. भा. श्री. परांजपे, कोल्हटकर–खाडिलकर-गडकरी-वरेरकरकालीन नाटकांवर प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे व अत्रे–नाट्यमन्वंतरकालीन नाटकांवर श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांचीं अभ्यासपूर्ण व नवीन विचार व्यक्त करणारीं भाषणें झालीं व संमेलनाध्यक्षांनी ह्या परिसंवादाच्या श्रेष्ठ साहित्यिक दर्जाची मुक्तकंठाने स्तुति केली.

दुपारीं १२-१५ वाजतां कोशाध्यक्ष श्री. यादवराव पोशट्टीवार यांचे वतीनें सर्व प्रतिनिधींना थाटाची मेजवानी देण्यांत आली. श्री पोशट्टीवार यांनी दोन्ही दिवसांचा प्रतिनिधींचा भोजनाचा खर्च स्वतःकडे घेतल्यामुळे प्रतिनिधिशुल्क रु. तीन परत करण्याची स्वागत सरचिटणीस प्रा. गेडाम यांनी घोषणा केली. ह्याचवेळीं प्रतिनिधि शुल्काची सर्व रक्कम कै नाना जोग स्मारकासाठी देण्याचा निर्णय घेण्यांत आला. प्रतिनिधि शुल्क न घेतां संमेलन घडवून तळोधीने गेल्या कित्येक वर्षांतील संमेलनांवर ताण केली.

दुपारीं १०-३० वाजतां अनौपचारिकपणें परस्पर परिचयाचा व साहित्यचर्चेचा कार्यक्रम झाला. ह्याच वेळीं कांही कवींनी मिळून सहकारी पद्धतीने कविता रचण्याचा एक अभिनव प्रयोग केला. तळोधीपासून ८ मैलांवर असलेल्या निसर्गरम्य तलावाची कांही प्रतिनिधि दुपारीं सहलहि करून आले.

दुपारीं ५-३० वाजतां खुलें अधिवेशन सुरू होऊन त्यांत एकूण पंधरा ठराव एकमताने संमत करण्यांत आले. ह्या ठरावांची माहिती ह्याच अंकांत अन्यत्र दिली आहे. ) त्यानंतर समारोपाचा कार्यक्रम सुरू झाला. ह्यावेळीं प्रा. या. मु. पाठक श्री. गोविंदराव मेश्राम, प्रा. तु. वि. गेडाम, श्री. बाळासाहेब ढवळे, प्रा. श्री. गो. काशीकर व श्री. गाभे यांचीं आभारप्रदर्शक हृदयस्पर्शी भाषणें झालीं. शेवटीं शोभा कानडे यांनी 'वंदेमातरम्' म्हटलें.

रात्रीं ९ वाजतां सुप्रसिद्ध गायक प्रा. अ. के. कोगजे यांचे शास्त्रोक्त गायन झालें साथीला श्री. भजनी (तबला), श्री. कदम (पेटी) हे होते. गायनाचा कार्यक्रम अतिशयच रंगला व रात्रीं ३ वाजेपर्यंत चालला.

गायन संपतांच नागपूरला परत येणारांची खास बस तयार होती. अशा अपवेळीं देखील चहापाण्याशिवाय कोणीहि जाऊं नये असा स्वागताध्यक्ष श्री. गोविंदराव मेश्राम यांचा निरोप आला व स्वतःच्या घरीं सर्वांना चहापान देऊन त्यांनी आतिथ्यशीलतेचा आदर्श प्रकट केला व नंतरच सर्वांना निरोप दिला.

खेडेगावांत संमेलन भरविण्याचा विदर्भ साहित्य संघाने यंदा धाडशी प्रयत्न केला व तो अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. ग्रामीण जनता व साहित्यिक यांचा प्रत्यक्ष संबंध आणण्याची महत्त्वाची कामगिरी ह्या संमेलनाने केली आहे. तसेंच ग्रामीण जनतेंतहि उत्कृष्ट कवि, रसिक व साहित्य जाणणारे असतात हें ह्या संमेलनाने उत्कृष्टपणें सिद्ध केलें आहे.

हें संमेलन यशस्वी करण्याचें श्रेय संमेलनाध्यक्ष प्रा. या. मु. पाठक, स्वागताध्यक्ष श्री. गो. बी. मेश्राम, कार्याध्यक्ष श्री. राजेश्वरराव पोशट्टीवार, कोषाध्यक्ष श्री. यादवराव पोशट्टीवार, स्वागत सरचिटणीस प्रा. तु. वि. गेडाम, विदर्भांतील वार्ताहर, वृत्तपत्रें व वृत्तसंस्था, नागपूर नभोवाणी, विदर्भ संशोधन मंडळ, शारदाश्रम-यवतमाळ, केंद्र ग्रंथालय-नागपूर, माहिती विभाग-नागपूर, संमेलनाच्या कार्यक्रमांत भाग घेणारे सर्व साहित्यिक व कलावंत, प्रतिनिधि, स्वागतमंडळाचे अन्य कार्यकर्ते ( यांचीं नांवें युगवाणीच्या गेल्या अंकांत दिलीं आहेत. ) तळोधीची व साहित्यप्रेमी जनता यांना आहे. विदर्भ साहित्य संघ ह्या सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

---

विदर्भ साहित्य संघ

# २१ वें वार्षिक संमेलन, तळोधी

रविवार दिनांक १५ व १६ मार्च १९५९

## स्वागताध्यक्ष श्री. गोविंदराव मेश्राम यांचें

# स्वागतपर भाषण

मान्यवर संमेलनाध्यक्ष, साहित्यिक वृन्द, साहित्यप्रेमी बन्धु-भगिनींनो —

आज आपणा सर्वांचें मनःपूर्वक स्वागत करतांना स्वागतमंडळाला आणि मला अत्यंत आनंद होत आहे. आमच्या तळोधी गावाच्या दृष्टीनें आजचा हा दिवस अत्यंत भाग्याचा आहे. ज्यावेळीं मी मी आपलें स्वागत करीत आहें तो क्षण या टापूंतील इतिहासांत अत्यंत मोलाचा व भाग्यशाली म्हणून सुवर्णाक्षरांनी अंकित केला जाईल यांत संदेह नाही. वस्तुतः ऐतिहासिक, औद्योगिक किंवा राजकीय कोणतेंहि महत्त्व नसणाऱ्या या छोट्याशा गावीं विदर्भ साहित्य साहित्य संघाचें अधिवेशन भरविण्याच्या आमच्या निमंत्रणाचा खेड्यांतील मर्यादा, अडचणी व गैरसोयी यांचा विचार न करतां सहर्ष स्वीकार केला गेला यावद्दल मी स्वागतमंडळ व येथील नागरिक यांचेतर्फे विदर्भ साहित्य संघचालकांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतों.

### वैभवशाली गोंडवनाचा वाङमयीन दर्जा

गेल्या ९ वर्षांपूर्वी म्हणजे १९५० सालीं मराठी साहित्यशास्त्रकार डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली चन्द्रपूर-चांदा-येथे विदर्भ साहित्य संघाचें अधिवेशन भरलें होतें आणि आता सामान्यतः चांदा जिल्ह्याच्या केन्द्रविन्दुस्थानीं-तळोधी या गावीं सरस्वतीच्या वीणाझंकारांनी भारावलेलें थोर कवि प्रा. या. मु. पाठक यांच्या अध्यक्षतेखालीं हें अधिवेशन साजरें होत आहे याचा आम्हाला मोठा अभिमान वाटतो. तळोधी हें गाव तसें कांही विशेषत्वाने विनटलेलें नसलें तरी आमचा चन्द्रपूर जिल्हा मात्र ऐतिहासिक, औद्योगिक, राजकीय, वाङ्मयीन व शिल्प-नृत्यकला आदि विविध क्षेत्रांत कांही कमी प्रतीचा नाही. पराक्रमी, दानशूर व कलाप्रिय गोंड राजांचें अधिराज्य असलेलें हें वैभवशाली गोण्डवन नांवाचे विख्यात संशोधक श्री. राजूरकर यांचा 'चन्द्रपूरचा इतिहास'



अनुक्रमणिका

हा मौलिक ग्रंथ गोण्डवनांतील साहित्यसंशोधन, राजकारण व कला आदींची संपन्नता सिद्ध करायला साक्षीला असल्यावर मला त्यासंबंधी कांही सांगण्याची आवश्यकताच नाही. श्री. राजूरकरांप्रमाणेच श्री. काकडे वकील, प्रो. तु. वि. गेडाम, साहित्यभूषण श्री. तु. ना. काटकर, श्री. वि. वा. जोशी, कु. सुगंधा शेंडे, श्री. वा. ना. विगम प्रभृति संशोधक, साहित्यिक व कवि यांचा चन्द्रपूरच्या परिसरांतील साहित्यप्रांगणांतील दर्जा सर्वश्रुतच आहे.

## साहित्यिकांच्या आगमनाने गावांत नवचैतन्य

अशा या श्रेष्ठ गोंडवनांतील चन्द्रपूर जिल्ह्यांत आमचें हें छोटेंसें तळोधी गाव आहे. आपण बघतच आहांत तें. संशोधक प्रा. गेडाम याच गावचे रहिवासी. गेल्या वर्षी त्यांनी विदर्भ साहित्य संघाचें अधिवेशन घेण्याचा प्रश्न काढला. एवढ्या छोटया गावीं कसलीहि परिस्थिति उपलब्ध नसतांना अधिवेशन कसें भरवितां येईल याचा गावांतील प्रमुखांशी विचारविनिमय केला. प्रा. गेडाम यांनी विशेष भर दिला आणि आम्ही अधिवेशनाचें वि. सा. संघाला निमंत्रण दिलें खरें पण पुढे काय असा प्रश्न उभा राहिला. आम्ही वि. सा. संघशाखा स्थापन केली. आमच्या हाकेला ओ देऊन ख्यातनाम साहित्यिक व पत्रपंडित श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे दिनांक ६ नोव्हेंबर १९५८ रोजी शाखेच्या उद्‌घाटनासाठी आले. त्यांचे बरोबर संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर हेहि आल्याने गावांत नवचैतन्य निर्माण झालें. त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केलें. आमचा उत्साह द्विगुणित झाला. चित्तवृत्ति उल्हसित होऊन आम्ही अधिवेशनाच्या तयारीला लागलों. एक गोष्ट मला येथे स्पष्ट केली पाहिजे. ती म्हणजे शाखेच्या उद्‌घाटनासाठी जेव्हा साहित्यिक पाहुणे मंडळी आली होती तेव्हा त्यांना खरोखरीच जाडीभरडी भाकरी, लुडकोचा भात व कांदा चटणी यांवरच समाधान मानावें लागलें. आमच्या खेडेगावांत हेंच भोजन काय तें मिळणार ! त्यांना शहरांतील नाजुक तूपचपातीचें व खमंग पक्वान्नांचें प्रसन्नतेने ढेकर देणारें भोजन कुठून मिळणार ? पण आमच्या साहित्यिक पाहुणे मंडळीने चटणी भाकर खाऊन कोकणी पद्धतीचें भोजन अशी प्रशस्ती दिली व अन्नदेवतेचा गौरव केला ! या अधिवेशनांत अर्थातच असेंच साधें भोजन आपल्याला मिळणार असल्याने, तसेच अनेक उणिवा जाणवणार असल्याने आपण सुहृद् मंडळी उणिवांकडे दुर्लक्ष करून साध्या, चटणी भाकरीच्या ग्रामभोजनामुळे साध्याच ढेकराने उदारपणे समाधान मानून घ्याल अशी प्रथमतःच विनंती करतों.

## सम्मेलनाच्या साधेपणांत खेडुतांचा आत्मा

या सम्मेलनाला आणखी दुसऱ्या दृष्टीने साधेपणाची नवलाई आलेली आपल्याला आढळेल ! एक तर हें सम्मेलन ग्रामीण वातावरणांत अगदी छोटया गावीं भरलें गेलें आहे. सहा वर्षांपूर्वी राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराजांच्या मोझरी येथे भरलेल्या सम्मेलनाचा अपवाद सोडला तर मुंबई राज्यांत खेडेगावीं भरणारें हें पहिलेंच सम्मेलन आहे, आणि दुसरें म्हणजे उद्‌घाटनाशिवाय भरणारें देखील हें पहिलेंच सम्मेलन होय. परंपरेला धरून एखादा वडा उद्‌घाटक बोलावून आणि मनोरंजनाचे भरगच्च कार्यक्रम ठेवून सम्मेलनाचा गाजावाजा करण्यास मात्र आम्ही असमर्थ ठरलों. त्यामुळे बादशाही थाटाचें सम्मेलन भरलें गेलें नसल्याने तें आपणाला खटकणार याची आम्हाला जाणीव आहे. पण या सम्मेलनाच्या साधेपणांत आम्हा खेडुतांचा आत्मा सामावलेला आहे ही गोष्ट मात्र आपण ध्यानीं घ्यावी अशी विनंती आहे.

अनुक्रमणिका

## परस्पर कल्याणाची भावना वृद्धिगत व्हावी

आपणासारख्या विचारवंतांपुढे माझ्यासारख्या अनधिकार व्यक्तीने कांही सांगणें अथवा सुचविणें धाष्टर्याचें होईल खरें, पण त्याबरोबर आमच्यासारख्या झाडीपट्टीस्थानीं साहित्याच्या या व्यासपीठावरून साध्याच कां होईनात आपल्या भावना मनमोकळेपणाने व्यक्त केल्या नाहीत तर आम्ही आपल्या कर्तव्याला चुकल्यासारखेंहि होईल. नागपूरपासून भंडारा-चांदा जिल्ह्यांच्या टापूला झाडीपट्टीचा भाग समजण्यांत येतो. वनविभागामुळे कदाचित असा उल्लेख होत असावा ! आपल्या नागपूरचे थोर संशोधक क. नीळकंठराव उर्फ बापूसाहेब भवाळकर तर 'झाडीपट्टीस्थ' या टोपण नांवाने बरेंच लिखाण करीत असत. झाडीपट्टींतील टापू अन्नधान्याने व वनपदार्थांनी संपन्न आहे. या टापूंतील जनता साधी, भोळी व सतत राबणारी असून, ती दुसऱ्यांना कांही देईल पण स्वतःसाठी मात्र कांही अपेक्षा बाळगणार नाही. इतरांचें कल्याण साधणें हाच तिचा धर्म मी एवढ्याचसाठी हें सांगतों की परस्पर कल्याणाची भावना आपल्या राष्ट्रांत वृद्धिगत होणें आज आवश्यक आहे.

## खेड्यांत लोण पोचविण्याचें वि. सा. संघाचें कल्याणकारी धोरण

हें संमेलन एका खेड्यांत भरविण्याला सम्मति देण्यांत आली, याचा अर्थ विदर्भ साहित्य संघाने आपल्या कार्याचें लोण आता केवळ शहरी जीवनापुरतेंच मर्यादित न ठेवतां तें खेड्यापाड्यांतहि पोचविण्याचें कल्याणकारी धोरण अंगीकृत केलें आहे असें आम्ही समजतों. हें संमेलन त्याचें प्रतीक होय खेड्यांत भरणाऱ्या अशा संमेलनाच्या विविध कार्यक्रमाद्वारें केवळ एका खेड्यालाच नव्हे तर आजूबाजूच्या अनेक खेड्यांना शैक्षणिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन उत्तेजन तर मिळतेंच पण शिवाय त्यामुळे ग्रामीण जनतेवर उत्तम संस्कार घडून ती उन्नत होण्यास मोठी मदत होते हें कांही कमी मोलाचें कार्य नाही.

## समाजांत साहित्यिकांचा खास वर्ग गणण्यांत यावा

साहित्यिक वर्ग समाजांतील खास (Privileged) वर्ग म्हणून समजण्यांत यावा असें माझें मत आहे. त्याच्या जीवनासाठी सुखसोयीची व्यवस्थाहि पाहिजे. पण दुर्दैवाने आपल्या देशांत तशी परिस्थिति नाही वस्तुतः साहित्यिक हा शब्दसृष्टीचा परमेश्वर. आपल्या तेजस्वी लेखणीने तो प्रतिविश्व निर्माण करण्याचें सामर्थ्य राखतो. तो द्रव्याने समृद्ध नसेल पण शब्दसंपत्तीने त्याचें अंतःकरण कोणाहि धनवानापेक्षा अधिक संपन्न व इतरांचीं मनें जिंकण्याइतकें खचितच श्रेष्ठ असतें. प्राचीन काळापासून आजच्या या यांत्रिक युगांतहि त्याला मान देणें भाग पडतें. कोणी समशेरबहाद्दर असो, कोणी कुबेर असो वा कोणी राजधुरंधर असो त्याला साहित्यिकाची बूज राखावी लागते. राष्ट्राची उत्तम घडण घडविण्यास व त्याचा आदर्श दर्जा प्रस्थापित करण्यास अभिजात साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकांची व समाजांत त्याचा खास वर्ग म्हणून गणण्याची खरोखरीच आवश्यकता आहे.

## खेड्यापाड्यांना प्रेरक ठरणाऱ्या साहित्याची गरज

ग्रामीण जीवनाचें व तेथील परिस्थितीचें यथायोग्य दर्शन प्रकर्षाने घडेल व तें खेड्यापाड्यांना प्रेरक व मार्गदर्शन करणारें ठरेल अशा जिवंत साहित्याची आज नितांत गरज आहे. मला क्षमा कराल, खेड्यांतील लोकांकडे व जीवनाकडे तुच्छतेने पहाण्याची वृत्ति शहरी लोकांत आढळून

येते. ही वृत्ति भारताच्या सर्वांगीण विकासाच्या मार्गातील मोठी धोंड आहे. त्याचा परिणाम असा होतो की खेड्यांतील तरुण सुशिक्षित झाला की तो आपल्याच खेड्याला पारखा ठरतो. शहरांतील आकर्षणामुळे व ख्यालीखुशालीच्या जीवनामुळे त्याला खेड्यांत परत यावेसें वाटत नाही. अशा सगळ्या समस्यांचें निराकरण करण्यास साहित्यिक मोलाची मदत करूं शकतात असें मला वाटतें.

## आम्हाला आमचें साहित्य वाटावें इतकें तें वास्तव हवें

एक काळ असा होता की मध्यमवर्ग किंवा उच्च वर्ग यांचेंच जीवन आपल्या साहित्यांत चित्रित करण्यास साहित्यिकांना धन्यता वाटत असे. खेड्यांतील कृषीवल जीवन व परिस्थिति आपल्या साहित्याचा परिणामकारक विषय ठरूं शकतो ही कल्पना त्यांना पटत नसे म्हणा वा ते त्याबाबत उदासीन होते म्हणा. परंतु नाही म्हणायला ही वृत्ति या परिवर्तनाच्या काळांत बदलत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. पण त्याबरोबरच मला एक गोष्ट स्वच्छपणें सांगितली पाहिजे. आणि ती म्हणजे कोणत्याहि साहित्याच्या निर्मितीसाठी साहित्यिकाला तळमळ व व्यासंगवृत्तीबरोबर प्रखर अनुभूति असायला हवी. मजेखातर चारआठ दिवसांसाठी साहित्यिकांनी खेड्यांत यावें व वरपांगी अवलोकनाच्या तुटपुंज्या भांडवलावर ग्रामीण जीवनावर कांही तरी लिहावें असें साहित्य कितपत सरस राहूं शकेल याची आपणच कल्पना केलेली बरी. त्या साहित्यिकांच्या लिखाणांत भाषेचा फुलोरा व लालित्य भरपूर असेल, पण त्यांतील उथळपणा व कृत्रिमता तीव्रतेने जाणवल्याशिवाय राहत नाही. आम्हाला तर आमचें साहित्य आहे, आमच्यासाठी तें कष्टाने व तळमळीने निर्माण केलें गेलें आहे, इतकें तें वास्तव आणि उठावदार असलें पाहिजे.

## साहित्यद्वारें शहर व खेडें यांत एकात्मता निर्माण करा

आपल्या विदर्भापुरताच विचार करावयाचा झाला तर ग्रामीण जीवनावरील वास्तवदर्शी साहित्य अगदी थोडचा प्रमाणांत असल्याचें आढळुन येतें. आत्मीयतेच्या व अनुभूतीच्या दृष्टीने विशेषतः विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या 'सावली', 'काजळीरात्र', 'तांबडा दगड!' या कथाकादंबऱ्यांचा, तसेंच यवतमाळ येथील श्री. शरच्चन्द्र टोंगो यांची 'लकेरी' व श्री. गो. नी. दांडेकर यांची 'पूर्णामाईचीं लेंकरें', अशा कादंबऱ्यांचा उल्लेख करतां येईल. त्या व्यतिरिक्त ग्रामीण जीवनाशीं समरस होऊन निर्माण झालेली वाङ्मयनिर्मिति कितीशी आहे? आपल्या स्वतंत्र भारताचें लक्ष खेडीं उन्नत व विकसित करण्याकडे केन्द्रित झालें आहे. शहर व खेडें यांचा सर्व दृष्टींनी परस्पर संबंध दृढ व्हावा व त्यांत एकात्मतेची भावना निर्माण व्हावी यांवर विशेष भर दिला जात आहे. तेव्हा या बाबतींत साहित्यिकांनी व विशेषतः विदर्भ साहित्य संघासारख्या श्रेष्ठ संस्थेने दक्षतेने लक्ष पुरवून खेड्यांतील विविध प्रश्नांवर जनतेला सहज सुलभतेने उमगूं शकेल व मनोरंजनाबरोबर बोध आणि ज्ञान प्राप्त होऊं शकेल अशा साहित्याचें लेण खेड्यापाड्यांपर्यंत पोचविण्याचें कल्याणप्रद कार्य करावें असें मी या खेड्यांतील साहित्याच्या व्यासपीठावरून विनविलें तर तें वावगें ठरणार नाही, असा विश्वास वाटतो.

## महानुभाव वाङ्मयाचा सुबोध भाषेंत प्रसार व्हावा

आमच्या या चांदा जिल्ह्यांत महानुभाव पंथीयांची फार मोठी संख्या आहे. या विभागांत महानुभाव वाङ्मयाचें संशोधन व लेखनहि विशेष झालें आहे. आपल्या विदर्भांत तर महानुभाव वाङ्मयासंबंधी कै. हरिभाऊ नेने, डॉ. य. खु. देशपांडे, प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांच्यासारख्या

अनुक्रमणिका

नामवंत संशोधकांनी फार मोलाचें कार्य केलें आहे. हें वाङ्मयहि इतकें अमाप व उपयुक्त आहे की त्यावर अधिकाधिक ग्रंथसंपत्ति निर्माण करतां येईल. या बाबतींत प्रा. सुरेन्द्र डोळके, प्रा. तु. वि. गेडाम प्रभृति सारख्या नव्या दमाच्या कष्टाळू व चिकित्सक संशोधकांचे प्रयत्न स्पृहणीय आहेत. महानुभाव वाङ्मयाचा लोकजीवनाशीं व तें उदात्त आणि उच्च घडविण्याशीं संबंध असल्याने त्याचा सुबोध भाषेंत प्रसार होण्याचीहि नितांत आवश्यकता आहे.

## अलिखित अक्षरवाङ्मयाकडे लक्ष द्या

लोकसाहित्याबद्दल मला थोडें सांगितलें पाहिजे. लोकसाहित्य संपदेचे धनी श्री. ना. रा. शेंडे हे "लोकसाहित्य हें मोलाचें धन आहे. त्यांत आमच्या प्राचीन काळापासूनच्या धवल संस्कृतीचें, रीतीरिवाजाचें, धर्म व कर्तव्याचें स्वच्छ प्रतिबिम्ब उमटलें आहे. जुनी पिढी जसजसी नामशेष होत चालली तसतसें हें मौलिक धनहि लोपत चाललें. आणि म्हणून या धनाचें अधिकाधिक संशोधन, जतन व संवर्धन झालें पाहिजे" असें आग्रहाने प्रतिपादन करतात. मलासुद्धा याच दृष्टीने आपणा साहित्यिकांचें व संशोधकांचें लक्ष या अलिखित अक्षरवाङ्मयाकडे विनम्रतेने वेधावयाचें आहे. लोकसाहित्याच्या क्षेत्रांत प्रा. वा. कृ. चोरघडे, कै. शांताबाई माडखोलकर, श्री. पां. श्रा. गोरे, श्री. ना. रा. शेंडे, श्री. वि. वा. जोशी, श्री. ना. ना. हूड प्रभृतींचें कार्य आपल्या या प्रदेशांत विशेष आहे. आमचा चांदा जिल्हाच लक्षांत घेतला तर तेथील विविध प्रकारच्या लोकसाहित्याची अमाप सामग्री आपल्याला केवळ संगृहितच करतां येणार नाही तर त्यावर अनेक पुस्तकेंहि निर्माण करतां येऊन, आजच्या व उद्याच्या पिढीला त्याद्वारें यथार्थ दर्शन घडवितां येईल.

## खेड्यांतील सम्मेलनाचा उद्देश सफल व्हावा

मी कांही साहित्यिक नाही. कृषीवल जीवन जगणारा अगदी साधा माणूस आहे. त्यामुळे अधिकार वाणीने आपल्यासारख्या पंडितांना व साहित्यिकांना कांही सांगण्याची माझी पात्रता नाही, प्रज्ञा नाही. तरी आपला एक बंधु या नात्याने मी अल्पस्वल्पसे जे विचार व्यक्त केले, ज्या भावना व्यक्त केल्या त्यांचा विचार करून ग्रामोन्नतीच्या दृष्टीने–एकात्मतेच्या भावनेने वास्तवदर्शी साहित्य निर्माण केलें, व त्याचें लोण खेड्यापाड्यापर्यंत पोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला गेला, तर या खेड्यांत भरविण्यांत आलेल्या संमेलनाचा उद्देश खचित सफल झाल्याचें श्रेय पदरीं पडेल यांत शंका नाही.

## सम्मेलनाध्यक्षांचा गौरव व क्षमायाचना

आज आमच्या सुदैवाने रविकिरणमालिकेंतील विहंगमवृन्द विख्यात कवि, कादंबरीकार व संपादक प्रा. यादव मुकुंद पाठक संमेलनाध्यक्ष लाभले. त्यांच्या उच्च घराण्याचा या टापूशी ऋणानुबंध निगडित आहे. तेव्हा आमचा ज्ञानसंपन्न थोर बंधु आज आमच्या घरीं आला आहे याचा हर्ष आम्हांला होणें स्वाभाविक आहे. मी त्यांचें व आपणा सर्वांचें पुनः एकदा स्वागत करून आणि खेड्यांतील या संमेलनांत कांही उणिवा आढळल्यास त्याबद्दल क्षमायाचना करून मी माझें हें अल्पसें स्वागतपर भाषण संपवितों.

– जय हिंद –

अनुक्रमणिका

# विदर्भ साहित्य संघ

# २१ वें वार्षिक संमेलन, तळोधी

दिनांक १५ व १६ मार्च १९५९

## प्रा. यादव मुकुंद पाठक यांचें

## *अध्यक्षीय भाषण*

मराठी रसवंतींत रंगणाऱ्या रसिकांनो,

विदर्भ साहित्य संमेलनाच्या एकविसाव्या अधिवेशनाचें अध्यक्षपद देऊन आपण माझा जो गौरव करीत आहांत, त्याबद्दल मी आपला ऋणाईत आहें. आपल्या रक्ताच्या बिंदूबिंदूंत सळाळणाऱ्या आध्यात्मिक संस्कृतीप्रमाणे, माझ्यासारख्या एका जीवात्म्याच्या जन्मोजन्मींच्या प्रदीर्घ प्रवासांत या घटनेला कितपत महत्त्वाचें स्थान आहे हें सांगणें कठीण आहे. तथापि या क्षुद्र बद्धात्म्याच्या अनंत काळाच्या यात्रेंत, हें मानवी रूप हा जर शेवटचा टप्पा ठरण्याचें भाग्य त्याला लाभायचें असेल, तर आपण दिलेल्या या बहुमानाने, त्याच्यांतील प्रतिभेच्या सागरावर स्फूर्तीच्या लाटांचें उधान भरतें येण्याचा संभव आपण वाढवला आहे हें निश्चित !

विदर्भ साहित्य संघाला छत्तिसावें वर्ष चालू असलें तरी संमेलन मात्र एकविसाव्या वर्षांतच पदार्पण करीत आहे. कायदेशीर रीतीने संमेलन वयांत आलेलें असल्यामुळे त्याच्या मताला आता अधिकारवाणीचें रूप प्राप्त व्हावयाला हरकत नाही. या महत्तम व्यासपीठावरून संमेलनाचें शैशवांतील लालनपालन करायला—लोकमान्य टिळकांचे बहिश्चर प्राण दादासाहेब खापर्डे, लोकमान्यांचा 'केसरी' गर्जत ठेऊन साहित्यसम्राटपद मिळविणारे तात्यासाहेब केळकर, महाभारताचार्य चिं. वि. वैद्य, मराठीच्या माहेरघरीं मराठीच्या उज्ज्वल परंपरेची प्रतिष्ठा वाढविणारे न्यायमूर्ति

अनुक्रमणिका

केशवराव कोरटकर, नाट्यांतील नवयुगप्रवर्तक विनोदाचार्य तात्यासाहेब कोल्हटकर— अशा मातब्बर मंडळींची माया पाखर लाभली, हें आपण जाणतां. संमेलनाच्या बाल्या-वस्थेंत त्याचें लडिवाळ कौतुक करून त्याच्या स्नायूंना बळकटी आणण्याचें वर्धिष्णु कार्य प्रा. न. र. फाटक, गुरुवर्य श्री. ना. बनहट्टी, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. ग. त्र्यं माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे, सौ. कुसुमावती देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. य. खु. देशपांडे आदि नामवंत साहित्यसेवकांनी केलें, हेंहि आपण जाणतां. गतवर्षी या वीस वर्षांच्या सदृढ कर्तृत्वसंपन्न युवकाचे पाठिराखे तर मराठीच्या काव्यप्रांतांतील नवयुगाचे प्रणेते आत्माराम रावजी देशपांडे उर्फ कवि अनिल होते, हें आपणांस ठाऊक आहे. अनिल कवींना त्यानंतर महाराष्ट्र–साहित्य संमेलनाच्या चाळिसाव्या अधिवेशनाचें अध्यक्षपद त्याच वर्षी लाभलें, यावरून आपली निवड करण्याची पात्रता किती चोखंदळ आहे हें सांगितलेंच पाहिजे असें नाही. अशी अचूक पारख करण्यांत निष्णात असलेल्या आपणांसारख्या तज्ज्ञांनी, या वर्षी एका माझ्यासारख्या कवीचीच पुन्हा निवड करावी हा योगायोग विलक्षण आहे. जिवंतपणीं व्युत्पन्न पंडितांना प्रतिष्ठा लाभावी, हेंच आंधळ्या परंपरेला रीतसर वाटतें. तसें म्हटलें तर कवि म्हणजेहि ज्ञानीच. पण काव्यनिर्मिति करणाऱ्या प्रतिभावंतांचा मरणोत्तरच लौकिक वाढावा, अशी उभ्या जगाच्या इतिहासाची साक्ष असतांना, अलीकडे कवींचाहि आदर त्यांच्या जिवंतपणींच आपण करायला लागला आहांत, यामुळे उज्ज्वल मराठी साहित्य परंपरेला प्रतिभेच्या नवनवोन्मेषाचा बहर येईल हें काय सांगावयास पाहिजे ?

खरेंच, एवढा भाग्याचा काळ मराठी कवींनी कधी पाहिला असेल काय ? आज कवींची आकाशवाणी त्यांच्याच मुखांतून उभ्या मराठी मुलखास ऐकावयास मिळते. राज्ययंत्रणेच्या महोत्सवांतहि कविसंमेलनांतून त्यांच्या प्रतिभेचे विविध विलास ऐकावयास सापडतात. गेल्या तपांतील माझ्या शेंकडो कवितांच्या प्रकाशनाचें प्रमुख साधन 'नभोवाणी'चीं कविसंमेलनें आणि काव्यदर्शनेंच आहेत, यांत शंका नाही. ग्रंथरूपानें या कविता अजून प्रकाशित झाल्या नसल्यामुळे, ते वाऱ्यावरचे बोल आपणांस क्षणभर आनंद देऊन विरून जातात. आपणांस मला हें पद देण्याची बुद्धि झाली, याचें थोडें बहुत श्रेय नभोवाणीस देणें रास्त होईल.

हा योगायोग चंद्रपूरच्या परिसरांत यावा ही घटनाहि मला मोठी सूचक वाटते. चंद्रपूर हें माझें जन्मस्थान. न्यायाधीश या नात्यानें माझ्या परमपूज्य वडिलांचें तेथील एका सरकारी बंगल्यांत वास्तव्य असतांनाच मी मृत्युलोकांत प्रवेश केला. माझ्या आईनें तेथील जागृत महांकाळीचीच ओटी माझ्या निमित्तानें प्रथम भरलेली असणार ! त्या चंद्रपूरच्या देवतेनेंच तर हा योगायोग घडवून आणला नसेल ना ? तें कांही का असे ना. या मंगल प्रसंगीं माझ्या भावुक मनापुढे ते महांकालीचे विशाल नेत्र उभे आहेत आणि

अनुक्रमणिका

तिच्याच कृपाप्रसादाने मी बोलतों आहे हा प्रसन्न भाव मला धैर्य देत आहे. माझ्या आजोबांचे आजोबा भोसल्यांच्या राज्यांत इकडे चंद्रपुरास कमाविसदार होते. त्यांचें नांव 'यादवराव' असल्यामुळे, येथे माझ्या जन्माचे वेळीं, जिल्हा न्यायाधीश असलेल्या माझ्या वडिलांना तेंच नांव माझ्या पिंडाला देऊन, त्यांची स्मृति जागृत करावीशी वाटली. आमच्या घराण्यांतील मी दुसरा 'यादवराव' आहें. या 'दुसऱ्याला' सद्बुद्धि व्हावी आणि त्याचा 'दुसरा बाजीराव' होऊं नये, म्हणून माझ्या स्वनामधारी पूर्वजाचा आत्मा येथे विहार करीत असावा ही भावना मला आज धीर देते. याच वेळीं माझ्या-करितां अनेक खस्ता जिने खाल्या, ती बावीस वर्षांचा स्वर्गतुल्य सहवास देणारी माझी सहचारिणीहि येथे निराकार अवस्थेंत उपस्थित असेल व वडिलांचाहि दुर्दैवाने न दिसणारा कौतुकाच्या आशीर्वादाचा हात मला कुरवाळीत असेल, असा माझा भोळा भाव आहे. माझे ज्येष्ठ बंधु, माझी पत्नी, माझीं मुलें आणि असंख्य सुहृद् माझा उत्साह शतगुणित करायला आज माझ्या भोवतीं वावरत आहेत, यानेहि माझा धिवसा वाढला आहे.

तथापि या मर्त्य पिंडाच्या माध्यमांतून ज्या कोणा अमूर्त शक्तीने 'शशिमोहन' या काव्यकृतीची निर्मिती केली, त्या अज्ञात शक्तीला मी प्रथम अभिवादन करतों. 'शशिमोहन'कार म्हणूनच आपणाला आज माझा हा गौरव करावासा वाटला असाच कोणीहि कयास करील. इंग्रजी दुसरींत असतांनाच मला इंग्रज महाकवि 'मिल्टन'च्या चरित्रापासून स्फूर्ति मिळाली. महाविद्यालयीन काळांतच त्यालाहि कवि-कीर्तीचा लाभ झाला. पुढे चाळीस वर्षें त्याला जीवनाच्या धकाधकीच्या मामल्यांत मोठमोठ्या कार्यांच्या धुरा आपल्या स्कंधावर पेलाव्या लागल्या. इतर क्षेत्रांतील अविश्रांत परिश्रमाने त्याला आंधळेपण आलें आणि त्याच्या 'पॅरेडाइस लॉस्ट' या अमर महाकाव्याचा प्रकाशझोत, त्या अंधत्वाच्या अंधारांत त्याने जगावर फेकला. चाळीस वर्षांच्या मधल्या प्रदीर्घ कालांत इंग्लंड मिल्टनला कवि म्हणून विसरूनहि गेलें होतें ! 'शशिमोहन' नंतर बत्तीस वर्षें झालीं तरी आपण माझी आठवण ठेवलीत. एका काव्याच्या कीर्तीवर आपणाला बत्तीस वर्षें माझें स्मरण राहिलें, हे आपले उपकार मी कसे विसरूं ? पण पुढे मागे मजकडून एखादें महाकाव्य लिहिलें जावें, अशी जर नियतीची योजनाच असेल तर त्याकरिता मला मिल्टनसारखें आंधळेपण यावें, असें बरीक मला वाटत नाही !

महाकाव्याची निर्मिति अलीकडे कां होत नाही, अशी चर्चा वामन मल्हार जोशांपासून आजतागायत अधूनमधून चालू आहे. मराठी साहित्याच्या सातशें वर्षांच्या इतिहासांत विवेकसिंधु, भावार्थदीपिका, एकनाथी भागवत, मुक्तेश्वरी व मोरोपंती महाभारत आणि श्रीधरांचें 'रामविजय' आणि 'हरिविजय' इत्यादि सातेकच महाकाव्यें

निर्माण झालीं ना ? याचा अर्थ हाच शतकांतून एखादेंच प्रभावी महाकाव्य जन्मास येतें. गद्याच्या अफाट विस्तारामुळे अगर श्रद्धाशून्य युगांतील मतांमतांच्या गलबल्यामुळे हा काळ महाकाव्याला अनुकूल नाही हें निदान चूक आहे. 'मिल्टन'च्या काळीं मिल्टन स्वतःच एक शैलीकार राजकीय गद्यलेखक होता, तरी त्याने आपलें सर्वस्व अखेरीस महाकाव्य निर्मितीसाठी पणास लावलेंच ना ? १९३६ सालींच मी महात्मा गांधींवर एक महाकाव्य लिहायला प्रारंभ केला होता. सेवाग्रामच्या प्रभावळींत आचार्य काका कालेलकरांसारख्यांच्या सान्निध्याने ही किमया घडली होती. 'महाकाव्य निर्मिती 'च्या चर्चेसंबंधी त्यांतील कांही ओळी येथे उद्धृत केल्यास माझी धारणा आपल्या लक्षांत येईल:—

'पद्याचा काळ तो गेला, आता हें गद्य राहिलें,
यासाठी सत्य जें तेंही हवें शोधून काढलें.
सुलभोद्गम गद्याचा परी अंत तसा क्षणीं
प्रयासोद्गम पद्याचा परि तें दीर्घायुलक्षणीं
सुदैवें चालते माझी बुद्धि ही काव्यलेखनीं
वेगाने धावते माझी तैशी सौभाग्यलेखणी.'

महाकाव्यरचनेला अनुकूल मनोवृत्ति असलेले प्रतिभाशाली कवि, ब्रह्मांडाच्या घडामोडी करणाऱ्या विराट आणि अज्ञात शक्तीच्या हातांतील दीर्घकाळ बाहुलें बनूनच, महाकाव्याची रचना अविश्रांततेने करून जातात, अशीच इतिहासाची साक्ष आहे. आपल्या डोळ्यां-देखतच केरळच्या महाकवि वल्लतोल् याने मलयालम् भाषेला अलौकिक महाकाव्यांचीं लेणीं चढवलींच ना ? केरळच्या सर्व थरांच्या लोकांना—कामकरी मजूरांनासुद्धा—त्याचीं महाकाव्यें तोंडपाठ येतात. ही महाकाव्यासंबंधीची आजची अद्भुत अभिरुचि कशाची निदर्शक आहे ? केरळांत गद्यवाङमयाची निपज कांही कमी होत नाही. म्हणूनच त्या महाकवीच्या या विराट सामर्थ्याचें यथोचित कौतुक स्वतंत्र भारत सरकारला करावेसें वाटलें आणि वल्लतोल्ला पंधरा हजार रुपयांचें पारितोषिक देऊन राज्यलक्ष्मीने त्याच्या गळ्यांत विजयाची माळ घातली. आपल्या मराठीच्या मंगल प्रांगणांतहि महाकाव्य-निर्मितीचे पैंजण वाजूं लागले आहेत हें माझेंच केवळ दिवास्वप्न नाही. श्री. बा. भ. बोरकर तिकडे याच उद्योगांत आहेत याचें स्मरण आपणास देण्याची गरज आहे काय ?

गुंडी दावली की दिवा अगर नळी प्रकाशावी, त्याप्रमाणेच स्फूर्ति आली की कविता लिहून काढावी, हें, अलीकडील इंग्रजी वळण आत्मसात केल्यानंतरच्या स्फुट कवितांच्या बाबतच, शक्य आहे. 'शशिमोहन'सारखें खंडकाव्यहि स्फूर्तीच्या धगींत लिहिलें जाऊं शकतें, हा स्वानुभव मी पूर्वींच सांगितला आहे. पण महाकाव्याची रचना हें प्रतिभेच्या एक दोन तपाच्या तरलावस्थेचें देणें आहे. पंचज्ञानेंद्रियें आणि मन यांची

अनुक्रमणिका

अशी संवेदनक्षम अवस्था वर्षानुवर्षे टिकावी, तिला प्रज्ञेच्या व्यासंगपूर्ण चौकस अभ्यासू वृत्तीची जोड असावी आणि भूमिगत झरे अखंड उद्रेकाने फेसाळत उसळावे त्याप्रमाणे अभिव्यक्तीच्या सहजतेचा मनोज्ञ अवखळ प्रवाह एकसारखा चालू रहावा, इत्यादि गोष्टींचा संकर एखाद्या कवीच्या ठिकाणीं दैवी योजनेनुरूप झाला तरच महाकाव्याची अलौकिक निर्मिति शक्य होणार ! स्वतंत्र भारतांत आज विराट योजनापूर्तीचा नेत्रदीपक उद्रेक चालू असतांना जर आधुनिक प्रचंड तीर्थस्थानें निर्माण होऊं शकतात; विज्ञानाची प्रचंड झेप जर अवकाशांत चेंडूप्रमाणे उपग्रहगोल फेकूं शकते आणि चंद्रमंगळावर शीघ्र गतीने प्रवास चालू होऊं शकण्याचीं अद्‌भुत स्वप्नें जर आज दिसूं शकतात; तर काव्य-क्षेत्रांतच विराट काव्यरचनेला आजचा काळ अनुकूल नाही असें कां म्हणावें ?

विज्ञानयुगांत काव्याला ओहोटी लागेल हें मेकॉले-चिपळूणकर-प्रणीत निदान आज वांझ ठरलें आहे. विज्ञानाइतकाच काव्यकलेलाहि नुसता बहर आलेला आहे. हें विधान करतांना माझी दृष्टि विश्ववाङ्मयाच्या व्यापक भूमिकेवर खिळली आहे, हें लक्षांत असावें. विज्ञानाच्या उपासनेच्या गेल्या शतकांत काव्याचीहि जोपासना मानवतेने जिव्हाळयाने केली, हें दिसून येईल. विज्ञान पंचेन्द्रियांच्या साहाय्याने वस्तूंचें पृथःकरण करून सिद्धांत प्रस्थापित करते. मागचे सिद्धांत चुकीचे ठरवून नवें दर्शन घडवीत विज्ञानाची प्रगति होत असते. आजचे विज्ञानाचे सिद्धांत उद्या फेकले जातात. कलेचें भाग्य कांही विशेष आहे. कुठलीहि कलाकृति कधीच शिळी होत नाही, कधीच टाकाऊ ठरत नाही. कलाकृतीला मरण नाही. म्हणून कारल्याच्या लेण्यांचें सौंदर्य आपणाला आजहि जाणवतें, अजंठ्याचीं चित्रें आजहि आपल्या मनाचे वेध घेतात. मुकुंदराज—ज्ञानेशांची वाणी आपणाला आजहि मोह घालते.

गेल्या कांही दशकांत खुद्द कवींनीच कांही नवे प्रयोग केले. आणि रेशमाच्या किड्याप्रमाणे काव्याच्या प्रयोजनांचे गुंडाळे आपल्या भोवतीं निर्माण करून घेतले. इमर्सनने उपनिषदांतून स्फूर्ति घेतली, त्यामुळे आपल्या आध्यात्माचे सूर पाश्चि-मात्य कविवाणींतून निघाले......आजहि अमेरिकेंत निघत आहेत. आणि त्यांच्या इलियट, ऑडेन, पाउंड इत्यादि कवींकडून आपल्या मर्ढेकरांनी स्फूर्ति घेऊन तिकडं पस्तीस सालीं थांबलेला काव्यप्रवाह इकडे पंचेचाळीस सालीं आणून सोडला. गंगेची कावड पुन्हा गंगेलाच वाहिली. पाश्चिमात्यांपेक्षा अध्यात्माचा प्रवाह मर्ढेकरांना जवळचा. त्यांच्या रक्तांतच भिनलेला. पण बुद्धिवादी दृष्टिकोणाच्या प्रभावाने संतांचा श्रद्धाळू आत्मप्रत्यय त्यांना कांही केल्या येईना. संतांचें जवळचें नातें असूनहि यामुळेच त्यांना विफलतेने घेरलें. अतिरिक्त आत्मनिष्ठेंतून त्यांनी जगाचीं कोडीं सोडविण्याचा प्रामा-णिक प्रयत्न केला. त्यांच्या सौंदर्यनिष्ठेने कुरूपतेला नि ओंगळपणाला सुंदरतेचा घाट आणला.

अनुक्रमणिका

'आजकालच्या कादंबऱ्या म्हणजे महाकाव्येंच' या मॉम्च्या भाष्याचे सूर इकडेहि उठत राहिले. मुक्तशैलीपर्यंतच्या काव्याच्या प्रयोगाने गद्य व काव्य यांच्या सीमा रेषा विरल झाल्या. मग 'काव्य म्हणजे काय ?' हा पुन्हा नव्याने कूटप्रश्न उभा राहिला. वस्तुनिष्ठा हा गद्याचा प्रांत आणि आत्मनिष्ठा हेंच केवळ काव्याचें क्षेत्र हा अतिरिक्त प्रचार आपल्या 'अनिलां'नी 'भग्नमूर्ती'च्या निमित्ताने केला. कथात्मक खंडकाव्य लिहिणें हेंहि पुढे कवीस पाप वाटूं लागलें. चिंतनशील प्रदीर्घ काव्याचे प्रयोग होऊं लागले. 'महाकाव्य' निर्मितीचा विचारहि अशा स्थितींत कसा यावा ? मग कादंबऱ्या म्हणजेच महाकाव्यें हें समीकरण महाकाव्यनिर्मितीच्या अभावीं बरें वाटूं लागलें.

मुक्तछंदांतील चिंतनशील काव्य म्हणजे प्रबंधच होय असेंहि आता समीक्षक बोलूं लागले. तर्क हा काव्याचा वैरी मानला जात असतांना चिंतनशील खंडकाव्यांतील 'काव्य'पणाच गळून पडला !

संस्कृत शास्त्रकारांनी काव्याचें गणित मांडलें. अलंकार, वक्रोक्ति, ध्वनि व रस यांतच काव्याच्या आत्म्याचा शोध त्यांना क्रमाक्रमाने लागला. तथापि रसालाच काव्याचा आत्मा मानल्यानंतरहि पहिल्या तीन काव्यलक्षणांचा वापर आनुषंगिक म्हणून करून कवींनी समावेशक भूमिका स्वीकारली.

पाश्चिमात्य काव्यसमीक्षेंत व्यक्तिगत आत्मनिष्ठेने नि सूक्ष्मतेने शेकडो तऱ्हांचे शोध घेतले. तरी स्थूल मानाने मुख्यतः चारच टप्प्यांत हाहि प्रवास आटोपला. जीवन प्रतिबिंब, संसृति टीका व पलायन हे पहिले तीन टप्पे आणि अंतर्विश्वाचें प्रामाणिक चित्रण हा आजचा चालू प्रवाह. या शेवटच्या अवस्थेंत येथेहि पहिल्या तीन प्रवृत्तींचा खेळ चालविण्यास भरपूर अवकाश आहे. पण जाणीव–नेणिवेच्या सीमारेषेवरील संज्ञा-प्रवाहाचें चित्रण प्रामाणिकपणें करायचें म्हणजे 'तर्क' हद्दपार झालाच ! आशयावरून वर्गीकरण करण्याचें महत्पाप नवकाव्यसमीक्षकांनी करून गोंधळ निर्माण केला. प्रतिमा, भावनानिष्ठ समतानता, वास्तवता, प्रतीकात्मकता, अतिवास्तवता या अवांतर लक्षणांतच नवकाव्याच्या आत्म्याचा शोध लावण्याचा प्रयत्न करणारांनीहि संदिग्धताच निर्माण केली. भरीस मनोविश्लेषणाच्या शास्त्रानेहि थैमान घातलें.

नवकाव्याचा आत्मा अंतर्विश्वाच्या प्रामाणिक चित्रणांतच सामावला आहे हा सिद्धांत सूक्ष्म विचारांतीं पटावा. या संज्ञाप्रवाहाचें रेखाटन करतांना अर्थातच दुर्बोधत्व आलें. आणि 'काव्यांतील अर्थाचें स्थान काय ?' हाच एकमेव प्रश्न अलीकडे डोकें वर काढूं लागला आहे. 'कवितेने अर्थ सांगू नये, कविता ही फक्त कविता असावी', हें काव्याचें नवें वर्णन लोकप्रिय झालें. मंत्रोच्चारानेच आपल्या मनावर प्रभाव पडतो असें आपण मानतोंच ना ? मंत्राचा अर्थ सांगितल्याने त्याचें सामर्थ्यच नष्ट होतें असाहि एक भाव आहे. तशीच ही काव्यासंबंधीची कल्पना आहे. या शब्द-

ब्रह्माच्या श्रवणाने वा वाचनानेच अननुभूत संवेदनांची परिणामकारकता जाणवते असा या काव्याचा दावा आहे. पर्यायाने शब्द आणि अर्थ यांचीच पूर्ण फारकत होणार की काय अशीहि भीति वाटणें साहजिक आहे.

कारण दुर्बोध रचनेमुळे मूळ महत्तम अस्सलावरोवर कृत्रिम रेशमाप्रमाणे नक्कलाची उमाप निपज चालू आहे आणि पाण्यांत टाकलें की केतकी निघाली इतकी सोपी पारख काव्याच्या बावतींत शक्य नाही. शब्दांची वेचक निवड, एक डौलदार घाट आणि वेढूट तिर्यक्ता असें आजच्या नकली नवकाव्याचें वरपांगी स्वरूप आहे. दृक्-भिंगावर निसर्गदृश्यें टिपत, अंतर्प्रतिक्रियेच्या आडव्या धाग्यांत भाव, कल्पना, विचार, स्मृति, गंड इत्यादिकांचे रंगारंगाचे उभे दांड फेकून नवी मराठी कविता आज लीलेने ढंगदार वीण विणत आहे. पण या कारागिरींत पुढे येतें तें सारेंच कांही अस्सल नव-काव्य नव्हें किंवा प्रभावी नवप्रयोग नव्हेत. तथापि आजहि नवकाव्याच्या कक्षेबाहेरील विपुल कवितांत विशालता नि सघनता यांना प्रसाद–माधुर्याचे घाट लाभलेलेहि दिसतात. पण प्रसाद, ओज, माधुर्य इत्यादि अभिजात काव्यगुणांच्या अवहेलनेनेच आणि आशय–अभिव्यक्तीच्या तिरकसपणानेच काव्ययशाची कमाई होते या समजुतीने आस्थेने लिहिली जाणारी आजची कविता पुष्कळदा दुर्बोधतेचा उच्चांक गाठते.

'दुर्बोधता हेंच नवसाहित्याचें व्यवच्छेदक लक्षण' अशी घोषणा नवनिर्मिति करणारा आणि नवसाहित्याचें व्याकरण सांगणारा एखादा आजचा मातब्बर जेव्हा करतो तेव्हा तें पाश्चिमात्य समीक्षेचें अजाण अनुकरण असतें. कूट काव्याची ही कुटिल (तिरकस) निपज घडविण्यांत एका मासिकाने धंदेवाईक कुशलता दाखविली. प्रत्येक वर्षी मोटारीचीं नवीन मॉडेल्स काढलीं जातात. आणि त्याची बेसुमार जाहिरात मोटार धंद्याचे कारखानदार जसे करतात, तसे या नव्या वक्र प्रयोगांचे खेळ खेळणारे युवक हाताशीं घेऊन पुढे आण, त्यांची जाहिरात कर, जड झाले की फेकून दे, पुन्हा नवे नवे शोध, त्यांचा उदो उदो कर आणि नवीनतेचें कलातंत्र आणि अभिनवतेची कलानिर्मिति याचें एक महत्त्वाचें केंद्र म्हणजे आपलेंच, असा यशस्वी डांगोरा पीट, असें हें धंदेवाईक नवें तंत्र आहे. एका संपादकाच्या ओंजळीने पाणी पिण्यानेच आपली प्रतिष्ठा मराठी जगांत स्थापित होऊं शकते असें दिसून आल्याने तिर्यक्तेचीं डोंबारीं नृत्यें सुरू झालीं. पाश्चात्य धारा होत्याच. त्यांचें आणि एकमेकांचें, वेडीवाकडीं वळणें घेण्यांत अनुकरण सुरू झालें. परंतु ज्यांनी समीक्षक म्हणून आजच्या क्षेत्रांत याच केंद्राच्या कृपेने स्थान मिळविलें, त्या सर्वांचा आजचा अभिप्राय आपणांस ठाऊक आहे. नवेनवे प्रयोग करण्याची खोड प्रत्ययकारी साहित्याची निपज नव्हे. या उठवळ प्रयोगां-चीहि एक चाकोरी ठरली आणि बंदिस्त कोठडींत या मराठी काव्याचा जीव आज गुदमरत आहे. बहुतांश कविता या बंधनांतून मुक्त आहे आणि ही खोडचांत अडकलेलीहि

तडफडत आहे. पण प्रसाद–माधुर्यान्वित असे आज चोहीकडे चाललेले प्रत्ययकारी नवनवोन्मेष पुन्हा मराठी मनाला चटका लावतील यांत संदेह नाही. त्यांच्यांतच भावी मराठी कवितेचें आशास्थान आहे.

प्रसन्न निर्मितीचें, प्रत्ययकारी समीक्षेचें आणि प्रगाढ व्यासंगाचे षट्‌ऋतुकालीन उन्मेष चोखंदळपणाने चालू आहेत. भोजकें पण नेटकें असें वेल्हाळ स्वरूप इकडीलहि दोन तीन चिमुकल्या प्रकाशनांना मिळत आहे. ('नवें लेखन' 'नव्या दिशा' 'धारा') दुर्बोधतेचें अवगुंठन या प्रकाशनांतून गळून पडत आहे आणि पडदानशीन कवितेचा केवळ चेंहरामोहराच दिसतो आहे' असें नाही तर तिच्या अंगप्रत्यंगाचें रंगरूप प्रतिष्ठित आविभावांतून सौंदर्यदर्शन घडवीत आहे.

कवितेंत दुर्बोधता न येण्याची दक्षता कवींनी घ्यायला आरंभ केला आहे. एखाद्या कवीचा हा अतिरिक्त तिर्यक्‌तेचा ह्व्यास त्याच्या काव्यविकृतीच्या अध:पतित अवस्थेचेंच लक्षण मानलें जात आहे. कविता दुर्बोध नसणें म्हणजे ती बाळबोध असावी असा अर्थ नाही. अगदी सामान्य वाचकांच्या अज्ञानामुळेहि त्याच्यापुरती ती दुर्बोधच होईल. परंतु मोजक्या रसिकालाहि, तिच्या एकसंध परिणामकारिकतेंत, दुर्बोधत्वाने चुकल्यागत व्हावें, आणि तिर्यक्‌तेच्या डोंबारी नृत्याचाच ठसा केवळ उठावा हें कविता पडल्याचें लक्षण आहे. साहित्येतिहासांत आशयाची सघनता संपुष्टांत आली की केवळ श्लेषात्मक कूटें निर्माण करणारे, ('शंकरास पुजिलें सुमनानें' 'कीर्तनास नर हो तुम्हि जागा') चित्रबंध घडविणारे, यमकांची चित्तथरारक 'सर्कस' करणारे पंडित अधून मधून निर्माण होतात. अशा काळाला ऱ्हासकाळच मानतात. मर्ढेकरांनंतर असा ऱ्हास काळ सुरू होतांच प्रासादिकाची प्रसन्न साधना पुन्हा सुरू झाली आहे हें भावी काव्याचें प्रसाद-चिन्हच होय. गतवर्षी 'अनिलां'नी अव्यवस्थित प्रज्ञेचा उल्लेख केला तो केवळ व्याज-काव्याच्या बाबतींतच. ती भ्रभिष्टतेच्या आभासाची रचना टाळली पाहिजे. संपादकांचें गुलाम होण्याचें, आशयाची सघनता असणाऱ्यांना, प्रयोजन नाही. आरंभावस्थेंत पाहिजे तर मुलीच्या नांवाची (विंदा करंदीकर, आरती प्रभु) अथवा दुर्बोधतेची बुंथी क्षम्य ठरेल आणि संपादकाची वंचना करणें मोठासा अधर्म वाटणार नाही. पण आघाडीवरील मुखंडांनी प्रामाणिकपणाचीच कास धरून रसिकाशीं हृदयसंवाद करण्याची शिकस्त करून आशयाची सघनता साधली पाहिजे. शब्दाशीं संबंधित अर्थवलयाची प्रभावळ फार वाढवून पुसट होऊन जावी इतका 'फोकस' वाढवूं नये. शब्दसाम्यांतून अर्थभिन्नतेची संगति (Association) सहजगतीने साधली तर सांधेपालटाचा खडखडाट परवडतो.*

* कणा मोडला निश्चलतेचा
या पालीच्या आवाजानें;
'धम्मं सरणम्' कुणी बोललें
पाषाणांतील बुद्धमिषानें

अनुक्रमणिका

पण अर्थाची गाडीच पूर्ण उलटूं नये. प्रतीकात्मकता व ध्वनि यांचा वापर काव्यसौंदर्याचें वर्धन करतो पण अमर्याद दूरान्वयाने असंबद्ध प्रलापांचा आभास निर्माण होऊं नये. असंबद्धतेच्या (Incoherence) शापावर कोणी उःशाप दिला तर आजची व्याज कविता मोकळी होईल. अर्थशून्यता (obscurity) हें सर्वांत मोठें पाप ! कवितेच्या धर्मांत त्याला वाळींत टाकावें व सुबोधतेच्या प्रायश्चित्तानेंच त्याचें शुद्धीकरण आवश्यक व्हावें. आत्मसुखार्थ लिहिलें तरी, हृदयसंवाद (communication) साधण्याची पात्रता नसणाऱ्यांनी प्रकाशनाचा जुलूम टाळावा. शब्दकलेंत हृदयसंवाद अर्थवलयांनीच निर्माण होणार ! चित्र, नृत्य, मूर्ति, संगीत या कलांत प्रत्यक्ष दृक् वा श्रुतिसंवेदनेनेच परिणामकारकता साधते. शब्दांच्या अप्रत्यक्ष माध्यमांत संपूर्ण अर्थत्याग सुतराम् अशक्य आहे. मग कवितेची परिणामकारकताच शून्य होईल.

कला म्हटली की त्याला घाट पाहिजेच; पण अनुभूति-क्षेत्रांतील साकारलेल्या जाणीवा प्रत्यहीं नवानवा आकार धारण करणार. एकाच कवीची प्रत्येक कविता वेगवेगळे आकृतिबंध धारण करील. हेंच सच्चेपणाचें गमक ! सगळ्यांनी आकारबंधाचे एकसारखे साचे निर्माण केले की शब्दकलेच्या अनुकरणाचा तो फसवा प्रयोग जाणावा. विशाल अनुभूतीला कुठलीहि चाकोरी रुचूं नये. यासाठी काव्यकलेंत नूतन पदार्पण करणारांनी आपल्या भाषेंतील प्रचलित कविता वाचण्याचेंच टाळावें. हा सामूहिक चाकोरींतून बाहेर पडण्याचा एक उपाय ! कवीने स्वतःच आपला आकारबंध निर्माण करून त्यांतच तो गुंतून पडला की त्याने कांही काळ आपलें काव्यलेखनच बंद पाडावें. विसाव्यानंतर नव्या उन्मेषाचे उद्रेक अभिनव आकार धारण करतात. आज काव्याला मागणी असल्यामुळे कधीमधी ती घडविण्याचा प्रसंग येतो. सरावाने तिला डौलदार घाटहि येतो. पण उत्स्फूर्त लाटांचें विमोहक नृत्यच चित्तवेधक असतें, कारण प्रत्येक उद्रेकाचा अवखळ उल्हास, अभिनवतेचा साक्षात्कार घडवून सौंदर्यदर्शनाचें समाधान देतो.

या नवकाव्याने अर्थात् अतिरिक्त आत्मनिष्ठेनेच काव्याचा संकोच झाला आणि काव्यकला एकारली. तिने स्वतःच आपणावर ही आपत्ति ओढवून घेतली. वास्तविक वस्तुनिष्ठेच्या प्रचंड क्षेत्राचा त्याग काव्यकलेस करण्याचें कारण नाही. निदान भारतीयांना तरी आपल्या व्यापक 'मीं'त साऱ्या ब्रह्मांडाचा समावेश सुखेनैव करतां यावा. जिवंत आत्मनिष्ठ प्रचीतींतूनच वस्तुनिष्ठ ब्रह्मांडाचा साक्षात्कार आम्हांस सहजतेने होतो. म्हणूनच कोणतेंहि जिवंत वस्तुनिष्ठ काव्यहि आत्मनिष्ठच असतें. अर्थातच कवींनी स्वानुभूतिपूर्ण आत्मनिष्ठेंतून व्यापक वस्तुनिष्ठा आपल्या कवेंत घ्यावी. कथात्मक खंडकाव्यें आणि महाकाव्येंहि सत्काव्यकलेंत बसत नाहीत, अशी भ्रांति निर्माण करून घेऊं

अनुक्रमणिका

नये. म्हणजेच आशयांच्या विराट अवकाशांत त्यांनाहि कल्पनेचे उत्तुंग उपग्रह लीलया उडवतां येतील. नव्हे, उभ्या ब्रह्मांडाच्या आरपारहि त्यांच्या प्रतिभेने पुन्हा झेप घ्यावी. अवखळ निर्झराने 'बालकवि' वेडावले. आता भावी महाकवींना महासागराचें रम्यभीषण महाकाव्यहि एक पोरखेळ वाटावा.

अध्यक्षीय भाषणाच्या कालमर्यादेंत काव्यविषयक मंथनांतून इतकेंच नवनीत आपल्या हातीं लागलें, या त्रुटीची जाणीव असूनहि, त्यावर कांही इलाज नाही. कांही काव्यांचा उदाहरणादाखल उल्लेख करून कांही पंक्ती उद्धृत करण्याचें बुद्धयाच टाळलें. विराट काव्यप्रांतांत तें असंख्य अनुल्लेखितांना अन्यायाचें झालें असतें!

नेमका हाच प्रमाद कांही संपादनकेंद्रांतून बुद्धिपुरस्सर घडत असतो. अमक्याला पुढे आणायचें तमक्याला हाणून पाडायचें हें हीन प्रचारतंत्र चालू आहे. पित्तु, कंपू, जवळचा, दूरचा, अशीं क्षुद्र अवधानें वापरलीं जातात. अशाने मराठी रसिकतेची दिशाभूल होते. प्रसिद्धीचें साधन ज्यांच्या आंगवळणीं पडलें आहे अशांचा अगर एका विशिष्ट चाकोरींत वा चौकटींत चपलखपणें सापडलेल्यांचाच 'उदो उदो' चालत असतो. एकांतांत आत्मीयतेने साधना करणारे, या भ्रामक प्रचाराने विस्मरणांत जातात. पण निष्ठावंत कलावंताने आपल्या मस्तवालपणांतच दंग असावें हेंच उत्तम· कारण खरी कला चिरंजीव असते. तिने स्पर्धेच्या तातडीच्या आणि अल्पजीवि क्षेत्रांत धडपडूं नये हेंच चांगलें. विशेषत: आपल्या कलावंतांचा पिंड एकांतिक साधना करण्यांतच समाधान मानतो. प्रसिद्धीपराङमुखता हाच त्यांचा सहज धर्म आहे. आपले व्युत्पन्न पंडितहि आपापल्या समाधींत अविचल आहेत. असें असूनहि त्यांची नामावलि रसिकांच्या जिव्हाग्रीं अखेर येतेच, हा त्यांच्या तपःसामर्थ्याचाच प्रताप आहे. पण त्याबरोबरच अनेक लुंग्यासुंग्यांना व वशील्याच्या तट्टांना, भलतेंच महत्वें स्थान दिलें जाऊन, रसिकतेची दिशाभूल केली जाते आणि वाटेवरच्या धोंड्याला शेंदूर फासावा, तशी भलतींच पूजास्थानें निर्माण होतात. मग 'पदललाट केलें किणें' अशी रसिकांची करुणार्त तडफड व्हायचीच! शिवाय यामुळे मान्यतेचा लाभ एखाद्या प्रतिभावंतास फार विलंबाने प्राप्त होतो अगर एखाद्याला तो त्याच्या जिवंतपणीं मिळतच नाही. अस्सल प्रतिभावंताने त्याची तमा कां करावी? नाम हें पिंड-रूपाला चिकटलेला एक क्षुद्र अपघात आहे ना? मग आपल्या नांवाच्या कीर्तीकरितां खरा कलावंत काय म्हणून पर्वा करणार? जगांत गुणज्ञांना आणि त्याच्या कलेला कोणाच्या मेहेरबानीची गरज नसावी. पण डौलदार शैलीचें ज्यांना स्वयंभू वरदान लाभलें आहे, असे अनेक चोखंदळ समीक्षक जेव्हा प्रचारसाधनांचा भलता दुरुपयोग करतात आणि खासगी भेटीघाटींत मित्रमंडळींत वितुष्ट लावून गुणज्ञांचा अन्यायी छळ करतात, तेव्हा उबग

येते. म्हणूनच आजच्या काळांत खऱ्या प्रतिभावंताची कातडी गेंड्याची असली पाहिजे. आपल्या भागांत भवभूतीपासून आजतागायत प्रतिभावंत व समाजसेवक आत्मविश्वासाने पाऊलें टाकतात, आणि समानधर्मा भेटावा म्हणून पृथ्वी विपुल आहे आणि काल अनंत आहे ही त्यांची भरवशाची मस्तवाल वृत्ति असते. या आमच्या वृत्तीमुळेच येथे उपद्व्यापी समीक्षकहि सोसले जातात आणि त्यांच्या गुणांपुरतें त्यांचें कौतुकच होतें. पण हा सारा सोशीक प्रकार भोळसरपणाचा द्योतक नसून, क्षुद्र दोषांकडे कानाडोळा करणाऱ्या येथील उदार वृत्तींतून उदित होतो.

पण अनुल्लेखाने केलेल्या प्रतिभावंताच्या दीर्घकाल उपेक्षेच्या पापाइतकीच विध्वंसक टीकेची हिंसावृत्तीहि वाङमयवृद्धीस अपकारक होते. कविश्रेष्ठ कीटसच्या एन्डिमियन्‌वरील बेजबाबदार टीकेमुळेच त्या हळव्या कवीचा अपमृत्यु झाला हें उदाहरण प्रसिद्धच आहे. गुणदोषांची योग्य छाननी करून, कलावंताच्या विकासाचा मार्ग अचूकपणें सुचविणें, या प्रामाणिक समीक्षाप्रथेला कुणीच नांवें ठेवणार नाही. अशी आस्थेवाईक आणि प्रोत्साहक टीका पूर्वी अधिकारी मासिकांतून आणि वजनदार वृत्तपत्रांतून सखोलपणाने व प्रदीर्घ विस्ताराने चालत असे. विमर्शकांच्या दुर्भिक्ष्याचा हा काळ कलोन्नतीस भयावह आहे. एक तर ग्रंथावर उडते अभिप्राय लिहून उडवा-उडवीचा उथळपणा मिरवणेंच चालूं आहे. ते अभिप्रायहि ग्रंथप्रकाशनानंतर किती काळाने येतील याचा नेम नाही. वृत्तपत्रव्यवसायांतील अर्धशिक्षित कमी पगाराचा उपसंपादक हें काम कसें तरी घाईने उरकतो. सखोल अभ्यास आणि विवेकी संतुलन त्याला क्वचितच शक्य असतें. साहित्यसंस्थांच्या मुखपत्रांतून, हें काम तज्ज्ञांकडून होत असल्यामुळे, थोडेंबहुत चांगलें चालतें. तथापि विस्तृत परीक्षणें क्वचितच लिहिलीं जातात. आपल्याकडे हें काम बऱ्याच सहानुभूतीने चालतें. श्री. माडखोलकरांनी येथे परीक्षणांची चांगली परंपरा निर्माण करून ठेवली आहे.

सौ. कुसुमावती देशपांडे यांनी आपल्या मुंबई मराठी साहित्य संघाच्या १६ व्या अधिवेशनांत जें साहित्यसमीक्षेविषयीं विवेकशील विवेचन केलें आहे, त्यांतील आदर्श तर आमच्या अनेक टीकाकारांच्या स्वप्नांतहि येणार नाही. हत्ती आणि चार आंधळे यांची गोष्ट आपणास ठाऊक आहे. चार रंगांच्या चष्म्यांतून अलीकडची समीक्षा चालत असते. पहिला नीतिकल्पनांचा भगवा, दुसरा मानसशास्त्रप्रेरित नव्हाळीचा हिरवा, तिसरा समाजनिष्ठ तांबडा आणि चवथा सौंदर्यशास्त्राचा 'कॅलॅडोस्कोप्' सारखा विविधरंगी दर्शन देणारा! हें सर्व विकृत किंवा अपुरें दर्शनच घडविणार. समीक्षेचें सम्यक् स्वरूप कसें असावें यासंबंधी बाईंचें आमूलाग्र विवेचनच वाचलें पाहिजे. पण पुढील लहानशा उताऱ्यावरून त्यासंबंधीचें ओझरतें दर्शन होईल:—

" साहित्यकृतीच्या प्रथमास्वादाच्या वेळींच तिचा रचनाबंध आणि प्रतिभा-सृष्टि, तिच्यामध्ये अनुस्यूत असलेलें सत्य आणि त्याच्या दर्शनानें स्फुरलेलें भावविश्व, ह्या सर्वांचा साकल्यानें साक्षात्कार होत असतो. या साकल्यात्मक साक्षात्काराचें विवरण व मूल्यमापन आपण अबोधपणें त्या आस्वादाच्या वेळींच करीत असतों. त्यांतूनच आपल्या आनंदाचा वा उद्वेगाचा उद्गम होतो. त्या साहित्यकृतीला आपलें मन अधिकाधिक अभिमुख होत जातें किंवा तिच्यापासून परावृत्त होतें. त्याला साहित्यकृतीच्या संकुचिततेची जाणीव होते किंवा महानतेचें दर्शन होतें. तेथे केवळ लालित्य प्रतीत होतें किंवा प्रतिभेच्या प्रगल्भतेचा साक्षात्कार होतो. या अबोध एकसंध जाणिवेला निश्चित, सुजाणरूप देतांना तिच्या सर्व घटकांचें मूल्यमापन करणें अपरिहार्य ठरतें. त्यामुळे समीक्षेला सौंदर्यशास्त्राच्या निकषांच्या पलीकडे जाणें आवश्यक ठरतें. असें केल्याशिवाय बालकवींची एखादी कविता आणि वाल्मीकि रामायण यांत फरक काय हें स्पष्ट करतां येत नाही; त्यासाठी गमक उरत नाही. ज्या साहित्यकृतींची गुणवत्ता आणि महानता वादातीत आहे, त्यांची थोरवी कशामध्ये आहे हेंच जर आपण स्वीकारलेल्या निकषा-प्रमाणे ठरत नसेल, तर तो निकष चुकीचा किंवा अपुरा आहे, हेंच मान्य केलें पाहिजे. समीक्षेचा मानदंड आपल्या कार्यासाठी पूर्णपणें समर्थ ठरावा, म्हणून सौंदर्यशास्त्रीय मूल्यांबरोबर जीवनमूल्यांचाहि त्यांत समावेश केला पाहिजे."

पण एका विशिष्ट पंथाला वाहिलेला तिकडला एक शिष्ट कंपू, याबाबतींत गहजब करीत आहे. पाश्चिमात्य सौंदर्यमूल्यांचे निकष म्हणजे केवळ पाण्यावरच्या रेघोटचा! त्या नव्या शास्त्राचें अनुकरण करून, सूक्ष्मतेचा व शिष्टपणाचा आव आणून, ठराविक नवीन घाटांच्या शब्दांची पखरण करीत, हें लहरी आवडीनिवडीचें प्रदर्शन चालतें. प्रगाढ वाङमयव्यासंगाचा आभास निर्माण करण्याची कला, या पोरापोरींना चांगली साधते. आपल्या आवतीभोवतीच्या उठवळ प्रयोगांना भलतेंच महनीय स्थान द्यायचें आणि पठडीबाहेरच्यांना बेमुर्वतखोरींनें झोडपून काढून क्षुद्र ठरवायचें, असें हें पक्षपाती अप्रामाणिक तंत्र आहे. इतकेंहि असून नेटकी पारख तेवढी आपलीच, या अहंगडाने पछाडलेले हे अर्धकच्चे परप्रकाशी टीका-कार, मोठ्या तोऱ्यांत मिरवतात. हे सर्व मराठी वाङमयाचे अव्वल दर्जाचे दुष्मन वाटले तर तो दोष सर्वसंग्राहक रसिकतेचा नाही!

आपल्यासारख्या बहुजन समाजांतील वाचकांनी या दलालांच्या मध्यस्थीने आपली फसवणूक करून घेऊं नये. खेड्यापाड्यांतूनहि वाचनाची अभिरुची वाढीस लागली आहे आणि ती उत्तरोत्तर वाढतच राहणार! आपले इकडले जिल्हे शिक्षणप्रसाराच्या बाबतींत

फार आघाडीवर असल्याकारणाने आणि वाचनालयाचीं केंद्रें इकडे उत्तरोत्तर वाढत असल्यामुळे, एकांतसाधना करणाऱ्या आपणासारख्या रसिकांनी निर्लेप पूर्वग्रहदूषित वृत्तीने स्वतःच पुस्तकांचें आस्थेवाईक वाचन करून रुचेल त्याचें स्वागत करावें. रंजक कला पलायनवादी झाली आहे आणि जीवननिष्ठ कला दुर्बोधतेने अगम्य होत आहे. कृत्रिमतेच्या गळफांसाने कला गुदमरून गेली आहे. शहरी पांढरपेशा चित्रणांचा अतिरेक झाला म्हणून कलेला ग्रामीण वातावरणांत नेण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यांत थोडेंबहुत यश आलें असलें, तरी हा प्रयोग मोठ्या प्रमाणांत होऊं शकत नाही. जागतिक जीवनाचें सम्यक् दर्शन मराठी वाङ्मयांत कसें होणार ? पंच खंडांतरीं मराठी लोकांचें मोजकेंच वास्तव्य आहे. तेंहि नोकरीनिमित्ताने. खेड्यांतहि सुशिक्षित वर्ग राहूं इच्छित नाही. मग इकडच्या सारख्या वन्य टापूंत जाऊन राहण्याची वृद्धि कोणास होणार ? पोटभरू नोकरीपेशांच्या लोकांचाच इकडे फार तर संचार असेल. लेखकाची जात वेगळी व वाचकांची जात वेगळी अशी खुळी समजूत चोहिकडे आहे. या सर्व नोकरीनिमित्त शहरांपासून दूर आणि मराठी मुलखापासून लांब कुठे तरी पंचखंडांतरीं राहणाऱ्या लोकांनी, आपले जीवनानुभव, साध्या बोलभाषेंत लिहून काढले, तरी ती मराठी वाङ्मयांत समृद्ध भर पडेल. पंचखंडांतरीं राहणाऱ्या मराठी माणसांनी आपल्या वाङ्मय-कृतींचीं इंग्रजी भाषांतरें करून, मराठी जीवनाचा व कलेचा परिचय सर्व जगास करून दिला पाहिजे.

आपलें लोकसाहित्य, बोलभाषेंतील वेचक शब्द, म्हणी व वाक्प्रचार हें आपलें अमोल धन आहे. लेखनोपजीवि कलावंत आपल्याकडे एखादाच असतो. बहुतेक नोकरीं-तील वा शिक्षित धंद्यांतील लोकांचा लेखन हा जोडधंदा तरी असतो अगर हौसेचा प्रकार तरी असतो. कालांतराने लेखनोपजीवि वर्ग तयार होईल हें निश्चित ! कारण शिक्षणप्रसाराबरोबर पुस्तकांचा खप वाढला, की लेखनावर कलावंताची उपजीविका चालूं शकेल.. परंतु तो काळ येईपर्यंत ग्रामीण शिक्षितांनी स्वतःच येथील जीवनानुभव टिपले पाहिजेत. कमींत कमी आपल्या लोकसाहित्याची जुळवाजुळव करून तें तरी प्रकाशांत आणलें पाहिजे. कारण रसरशीत जीवनाचा जिवंत प्रत्यय येतो तो बहुधा लोकसाहि-त्यांतच ! अलीकडच्या काळांत असे कांही प्रयत्न होत आहेत; पण लोकसाहित्याचें संकलन हें प्रत्येकालाच आपलें धर्मकार्य वाटलें पाहिजे. जें बोलींत आहे तें लिपींत आणून ठेवलें पाहिजे. आणि असलें सर्व साहित्य प्रकाशित न झालें तरी, तें त्यांनी विदर्भ साहित्य संघासारख्या संस्थेंत आणून ठेवावें.

आमच्या घरीं आमच्या वडिलांची एक म्हातारी मावशी असे. तिच्या मुखाग्रीं वाक्प्रचार व म्हणी इतक्या होत्या की श्वासागणिक ती नवनव्या म्हणी रचते की काय,

असें वाटत असे. पुष्कळदा मनांत येई की तिची प्रत्येक म्हण लिहून काढावी. पण तें झालें नाही. तें अपार धन तिच्याबरोबरच नष्ट झालें !

तिच्या ज्या कांही म्हणी आजहि आठवतात त्यांत 'बारा वर्षें सुरी पाजवली (पाजळली) आणि घरच्या म्हातारीवर चालवली' ह्या म्हणीचा वापर ती पुनःपुन्हा करीत असे. आज पं. जवाहरलालांच्या विरुद्ध पंजाब, तामिलनाड आणि महाराष्ट्र जी अन्यायप्रतिकाराच्या लढ्याची भाषा बोलत आहेत तिच्या अनुषंगाने या म्हणीचें उत्कट स्मरण होतें. ज्या भारतीयांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध लढा देऊन, भारत मुक्त केला त्यांत पंडितजींचें स्थान अग्रेसर आहे. अशा भारतभाग्यविधात्याविरुद्ध आपणास लढा देण्याची आणि त्यांच्याविषयी शिवराळ भाषा वापरण्याची बुद्धि व्हावी, हें भारतराष्ट्राचें दुर्दैव होय. मराठी आणि गुजराथी मुलुखाची सांगड घालण्यांत आली ती इंग्रजांनी निर्मून मागे ठेवलेल्या मोहमयी मुंबईमुळेच. भेदनीतींत निष्णात असलेल्या इंग्रजी कुटिलतेचा खराखरा वारसा जणुं मुंबईतच राहिला ! या तिलोत्तमेमुळेच ही सुंदोपसुंदी चालू आहे. पंडितजींवर आग पाखडणें म्हणजे वडाचें तेल वांग्यावर काढणें होय. मद्रास आणि कलकत्ता यांची गोष्ट निराळी होती. मद्रासची भूमि तामिलनाडची आणि संपत्तीहि तमिळ लोकांचीच होती. कलकत्ता बंगाली मुलुखांत आहे, पण तेथील भांडवलदार मारवाडी म्हणजे आठशें मैलांवरून आलेले. म्हणून या दोन्ही ठिकाणीं झगड्याचा प्रश्नच उद्भवला नाही. पण मराठी आणि गुजराथी यांचे मुलुख एकमेकास भिडले असून भवितव्याची कल्पना नसतांना गुजराथ्यांनी आपली अलोट संपत्ति निकटच्या मराठी मुलुखांतील मुंबई शहरांत गुंतविली, म्हणून झगडा झाला. जमीन एकाची तर इमला शेजाऱ्याचा असें हें भांडण आहे. म्हणूनच या गुंतागुंतीच्या प्रश्नाची सोडवणूक, राज्यपुनर्रचना समितीच्या निःपक्षपाती विचारवंतांनी मुंबईचें छोटें द्विभाषिक निर्मून केली होती. विदर्भाचें एक स्वतंत्र मराठी राज्य सुदैवाने निर्माण झालें होतें. पुढे-मागे मराठी–गुजराथी भांडण मिटलें, म्हणजे मुंबईसहित पश्चिमेचा मराठी टापू स्वतंत्र विदर्भास जोडून महाराष्ट्रराज्याची स्वप्नपूर्ति होईल असें विदर्भास वाटत होतें. परंतु गुजराथ्यांवर बहुमताचें दडपण आणण्याकरिता पश्चिमेकडील मराठी मंडळींनी द्विभाषिकाच्या होमकुंडांत एक होऊं घातलेल्या स्वतंत्र मराठी राज्याची आहुति दिली !

विदर्भाचे लोक जन्मापासूनच संपूर्ण मराठी मुलखावर प्रेम करावयास शिकतात. शालेय अभ्यासक्रमांत त्यांना हेंच बाळकडू दिलें जातें. संपूर्ण मराठी मुलखाचीं वर्तमानपत्रें येथे वाचलीं जातात. सर्व मराठी पुढारी, लेखक आणि कलावंत यांचा येथे नेहमीच आदर होतो. केवळ याच प्रेमाने विदर्भाने या अपूर्व त्यागाचें दिव्य केलें. पण राज्यपुनर्रचनेनंतर विदर्भाला मुंबई राज्याचा अतीव कटु अनुभव आला. पोकळ शहाणपणाची

घमेंड, हा मुंबई–पुण्याचा दुराराध्य मानसिक रोग आहे. या नव्या संक्रांत आम्हाला भयावह धक्के देणारीं कांही पुढील दर्शनें घडलीं:—

(१) मुंबई राज्य हें ब्रिटिशप्रणीत नोकरशाहीने बजबजलेलें गुलामी वृत्तीचें पोलीसराज्य आहे. स्वातंत्र्योत्तर दशकांत मध्यप्रदेशांतील विदर्भाने जो स्वातंत्र्याचा खराखुरा आस्वाद घेतला, त्याचा मागमूसहि या १८५८ च्या वळणावर चाललेल्या मागासलेल्या राज्यांत आढळत नाही.

(२) शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमांत मराठी माध्यमांतून शिक्षण चालू करून येथे दोन दशकांवर काळ लोटला, तरी जुनाट मुंबई–पुण्याकडे अजून माध्यमाची वेंधळी चर्चाच चालू आहे.

(३) चौदा वर्षांखालील मुलांना मोफत शिक्षणाचा प्रयोग इकडे चालू होता तोहि या मुंबईच्या गुलामी राज्यास दोषार्ह वाटला.

(४) पोलिसांची संख्या सारखी वाढवीत जाणें हीच मुंबईची सुराज्याची 'बंदोबस्ती' कल्पना आहे.

(५) शिक्षकांची इकडील अल्प वेतनश्रेणीहि या पोलिसराज्याच्या डोळ्यांत खुपली.

(६) इकडील पदवीधरांना मुंबई–पुण्याच्या पदवीधरांपेक्षा (भारत सरकारच्या स्पर्धा परीक्षेंत योग्य स्थान मिळवूनहि) अकारण कमी लेखण्यांत येतें. त्यामुळे हक्काच्या विदर्भाच्या टापूंतहि त्यांना अन्यायानें नोकऱ्या न मिळण्याचा धोका आहे.

(७) या राज्यांतील कायदेमंडळांत भाषण–स्वातंत्र्याचाहि लोप झाला असून लोकशाहीचा खून पडत आहे.

किती म्हणून सांगावें ? मुंबईराज्य अत्यंत मागासलेलें आहे हा स्वातंत्र्य चाखलेल्या विदर्भाचा आता पक्का समज झाला आहे. तें पुढारलेलें आहे असा स्वत: मात्र उठल्या बसल्या प्रचार करतें. हें सुद्धा पाश्चिमात्त्य तंत्रच आहे. रवीन्द्रनाथांनी म्हटलें आहे:—

Says a drop of water 'what a jem am I ?'
I doubt its value from its boastful cry !

आमच्याकडील पुरेसें धान्यहि ब्रिटिशांच्या प्रमाणेच पश्चिमेकडे नेण्याच्या धोरणामुळे इकडे निर्घृण टंचाई निर्माण झाली आहे. मुंबईला गेलेल्या विदर्भाच्या सरकारी नोकरांना

अवहेलनेने वागविल्याचा अनुभव आहे. राजकीय पक्ष बदलले तरी मुंबई–पुण्याच्या घमेंड-खोर, आक्रमक वृत्तींत कदापि फरक पडेल अशी विदर्भास आशा नाही. सहाशें मैलांवर असलेलें राजधानीचें शहर आपल्या पोकळ बुद्धिमत्तेच्या घमेंडीने, विदर्भाला उपेक्षेने, पक्ष-पाताने व अवहेलनेने छळतच राहणार हा भाव दृढ होत चालला आहे. लोकनायक बापूजी अणे आणि विनोबांसारख्या लोकांना शिव्या देणाऱ्या आमच्या पश्चिम मराठी बांधवांची आता इकडे उबग येऊं लागली आहे. या सर्व अनुभवांनी सर्व मराठी मुलुखावर प्रेम असूनहि पुढेमागे द्विभाषिक तुटल्यास, विदर्भाचें वेगळें राज्य व्हावें, असेच वारे इकडे वाहूं लागले आहेत. आणि त्याचेंच प्रतीक म्हणजे लो. अणे यांचा प्रचंड विजय होय. द्विभा-षिक तोडण्याचा मार्ग पंडितजी व त्यांच्या प्रभावळीचें मन वळवणें हाच होय. अराजकता माजवून वीरपुरुष म्हणून मिरविण्याचा नव्हे अशी येथे लोकराज्यानुकूल दृष्टि आहे. दोन भाषांचें एक राज्य असूं नये हें मान्य! पण एका भाषेचीं दोन राज्यें असल्यास काय हरकत आहे, हा मुंबई–पुण्याला आमचा सवाल आहे. मराठी मुलखाचें भावनिक ऐक्य इकडे प्रथमपासूनच आहे. वेगळ्या राज्यांत असूनहि तें भंग पावलें नाही. उलट एका राज्यांत आल्यापासूनच त्यास तडा गेला आहे. विदर्भाचें स्वतंत्र राज्य हा इकडल्या मराठी लोकांचा आता जीवनमरणाचा प्रश्न आहे. भांडवलशाहीच्या आणि यांत्रिकतेमुळे आलेल्या संस्कृतिहीनतेच्या ठकवाज मुंबई शहराचा आम्हांस संपर्कहि नको, इथपर्यंत इकडच्या भावना तीव्र झाल्या आहेत. मर्ढेकरांनाहि मुंबईच्या यांत्रिकतेचें ओंगळ दर्शन झालें होतेंच. आमचें विदर्भ राज्य झालें, तर आमच्या भावी मुख्य प्रधानाच्या दिल्लीवरील अपेक्षित प्रभावाने, जो योजनांपैकी हक्काचा पैसा आणतां येईल, त्यामुळे एक दोन दशकांतच विदर्भाची भरभराट होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

अमराठी लोकांच्या हातीं आमची राजकीय सत्ता जाईल, हा खुळा प्रचार आम्हांस पटत नाही. मुंबईकडील लोक आमच्या मानाने आज तरी विलायती संस्कृतीचे गुलाम व बुद्धिहीन आहेत, अशी आमची प्रामाणिक समजूत आहे. फक्त शरीर बाजारू तयार कपड्यांनी सजवावें आणि बुद्धि स्थानिक वृत्तपत्रास गहाण ठेवावी असे हे लोक, Tailor–made men आणि News paper–made men आहेत, असें आम्हांस वाटतें. या उथळ रिकामी ऐट असलेल्या लोकांशीं, गंभीर प्रकृतीच्या विदर्भाच्या लोकांचें एका राज्यांत कसें वरें पटणार? पटत नसलेल्या दोन भावांचीं एका घरांत भांडणें होण्यापेक्षा, त्यांनी शेजारच्या दोन घरांत राहून एकमेकांवर नितांत प्रेम केलेलें चांगलें नाही का? विदर्भांत राहणारा प्रत्येक माणूस स्वतःला महाराष्ट्रीय समजतो, पण पश्चिमेच्या टापूंत राहणारे मराठी लोक फक्त आपणालाच महाराष्ट्रीय समजतात आणि आम्हांला दूरस्थ मानतात. पुण्या–मुंबईकडे राहणारा कवि ‘मराठी’ कवि असतो आणि नागपूरकडे राहणारा, मराठी नव्हे, ‘नागपूर–वऱ्हाड’चा कवि ठरतो! असलें

हें संयुक्त महाराष्ट्राचें मोठें सोयिस्कर स्वप्न आहे. पुढे मागे जर आमच्या भाग्यानें इकडील वेगळया मराठी मुलुखाचें स्वतंत्र राज्य झालेंच तर मध्यप्रांतांत असतांना आम्ही जसें पूर्ण मराठी टापूवर प्रेम करीत होतों, तसेंच नित्य करीत राहूं. कारण आमचें महाराष्ट्रप्रेम अत्यंत खरेखुरें असून तो केवळ एक राजकीय ' स्टंट ' नाही.

भाषावार प्रांतरचनेच्या या काळांत आमच्या साहित्याच्या वृद्धीसाठीहि, मागासलेल्या जुनाट मुंबई राज्यापेक्षा प्रगत विदर्भाचें राज्यच आम्हांला हितकारक होईल. म्हणूनच हा साहित्य व भाषेशीं निगडित असलेला तथाकथित राजकीय प्रश्न, थोडक्यांत पण सडेतोडपणें उल्लेखावा लागला. हें एक मराठी प्राध्यापक कवीने केलेलें इकडील जनमनाचें मंथन आहे, कोणा स्वार्थलंपट डागळलेल्या राजकारणी माणसाचें प्रचारकी मत नाही हें आपण ध्यानांत घ्यावें. पण विनोबांनाहि शिव्या देणाऱ्या मुंबई-करांना हें कसें पटणार ? त्यांना जें रुचतें तेवढेंच बुद्धिनिष्ठ व तत्त्वप्रधान, बाकीचें सर्व न पटणारें म्हणजे महाराष्ट्रद्रोहाचेंच असतें, हा बौद्धिक विलास मुंबई–पुण्याच्या चळवळयांनाच लखलाभ होवो ! वाघ म्हटला तरी खातो व वाघोबा म्हटला तरी खातो, अशी तिकडची वृत्ति पाहूनच, माझें हें प्रांजळ लोकमतदर्शन स्पष्टपणें चर्चावें लागलें.

कलेच्या प्रांतांतील सहानुभवाची समतानता अर्थातच राजकीय प्रश्नांत येणार नाही! भिन्न मतांच्या लोकांचीं मनें नाराज होतील, याची जाणीव असूनहि जें प्रामाणिकपणें वाटलें तें बोललों. आता मजवर शिवराळपणाची लाखोली वाहिली तरी तें मुंबई पुण्याच्या प्रचलित निर्बुद्ध धर्माला धरूनच होईल !

आम्हांला सर्व ब्रह्मांड प्रिय आहे. त्यापेक्षा आम्हांला आमचें जग प्यार आहे. त्याहूनहि आम्हांला भारत अधिक प्रेमाचा आहे. भारतापेक्षाहि मराठी मुलूख आम्हांला प्राणप्रिय आहे. आणि या सर्वांपेक्षाहि विदर्भ तर आमचा पंचप्राणच आहे !

जय विश्व, जय जगत्, जय भारत, जय महाराष्ट्र, जय विदर्भ !

---

अनुक्रमणिका

# संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस, वि. सा. संघ, यांजकडून

## केंद्रवृत्त

### केंद्रीय कार्यकारी मंडळाची ५ वी सभा

केंद्रीय कार्यकारी मंडळाची ५वी सभा दि. १४-३-५९ ला तळोधी येथे संमेलनाच्या जागीं भरली. सभेमध्ये नऊमाही जमाखर्च मंजूर करण्यांत आला, व संमेलनांतील ठरावांचा आराखडा तयार करण्यांत आला.

### नवीन केंद्रीय कार्यकारी मंडळाची १ली सभा

घटना नियम १४ (अ) प्रमाणे नवीन केंद्रीय कार्यकारी मंडळाची १ली सभा दि. ८-३-५९ रोजीं केंद्रीय कार्यालयांत भरली. ह्या सभेत पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्ययांत आली:—उपाध्यक्ष—श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे. कोषाध्यक्ष—कु. ताराबाई प्रधान. सरचिटणीस—प्रा. श्री गो. काशीकर. चिटणीस—श्री. य. गो. मालोदे, सा. भू. तु. ना. काटकर व प्रा. मा. ल. भांबूरकर. संपादक युगवाणी—प्रा. या. मु. पाठक. संचालक 'परीक्षा समिति'—प्रा. तु. वि. गेडाम. ह्याशिवाय निरनिराळया समित्यांचीहि नियुक्ति करण्यांत आली. (समित्यांचीं नांवें पुढील अंकीं देण्यांत येतील).

### सांस्कृतिक कार्यक्रम समिति

१. वसंत व्याख्यानमाला—साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांनी 'महाभारताचा अधिनायक—श्रीकृष्ण' ह्या विषयावर दि. ११ ते २३ मार्च १९५९ च्या दरम्यान १० दिवस वसंत व्याख्यानमाला गुंफली. व्याख्यानें विचारप्रवर्तक झालीं. तिकिटें असूनहि श्रोत्यांनी रंगमंदिर फुलून जात असे

२. दि. २०-३-५९ रोजीं अमेरिकेंतील प्रख्यात इतिहासशास्त्रज्ञ व राज्यशास्त्रज्ञ प्रा. डॉ. रिचर्ड एन. करंट यांनी वि. सा. संघास भेट दिली. साहित्यमंदिर व रंगमंदिर पाहून त्यांनी अत्यंत समाधान व्यक्त केलें. ह्याचवेळीं चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानंतर सायंकाळीं ६ वाजतां डॉ. करंट यांचें 'अब्राहम लिंकनचा जागतिक घडामोडींवर परिणाम' ह्या विषयावर विद्वत्तापूर्ण भाषण झालें.

३. दि. ३०-३-५९ ला कै. कवि विनायक यांची ५० वी पुण्यतिथि प्रा. या. मु. पाठक यांचें अध्यक्षतेखाली साजरी करण्यांत आली. ह्यावेळीं श्री. र. वि. कुलकर्णी, श्री. वसंतराव देशमुख आदि वक्त्यांचीं भाषणें झालीं.

## शाखावृत्त—

**वर्धा**—वर्धा येथे वि. सा. संघशाखेच्या वतीनें श्रीं, सुधीर फडके यांच्या गीतरामायणाच्या गायनाचा सुश्राव्य कार्यक्रम करण्यांत आला.

**मेहेकर**—मेहेकर येथे वि. सा. सं.ची शाखा स्थापन करण्याची सर्व पूर्व तयारी झाली असून केंद्रीय कार्यकारी मंडळाने आपल्या दि. १४-३-५८ च्या बैठकींत मेहेकर येथे शाखा स्थापन करण्यास संमति दिली आहे

**आगामी संमेलन**—विदर्भ साहित्य संघाचें आगामी २२ वें वार्षिक साहित्य संमेलन भरविण्याबद्दल पवनी व भंडारा ह्या ठिकाणांहून निमंत्रणें आलीं आहेत.

---

अनुक्रमणिका

# विदर्भ साहित्य संघ
# २१ वें वार्षिक साहित्य संमेलन तळोधी (बाळापूर)

तळोधी येथें दि. १५ व १६ मार्च रोजीं विदर्भ साहित्य संमेलनाचें एकविसावें अधिवेशन सुप्रसिद्ध कवि प्रा. यादव मुकुंद पाठक यांचे अध्यक्षतेखाली होऊन पुढील ठराव एकमताने मंजूर झाले.

## दुखवटा

**ठराव १.** (अ) विदर्भ साहित्य संघाचे एक निष्ठावंत कार्यकर्ते आणि रंगमंदिराचे निर्माते श्री. नानासाहेब जोग यांच्या दि. १ मे १९५८ रोजीं झालेल्या आकस्मिक निधनाने ह्या संमेलनास अत्यंत दुःख होत आहे. श्री. नानासाहेब जोग हे एक थोर नाटककार व कुशल दिग्दर्शक होते. वि. सा. संघाचें रंगमंदिर उभारण्यासाठी तर त्यांनी अविश्रांत कष्ट घेतले. त्यांच्या मृत्यूने विदर्भ साहित्य संघाची अपरिमित हानि झाली आहे. ईश्वर मृताचे आत्म्यास सद्गति देवो.

(ब) कै. नाना जोगांचें स्मारक रंगमंदिरासमोरील खुल्या प्रांगणांत त्यांचा अर्धपुतळा उभारून करण्याचें विदर्भ साहित्य संघाने ठरविलें आहे. ह्या स्मारकाला विदर्भ साहित्य संघाचे सदस्य व कै. नानांचे असंख्य चहाते यांनी मदत करावी, ही या संमेलनाची विनंती आहे.

(अध्यक्षांकडून)

**ठराव २.** पुढील माननीय साहित्यिक व साहित्यप्रेमी या वर्षी दिवंगत झाल्याने भारताची व विशेषतः मराठी साहित्याची फारच हानि झाली आहे. हें संमेलन त्यांच्या निधनाबद्दल अत्यंत दुःख व्यक्त करतें आणि त्यांस सद्गति चिंतितें.

(१) राजे रघुजीराव भोंसलें, (२) श्री शंकर श्रीकृष्ण देव, (३) सौ. अनसूयाबाई काळें, (४) श्री. गोविंदराव काणे, (५) डॉ. वा. ग. शिंगणापूरकर, (६) बॅ. मुकुंदराव जयकर, (७) श्री. ज. स.करंदीकर, (८) श्री. माधव केशव काटदरे, (९) श्री. नागेश जोशी. (अध्यक्षांकडून)

## कालिदास, भवभूति व मुकुंदराज यांचीं स्मारकें

**ठराव ३.** (अ) रामटेकला महाकवि कालिदासाचें स्मारक उभारण्याची विदर्भ साहित्य संघाची विनंती मुंबई शासनाने मान्य केली आहे व त्याकरितां एक समिति नियुक्त केली आहे. ह्याबद्दल विदर्भ साहित्य संघाचें हें संमेलन मुंबई शासनास धन्यवाद देतें व शासनाद्वारें रामटेक येथे लवकरच योग्य व जिज्ञासू प्रवाशांना आकर्षक असें स्मारक उभारलें जाईल, अशी आशा व्यक्त करतें.

(आ) त्याचप्रमाणे पद्मपूर येथें महाकवि भवभूतीचें आणि आंभोरा येथें आद्य मराठी कवि मुकुंदराज यांचें स्मारक उभारण्याकरितांहि मुंबई शासनाने एक समिति नियुक्त करावी अशी

हें संमेलन मुंबई शासनास विनंती करतें. पद्मपूरजवळच गोंदिया येथे विदर्भ साहित्य संघाचे वतीने महाकवि भवभूतीचें सुयोग्य स्मारक उभारण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याला संघ व राज्य शासनांनी सर्वतोपरी साहाय्य द्यावें अशीहि ह्या संमेलनाची संघ व राज्य शासनांना विनंती आहे.

(अध्यक्षांकडून)

## भारत सरकारला धन्यवाद

**ठराव ४.** विदर्भ साहित्य संघाच्या गतवर्षीच्या संमेलनाने विनंती केल्याप्रमाणे भारत शासनाच्या पुरातत्व विभागाची कचेरी दिल्लीहून नागपूरला आणण्यांत आली आहे. तसेंच इतरहि अनेक केंद्रीय कार्यालयें नागपुरास आणलीं गेलीं आहेत. ह्याबद्दल हें संमेलन संघशासनास मनःपूर्वक धन्यवाद देतें. (अध्यक्षांकडून)

## सीमांवरील मराठी प्रदेश

**ठराव ५.** राज्य पुनर्रचनेच्या वेळीं मराठीभाषी विभाग नवीन मुंबई राज्यांत एकत्रित आणतांना बऱ्हाणपूर, भैंसदेही, मुलताई, सौंसर, बालाघाट, वाराशिवनी हे तालुके व बस्तर आणि बैतुल जिल्ह्यांतील कांही मराठीभाषी प्रदेश हे विदर्भाशीं संलग्न असलेले विभाग, तसेंच जुन्या हैद्राबाद राज्यांतील शिरपूर, आदिलाबाद, उटणूर, बिदर वगैरे मराठीभाषी विभाग आणि जुन्या मुंबई राज्यांतील बेळगांव, कारवार अदि विभाग नवीन मुंबई राज्यास जोडण्यांत आले नाहीत. हे सर्व प्रदेश नवीन मुंबई राज्यांत समाविष्ट करण्यांत यावेत अशी हें संमेलन संघ व राज्य शासनांना पुन्हा आग्रहाची विनंती करतें. (अध्यक्षांकडून)

## मराठी लेखनपद्धती

**ठराव ६.** मराठी लेखनाची सर्वसामान्य, प्रमाणित आणि अधिकृत पद्धति तयार होण्याच्या दृष्टीने विदर्भ साहित्य संघाने १९५३ सालीं सुचविलेले नियम नागपूर विद्यापीठाने मान्य केले आहेत. त्याचप्रमाणे हे नियम हळूहळू सर्व मराठी प्रदेशांत मान्यता पावत आहेत. ह्याबद्दलहि ह्या संमेलनास आनंद होतो. सर्व साहित्य संस्था, विद्यापीठें, मुद्रण संस्था, शासन संस्था व लेखक यांच्या सहकार्याने हे नियम सर्वमान्य होऊन मराठी लेखनाची सर्वमान्य प्रमाणित व अधिकृत पद्धति तयार होईल, अशी ह्या संमेलनास आशा वाटते. (अध्यक्षांकडून)

## मुंबई सरकारचें अभिनंदन

**ठराव ७.** मुंबई राज्य सरकारने नामवंत पण परिस्थितीने जर्जर झालेल्या लेखक, संशोधक, कलाकार, आदींना आर्थिक साहाय्य देण्याचें जें प्रशंसनीय धोरण आखलें आहे, त्याबद्दल हें संमेलन मुंबई राज्य सरकारचें अभिनंदन करतें. (अध्यक्षांकडून)

## हस्तलिखित साहित्याचा संग्रह

**ठराव ८.** विदर्भांत होऊन गेलेल्या व विद्यमान असलेल्या नामवंत साहित्यिकांचीं हस्तलिखितें तसेंच दुर्मिळ वाङ्मय संग्रहित करावें अशी विदर्भ साहित्य संघाची इच्छा आहे. ह्याकरितां विदर्भांतील संबंधित संस्थांनी व व्यक्तींनी विदर्भ साहित्य संघास साहाय्य करावें, अशी यवतमाळ संमेलनाने विनंती केली होती व याप्रमाणे कांही हस्तलिखितें संघाकडे आलीं आहेत. तथापि या कामीं संघाला अधिक प्रमाणांत साहित्यिकांनी सहकार्य द्यावें, अशी हें संमेलन पुन्हा विनंती करतें.

(अध्यक्षांकडून)



अनुक्रमणिका

## शासन साहित्य परिषद

**ठराव ९.** (अ) जुन्या मध्यप्रदेश शासनानें सुरू केलेली शासन साहित्य परिषद नवीन मुंबई राज्यांतहि चालू ठेवावी असा ठराव गेलीं २ वर्षे विदर्भ साहित्य संमेलनांत करण्यांत आला आहे. त्याला अनुसरून शासन साहित्य परिषद सुरू करण्याचा मुंबई शासन विचार करीत आहे असें समजतें. परंतु ह्याकरितां आता अधिक वेळ न लावतां मराठी साहित्यास प्रोत्साहन देणारा हा उपक्रम लवकर सुरू करण्यांत यावा, अशी ह्या संमेलनाची मुंबई शासनास आग्रहाची विनंती आहे.

(ब) जुन्या मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने लेखकांच्या ग्रंथांना केवळ पुरस्कारच दिला नाही तर स्वखर्चानें त्यांचे ग्रंथ प्रकाशित करण्याचें ठरविलें होतें. त्यांपैकी एकदोन ग्रंथ प्रकाशितहि झाले आहेत. पण इतर ग्रंथांचें प्रकाशन राज्यपुनर्रचनेनंतर अजूनहि झालें नाही. आता भाषावार पुनर्रचना होऊन दोन वर्षे होऊन गेलीं आहेत. तेव्हा आता अप्रकाशित राहिलेले ग्रंथ प्रकाशित करण्याचें कार्य मुंबई राज्य शासनानें तावडतोब हातीं घ्यावें, अशी या संमेलनाची आग्रहाची मागणी आहे.

सूचक–श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, अनुमोदक–प्रा. राम डोके.

## विदर्भातील साहित्याची सूचि

**ठराव १०.** विदर्भात आतापर्यंत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें, नियतकालिकें व इतर प्रकाशनें यांची संपूर्ण सूचि करण्याचें कार्य मुंबई सरकारनें सुरू करावें, अशी हें संमेलन मुंबई शासनास विनंती करतें व ह्या कामीं विदर्भ साहित्य संघ शासनास साहाय्य देईल, असें आश्वासन देतें.

सूचक–श्री. र. वि. कुळकर्णी, अनुमोदक–प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे.

## गांवांचीं नांवें बदलण्याबद्दल

**ठराव ११.** इंग्रजी अमदानींत व तत्पूर्वी कित्येक गावांचीं जुनीं ऐतिहासिक नांवें विकृत झालीं होतीं किंवा बदललीं होतीं. राष्ट्रीय जागृतीच्या दृष्टीनें इतिहास, संस्कृति, राजकीय घडामोडी, पौराणिकता इत्यादींशीं निगडीत असलेलीं नांवें त्या त्या गावांना पुन्हा देण्याची पद्धति भारत शासनानें सुरू केली आहे. ह्याबद्दल हें संमेलन भारत शासनाचें अभिनंदन करतें; व ह्याच दृष्टीनें विदर्भातील वाशीम, चांदा इत्यादि गावांना त्यांचीं इतिहास संस्कृतीशीं निगडित असलेलीं अनुक्रमें वत्सगुल्म, चंद्रपूर हीं नांवें देण्यांत यावींत अशी राज्य व भारत शासनास विनंती करतें.

सूचक–श्री. य. गो. मालोदे. अनुमोदक–श्री. तु. ना. काटकर, श्री. श्री. शं. देशमुख.

## ग्रंथालयविषयक कायदा हवा

**ठराव १२.** हें संमेलन मुंबई राज्य सरकारला अशी विनंती करतें की, ग्रंथालयांचा प्रसार त्वरित होण्यासाठी त्यांनी संपूर्ण राज्यासाठी ग्रंथालयविषयक कायदा करून तो शक्य तितक्या लवकर अमलांत आणावा.

सूचक–पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, अनुमोदक–गो. स. देहाडराय.

## कॉपीराइट कायदा

**ठराव १३.** कॉपीराईट कायद्याप्रमाणे शासनाकडे जाणाऱ्या पुस्तकांच्या प्रतींपैकी एक प्रत विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयाकरितां देण्यांत यावी, अशी गतवर्षीच्या यवतमाळ संमेलनानें मुंबई राज्य शासनास विनंती केली होती. तथापि ह्याबद्दल अद्याप कांही कार्यवाही शासनाकडून झालेली

नाही. तरी राज्य शासनाने संघाची ही मागणी त्वरित मान्य करून उचित कार्यवाही करावी, अशी या संमेलनाची पुन्हा विनंती आहे.

सूचक–प्रा. भा. श्री. परांजपे, अनुमोदक–सौ. उषा लिमये.

### लोकभाषा व लोकसाहित्य

**ठराव १४.** विदर्भांतील हळबी, कोरकू, कोलाम, वंजारी, लभानी, भिल्ल, पारधी, गोंड इत्यादि लोकभाषांच्या व त्यांतील लोकसाहित्याच्या संकलनाला व संशोधनाला भरपूर वाव आहे. ह्याकरितां जुन्या मुंबई राज्याप्रमाणेंच विदर्भाकरितांहि लोकसाहित्य समिती स्थापन करण्याचा मुंबई शासनाचा विचार आहे, ही अत्यंत स्तुत्य गोष्ट आहे. ह्याबद्दल गतवर्षीच्या यवतमाळ संमेलनाने शासनास विनंती केली होती. परंतु अद्याप अशी समिती स्थापन करण्यांत आली नाही. तरी अशा प्रकारची समिति स्थापन करून तिचें कार्यालय नागपूर येथे ठेवण्यांत यावें आणि विदर्भांतील साहित्य संस्था व साहित्यिक यांची मदत घेऊन लोकसाहित्याच्या संशोधनाला व संकलनाला मुंबई शासनाने साहाय्य करावें, अशी ह्या संमेलनाची मुंबई शासनास विनंती आहे.

सूचक–प्रा. मा. ल. व्यवहारे, अनुमोदक–प्रा. प्र. वा. उर्ध्वरेषे; सौ. प्रमिला भागवत.

### स्वतंत्र पुराणवस्तु विभाग हवा

**ठराव १५.** (अ) मुंबई शासनाच्या पुराणवस्तु विभागाचे राजकोट, औरंगाबाद इत्यादि ठिकाणीं घटक विभाग उघडण्यांत आले आहेत. आतापर्यंत विदर्भ विभागांत कोठेहि उत्खनन झालेलें नाही. म्हणून विदर्भांतील पुराणवस्तु विभागाचा घटक विभाग उघडण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तरी या दिशेनें मुंबई शासनाने कार्यवाही करावी अशी हें संमेलन मुंबई शासनास पुन्हा विनंती करतें.

(ब) जुन्या मध्यप्रदेशाची राजधानी असतांना नागपूर येथील कचेरींत ऐतिहासिक व संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचें असें साहित्य (रीजन्सी रेकॉर्डस्) एकत्रित झालें होतें. हें सर्व साहित्य नागपूरहून मुंबईला हलविण्याचा मुंबई शासनाचा मानस आहे व त्याबद्दल मुंबई शासन व मध्यप्रदेश शासन यांच्यांत वाटाघाटी चालू आहेत असें समजतें. हें सर्व साहित्य नागपूरलाच असणें सर्व दृष्टीने योग्य होईल, म्हणून हें साहित्य (रीजन्सी रेकॉर्डस्) नागपूरहून हलवूं नये; उलट संशोधनाची व ते कागदपत्र प्रकाशित करण्याची योजना आखण्यांत यावी, अशी गतवर्षीच्या यवतमाळ येथील संमेलनाने मुंबई शासनास विनंती केली होती, तिचा हें संमेलन पुनरुच्चार करीत आहे.

सूचक–श्री. दे. गो. लांडगे, अनुमोदक–प्रा. श्री. गो. काशीकर.